**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११७

निर्णय दिनांक : ०२.०५.२००८

१ सौ. प्रमिला श्यामराव नरसीकर, : अपीलार्थी
घ.नं.१-१८-५ श्री. धन्वंतरी कॉलनी,दिपनगरजवळ
नांदेड, ता.जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा प्रशासन अधिकारी,
शासकीय आयुर्वेद रुग्णालय महाविद्यालय व
रसशाळा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद रुग्णालय
महाविद्यालय व रसशाळा, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सौ. प्रमिला श्यामराव नरसीकर, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, आयुर्वेद महाविद्यालय रुग्णालय व रसशाळा, वजिराबाद नांदेड श्री.

किसन नागोराव जोभेगावकर, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, आयुर्वेद महाविद्यालय रुग्णालय व रसशाळा, वजिराबाद नांदेड यांचे प्रतिनिधी प्रभारी अधिष्ठाता डॉ. भास्कर हंसारामजी राजकुवर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०१.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "१) शासकिय आयुर्वेद महाविद्यालय रुग्णालय व रसशाळा,नांदेड मधील एकूण किती अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण खर्च व प्रोत्साहनात्मक रक्कम रु. ७५००/-अदा करण्यात आली आहेत त्यांची नावे,पदनाम व एकूण रक्कम कळवावी.
> २) वरील पैकी किती अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यासाठी आवश्यक असलेली महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची 'चाचणी परीक्षा' (Confirmatory test) संगणक परिक्षा आत्तापर्यंत उत्तिर्ण केली आहे? त्यांची नावे, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक ?
> ३)वरीलपैकी किती अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून त्यांना अदा केलेला सदर खर्च व प्रोत्साहनात्मक मोबदला रु.७५००/- आत्तापर्यंत वसूल केलेला आहे ? त्यांची नावे व एकूण रक्कम ?
> ४) वरीलपैकी किती कर्मचारी/अधिकारी आत्तापर्यंत सेवानिवृत्त झाले ? त्यांची नावे सेवानिवृत्तीचा प्रकार, सेवानिवृत्ती दिनांक, त्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यात आलेला दिनांक व रक्कम ?
> ५) सदर सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वरील रक्कम आत्तापर्यंत वसूल करण्यात आलेली आहे काय ? असल्यास त्यांचे पावती क्रमांक व दिनांक
> ६) वरील प्रमाणे दिलेली रक्कम 'नियत वयोमानाने सेवानिवृत्त' झालेल्या कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्याबद्दलचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक ? कळवून, शासन निर्णयाची प्रत द्यावी.
> ७) शासन निर्णय/नियम यांची अंमलबजावणी करतांना, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने समभावाने/भेदभाव न करता, काटेकोरपणे-शासनाच्या स्पष्ट आदेशाप्रमाणेच (अभिप्रेत मतांप्रमाणे नाही) निर्णय घेणे आवश्यक असतांना सौ. प्रे. श्या. नरसीकर सेवानिवृत्त का.अधीक्षक, शा. रुग्णालय नांदेड, फक्त

यांच्याकडूनच वरील रक्कम कां वसूल करण्यात येत आहे ? त्याचे कारण- पूर्वग्रहदूषीत मनाने ?, जाणूनबूजून त्रास देण्यांच्या हेतूने ?, अन्य कोणते प्रयोजन? स्पष्ट करावे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ३०.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ०२.०४.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, दिशाभूल करणारी असल्याचे नमुद केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आयुर्वेद महाविद्यालयातील इतर कर्मचाऱ्यांची उदाहरणे देऊन त्यांचेकडून संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन रकमेची वसूली का करण्यात आली नाही असा प्रश्न जन अपिलीय अधिकारी यांना विचारला आहे. सदर अपिल अर्जाची एक प्रत त्यांनी आयुर्वेद संचालक, मुंबई यांना देखिल अग्रेषित केली आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली परंतु या सुनावणी संदर्भात त्यांनी कोणतेही निश्चित असे आदेश पारित केले नाहीत. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भाने त्यांचेकडील दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जामध्ये मांडलेल्या सर्व मुद्यांना यथास्थिती उत्तरे अपिलार्थीस दिली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर निर्णय घेण्याची ही कृती चुकीची असून माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांचेकडे झालेल्या कोणत्याही अपिल अर्जावर निर्णय घेतांना येथून पुढे त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून त्यावर आपला लेखी निर्णय पारित करावा, हे अपिल सुनावणीमध्ये अभिप्रेत आहे, इतःपर याची त्यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या खुलाशाने समाधान न

झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे २५.५.२००७ रोजी रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जान्वये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना संपूर्ण व अचूक माहिती देण्यामध्ये टाळाटाळ करुन, अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. याचबरोबर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस मानसिक, आर्थिक त्रास दिल्याचेही त्यांनी नमुद केले आहे. अपिलार्थी यांचे मते जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सारख्याच इतर कर्मचाऱ्यांकडून संगणक प्रशिक्षणाची प्रोत्साहन रक्कम वसूल केली नसून अपिलार्थीस त्रास देण्याच्या उद्देशाने सदर रकमेची वसूली फक्त अपिलार्थी यांचेकडून केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी दि. १.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ३०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये व्यक्तीशः हस्तांतरित केली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिल्याबद्दल त्यांनी अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. अपिलार्थी यांना त्यांचेतर्फे कोणताही त्रास देण्यात आला नसून, त्यांचेकडील उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. तसेच अपिलार्थीस व अपिलार्थीने त्यांचेकडील वेगवेगळया अर्जामध्ये निर्देशित केलेले कर्मचारी यांना त्यांना समान वागणूक दिलेली आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी तंत्रशिक्षण मंडळाची संगणक प्रशिक्षणाची चाचणी परिक्षा उत्तीर्ण केली नसेल त्यांचेकडून संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन भत्त्याची वसूली त्यांचे महाविद्यालयातर्फे काही

कर्मचाऱ्यांकडून यापूर्वीच केली आहे व इतरांकडून वसूल करण्याचे काम चालू आहे. त्यांनी कर्मचाऱ्यांकडून येत्या दोन महिन्यात पूर्ण वसूली करण्याचे त्यांचे उद्दिष्ट ठरविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचेकडून शासन आदेशातील तरतुदीप्रमाणे वसूली करण्यात आली असून, अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे त्यांनी कधीही मानसिक त्रास दिला नाही. ज्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून अद्यापही संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन भत्त्याची रक्कम वसूल झालेली नाही, त्यांचे संदर्भात संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांचे निवृत्ती वेतनातून पुढील दोन महिन्यात सदर रकमेची वसूली करण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचे दि. १.३.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ३०.३.२००७ रोजच्या पत्रान्वये पुरविलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.७ मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अपेक्षित करणारे प्रश्न विचारले आहेत. या मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ७ ची माहिती देणे अभिप्रेत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि.३०.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या संदर्भात खुलासा केल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी त्यांचे द्वितीय अपिल अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती अथवा त्यातील एखादा भाग अर्धवट व दिशाभूल करणारा दिला आहे, हे सिध्द करण्यास्तव अथवा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे खंडण करण्यासाठी, अपिलार्थी आज आयोगासमोर हजर नाहीत. आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांचे

युक्तीवादावरुन व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलार्थीस कोणतीही चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आयोगास आढळून आले नाही. या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे दिसून येते की, शासकीय कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी शासनाने संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन अनुदान म्हणून प्रत्येकी रु.७५००/- इतकी रक्कम मंजूर केली होती. सदर रक्कम बहुतेक सर्व कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आली, तथापि त्यापैकी काही कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण पूर्ण करुन आवश्यक चाचणी परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तर काही कर्मचारी यामध्ये अनुत्तीर्ण राहिले आहेत. अशा अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांकडून त्यांना दिली गेलेली प्रोत्साहनपर रकमेची वसूली करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी शासन आदेशातील तरतुदीप्रमाणे संगणक प्रशिक्षण चाचणी परीक्षा उत्तीर्ण न केल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडून संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन अनुदान वसूल केले आहे. या संदर्भात शासनाने दि. २७.६.२००६ रोजी एक आदेश निर्गमित केला आहे. सदर आदेश शासन सेवेतील स्वेच्छानिवृत्त/बडतर्फ/आकस्मिक निधन झालेले अधिकारी व कर्मचारी यांचेकडून संगणक प्रशिक्षण अनुदान वसूल करण्यासंदर्भातील आहे. या आदेशामध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे संदर्भात कोणताही उल्लेख नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी, ज्या नियत वयोमानानुसार शासन सेवेतून दि. २८.२.२००७ रोजी निवृत्त झाल्या, त्यांचेकडून सदर प्रोत्साहनपर रकमेची वसूली केली, याबद्दल अपिलार्थीचा या वसूलीस आक्षेप आहे. जन माहिती अधिकारी यांचे मते, अपिलार्थी यांचे या प्रकरणात शासनाचा दि. १०.७.२००० चा शासन आदेश लागू होत आहे व अपिलार्थीस संगणक प्रशिक्षण प्रोत्साहन रक्कम सन २००० साली अदा करण्यात आली होती. त्या सेवानिवृत्त होईपर्यंत म्हणजे दि. २८.२.२००७ पर्यंत संगणक चाचणी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे त्यांना दिलेली प्रोत्साहनपर रकमेची त्यांनी अपिलार्थीच्या सेवानिवृत्ती वेतनातून वसूली केली. सदर योजना आजही लागू असून शासनाच्या दि. ५.५.२००७ च्या आदेशान्वये

या योजनेस दि. ३१.१२.२००७ पर्यंत मुदतवाढ दिली गेली आहे. याचाच अर्थ दि. १०.७.२००० चे शासन आदेश अद्यापही वैध आहेत. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचेकडील उपलब्ध असलेली सर्व माहिती अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने, तसेच जन माहिती अधिकारी यांचे विधानांचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेली भूमिका सकृतदर्शनी बरोबर असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त प्रकरणातील निर्णय पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा असल्याने या संदर्भात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांकडे आपले म्हणणे नोंदवून आपल्या आक्षेपांचे त्यांचेकडून निराकरण करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. प्रमिला श्यामराव नरसीकर, घ.नं.१-१८-५ श्री. धन्वंतरी कॉलनी,दिपनगरजवळनांदेड जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शासकीय आयुर्वेद रुग्णालय महाविद्यालय व रसशाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद रुग्णालय महाविद्यालय व रसशाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११८

निर्णय दिनांक : ०२.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मारकवाड संजय हनुमंत,<br>द्वारा अरविंद टाक, शास्त्रीनगर भावसार चौक,<br>तरोडा (खू) पोस्ट ऑफीस जवळ, नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा सहायक संचालक (कुष्ठरोग)<br>जोशी बिल्डींग, शिवरामनगर,<br>परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपसंचालक, आरोग्य सेवा,<br>बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मारकवाड संजय हनुमंत , (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (कुष्ठरोग) परभणी श्री. गणेश गोमाजी रामटेके, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (आरोग्य सेवा) औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. काझी महंमद एकबाल जिलानी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०७.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यालयातील प्रवासभत्ता व दैनंदिन भत्त्यासंदर्भात एप्रिल, २००१ ते ७.१२.२००६ या कालावधीची माहिती त्यांनी दिलेल्या नमुन्यात मागितली असून, त्याबरोबर प्रत्येक वर्षाच्या अनुदान मंजूरीच्या सत्यप्रतींची मागणी त्यामध्ये केली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती एकंदर दोन भागात असून पहिल्या भागातील तक्त्यात १४ रकाने आहेत तर दुसऱ्या भागातील तक्त्यामध्ये १० रकाने आहेत. सदर माहिती अपिलार्थी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झाला नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. १२.०२.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे. अपिलार्थीचा सदर अपिल अर्ज जन आपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी यावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांचेकडील दि. २७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्याचे दिसून येते. तथापि या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीच्या अपिल व मूळ अर्जाची प्रत जन माहिती

अधिकारी यांना पाठविली नाही. अपिलार्थीने आपल्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार काही माहिती मागितली आहे, याची कल्पना जन माहिती अधिकारी यांना प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांचेकडून, त्यांचे दि. २७.२.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर आली. अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला अपिल अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त न झाल्याने, त्यांनी त्यांच्याकडील दि. १२.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांना उत्तर दिले व सदर पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस अग्रेषित केलेल्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीकडून त्यांना कोणताही अर्ज प्राप्त झाला नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले त्यांचेकडील दि. १२.३.२००७ रोजीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले. तथापि या पत्राची तामिली पोस्टमनकडून अपिलार्थीस होऊ शकली नाही व सदर पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे पोस्टमनकडून विनातामिली दि. ७.४.२००७ रोजी परत प्राप्त झाले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांकडूनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे ०३.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांना प्राप्त न झाल्याने, ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांना दि. २७.२.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नसल्याची कल्पना त्यांचेकडील दि.

१२.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली होती. तथापि सदर पत्र विनातामिली परत आल्याने त्यांनी याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता ते ३० दिवसांचे आत विनामूल्य देण्यात तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपिल अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांचेकडील दि. २७.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असलेल्या त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्याची सूचना देखिल त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या पत्राद्वारे केली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झालेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज व त्यासोबतचा अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेले पत्र त्यांना विनातामिली दि.७.४.२००७ रोजी परत प्राप्त झाले व त्यानंतर परत, अपिलार्थी यांनी माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेशी कोणताही संपर्क न साधल्याने जन माहिती अधिकारी यांची अशी धारणा झाली की, अपिलार्थीस आता माहितीची आवश्यकता नाही. तथापि विहित मुदत टळून गेल्यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केले होते, याची कल्पना जन माहिती अधिकारी यांना नव्हती. थोडक्यात जन माहिती अधिकारी व त्यांचे वरिष्ठ कार्यालय यांचेतील प्रशासकीय ढिसाळपणामुळेच अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहावे लागले.

अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल अथवा विलंबाने माहिती देण्याबद्दल, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचेवर निश्चितपणे दोषारोपण करण्याइतपत पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे सादर केला नसल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. तसेच या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.२.२००७ रोजी, अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी कोणत्या प्रकारे सुनावणी घेतली नाही तसेच जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठविला नाही व अपिलार्थीस माहिती मिळवून देण्यासाठी कोणतीही सकारात्मक कार्यवाही न करुन आपले कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची नोंद संचालक (आरोग्य सेवा) यांनी यथायोग्य घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी  हे आता, अपिलाथीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना ज्या तक्त्यामध्ये हवी आहे, त्या तक्त्यामध्ये ती ३० दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक :    ०२.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय हनुमंत मारकवाड द्वारा अरविंद टाक, शास्त्रीनगर भावसार चौक, तरोडा (खू) पोस्ट ऑफीस जवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (कुष्ठरोग) परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पीटल कंपाऊण्ड, व्ही.टी.जवळ,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५३

निर्णय दिनांक : ०२.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शामराव सुंदरराव खरात,<br>मु.पो.पाथरवाला (बू) ता.अंबड, जि.जालना | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा उपविभागीय अधिकारी, जायकवाडी<br>पाटबंधारे, उपविभाग क्र.१४, वडीगोद्री ता.अंबड<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा प्रशासक, लाभक्षेत्र विकास<br>प्राधिकरण,औरंगाबाद. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,<br>नाथनगर (उत्तर), पैठण. |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अधीक्षक अभियंता व प्रशासक<br>लाभक्षेत्र, औरंगाबाद |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शामराव सुंदरराव खरात , (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर (उत्तर) पैठण जि.औरंगाबाद श्री. विनायक बळवंत कुलकर्णी, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण औरंगाबाद श्री.अजय प्रभाकर कोहीरकर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २५.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यालयाशी संबंधित दि. १५.८.८० ते २५.२.२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) स.नं.१२६ (ग.नं.२२९) मधील चा.नं.१५ मुळे साचलेले पाणी शासनाने लेखी आदेश देऊनही का काढून देण्यात आले नाही.

२) प्रशासक जायकवाडी औरंगाबाद यांनी आपणास ५.१.८२ रोजी लेखी आदेश देऊनही पाणी का काढून देण्यात आले नाही व त्यास जबाबदार कोण

३) १५.८.८० ते २५.२.०७ पर्यंत कोणकोण उपविभागीय अधिकारी होते व शाखाधिकारी होते.

४) प्रशासक यांनी शासनाने लेखी आदेश देऊनही शाखाधिकारी क्र.४ यांनी स.नं. १२६ व गट २२९ मध्ये चा.नं.१५ मुळे साचलेले पाणी २६ वर्षात काढून न दिल्यामुळे माझी सर्व जमिन पडीत राहिली व पिकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले तरिही आपण एकाही शाखाधिकाऱ्याविरुध्द कारवाई केली नाही व ति कधी करणार

५) चा.नं.१५ च्या टेल ते महाकाळा रस्त्यापर्यंत गेल्या ५ वर्षात किती चारी उकरली व त्यावर किति खर्च झाला व काम करणारी एजन्सी कोण होती.

६) आपला व शाखाधिकारी यांचा मुख्यालयास भेटण्याचा वार कोणता आहे."
अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ०९.०४.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. अपिलार्थीचा अपिल अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.४.२००७ रोजी प्राप्त झाला. तथापि सदर अपिल अर्ज वाचनीय नसल्याने व या अर्जावरील अपिलार्थीची सही व मूळ अर्जावरील अपिलार्थीची सही जुळत नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम, सदर अपिल अर्ज दाखल करुन घेतला नाही. तद्नंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यातील पत्रव्यवहारानंतर अंतीमतः अपिलार्थीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २८.५.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,५ व ६ संबंधातील माहिती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत पुरविण्याची सूचना केली. दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०६.२००७ रोजी रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्यापही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जी माहिती मिळाली ती चुकीची आहे, याबाबत त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये पुढे असे

सांगितले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांची  माहिती (नावांची यादी) मागितली असता, सदर माहिती त्यांना मिळाली नाही, मात्र उपविभागीय अधिकारी व शाखा अभियंता यांच्या नावांची यादी मिळाली. अशाप्रकारे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ मागणीपेक्षा यांना वेगळया मुद्यांवर माहिती दिली आहे. तसेच त्यांनी त्यांचा माहितीचा मूळ अर्ज उपअभियंता यांना उद्देशून केला असता, त्यांना सदर माहिती कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या प्रकरणात उपअभियंता हे जन माहिती अधिकारी नसून कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांनी सदर माहिती अपिलार्थी यांना कार्यकारी अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांचेमार्फत पाठविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांचेतर्फे अपिलार्थीस दि. ५.१.८२ रोजीच्या पत्रान्वये "फक्त स.नं. २ च्या बांधावर आपले बाजूचे मालकांचे काम बंद केल्यामुळे काम थोडे शिल्लक आहे. उर्वरित काम लवकरच पूर्ण करुन देण्यात येईल" असे आश्वासित केले होते. तथापि अपिलार्थीस अपेक्षित असलेले पाणी काढून देण्यामध्ये स्थानिक जनतेचा विरोध आहे, त्यामुळे हे काम अद्याप करुन देता आले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे दिनांक २५.२.२००७ रोजीचे मूळ अर्जाद्वारे एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. याबाबत मुद्दा क्र. १,२ व ४ शी संबंधित माहिती माहितीचा अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही.या मुद्यांद्वारे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षित केल्याचे दिसून येते.उर्वरित मुद्यांवरील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती पाहता, मुद्या क्र. ३च्या

संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याचे दिसून येते, त्यामध्ये अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे उपविभागीय अधिकारी व शाखा अभियंता यांची यादी मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची माहिती पुरविली. त्यामुळे अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याचे म्हणणे सिध्द होत आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य रितीने दिल्याचे दिसून येते.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या ता. अंबड मधील स.नं.१२६ मधील जमिनीमध्ये दरवर्षी पावसाचे पाणी साठत असून अपिलार्थीस सदर पाणी चारीद्वारे बाहेर काढून हवे आहे. तथापि गेल्या २८ वर्षात जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणतेही सहाय्य केले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे मते अपिलार्थीच्या शेतातील पाणी चारीद्वारे बाहेर काढून देण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध आहे. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जलसंपदा खात्याच्या मालकीच्या जमिनीतून सदर चर जन माहिती अधिकारी यांनी काढता येईल. तथापि ते अशा प्रकारची कार्यवाही करण्याचे जाणीवपूर्वक टाळत आहेत. अपिलार्थीच्या या विधानावर, जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारला असता, अपिलार्थीचा मूळ प्रश्न सोडविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अद्यापपर्यंत कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अर्थात, सदर प्रश्न पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा असल्याने यामध्ये जन माहिती अधिकारी यांना वेगळयाने निर्देश देणे, आवश्यक नाही, असे आयोगास वाटते. परंतु अपिलार्थीच्या मूळ प्रश्नाचा त्यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना सर्वतोपरी सहाय्य करावे, असे त्यांना सूचित करण्यात येते. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बरोबर दिली आहे. तथापि सदर माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीस माहिती

पाठविल्याचा पुरावा नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी दि. २५.२.२००७ रोजी केलेल्या प्रथम अर्जात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस दि. २२.३.२००७ रोजी प्राप्त होणे आवश्यक होते, तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दि. १९.५.२००७ रोजी माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना ती विहित मुदतीत देणे फारसे अवघड किंवा क्लिष्ट नव्हते. तथापि एवढी साधी माहिती देण्यासाठी देखिल जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ५७ दिवसांचा विलंब लावल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस विलंबाने माहिती पाठविण्याच्या आपल्या कृतीने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना सहाय्य करणाऱ्या सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे ५७ दिवसांसाठी एकूण रु. १४२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात जून, २००८ पासून नियमितपणे जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

"००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम- १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, कडा औरंगाबाद यांनी सदर शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्याचबरोबर संबंधित जन माहिती अधिकारी हे शास्तीचा भरणा शासकीय कोषागारामध्ये जून, २००८ पासून नियमितपणे भरतील, असे पहावे व यासंदर्भात आपला अनुपालन अहवाल नियमितपणे, सदर शास्तीची रक्कम पूर्णपणे शासकीय कोषागारात भरली जाईपर्यंत, दरमहा आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी,

३. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी त्यांना सहाय्य करणाऱ्या सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल, त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे ५३ दिवसांसाठी रु.एकूण १४२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

४. अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, कडा, औरंगाबाद यांनी वरील आदेश क्र.२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारीनिहाय शास्तीची विभागणी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत करुन आपला अनुपालन

अहवाल आयोगास सादर करावा व तदनंतर शास्तीची संपूर्ण रक्कम संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नियमितपणे शासकीय कोषागारात जमा होईपर्यंतचा दरमहा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु.पो.पाथरवाला (बू) ता.अंबड, जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधीक्षक अभियंता तथा प्रशासक, कडा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९०

निर्णय दिनांक : ०३.०५.२००८

१ श्री. प्रकाश संपतराव जवळकर, : अपीलार्थी
'श्रीकृपा' १९०, उल्कानगरी,गारखेडा,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याध्यापक,
जगदंबा प्राथमिक शाळा,गजानन कॉलनी,
गारखेडा, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रकाश संपतराव जवळकर, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक,

जगदंबा प्राथमिक शाळा,गजानन कॉलनी, गारखेडा, औरंगाबाद श्री. एम.ई.वर्पे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.औरंगाबाद श्री. श्रीकांत कुलकर्णी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १०.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून खालीलप्रमाणे माहितीची मागितली होती.

> " मार्च २००७ चे २४ दिवसांचे पंचायत स.दाखल करुन वापस घेतलेल्या बिलाची दैनंदीन नोंदी, O/c, व झेरॉक्स प्रत रेशन कार्ड O/c व झेरॉक्स १.३.२००७ ते ३१.३.०७ पर्यंतची खिचडी अनुदान बिले "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांना प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपिल अर्जासोबत दाखल केलेल्या मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत पाहता, सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे त्यांचे कार्यालयातील संबंधित लिपीकाच्या अपिलार्थीस दिलेल्या दि. १०.४.२००७ रोजीच्या पोचसहीवरुन दिसून येते. थोडक्यात, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत अपिलार्थी यांना कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ११.६.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. सदर अपिल अर्ज त्यांनी मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून केला होता. तथापि त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने, शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी अपिलार्थीस दि. २१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये संबंधित संस्थेच्या सचिवांकडे अपिल करण्याचे सूचित केले. यावर अपिलार्थीने संबंधित संस्थेच्या सचिवांकडे अपिल केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार थेट राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.७.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या प्रकरणी अपिलार्थी हे स्वतः संबंधित संस्थेचे सचिव आहेत व ते जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत असल्याने त्यांनी स्वतःकडे स्वतःचे अपिल दाखल करुन घेतले नाही. तथापि आता शिक्षण संचालनालयाच्या दि. ३०.११.२००७ च्या पत्रानुसार जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहे. अशा परिस्थितीत अपिलार्थीने या प्रकरणातील त्यांचे प्रथम अपिल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांचेकडे हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत करावे. शिक्षणाधिकारी (प्राथ)जि.प.औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर पुढील ३० दिवसांचे आत आपले अंतीम आदेश पारित करावेत. अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जास होणारा विलंब त्यांनी क्षमापित करावा, असे त्यांना सूचित करण्यात येते. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर निर्णय अपिलार्थीस मान्य नसेल तर ते राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपिल सादर करु शकतील.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी, अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपिल दाखल करण्यास होणारा प्रस्तावित विलंब क्षमापित करावा व अपिलार्थीचा प्रथम

अपिल अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात आपले आदेश ३० दिवसांचे आत पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश संपतराव जवळकर,श्रीकृपा १९०, उल्कानगरी,गारखेडा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जगदंबा प्राथमिक शाळा,गजानन कॉलनी,गारखेडा, औरंगाबाद.-यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९१

निर्णय दिनांक : ०३.०५.२००८

१ श्री. मनोहर माधवराव थोरात, : अपीलार्थी
घ.नं.२.२.१२४ देगावचाळ,वजिराबाद,
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा)
तहसील कार्यालय, नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा तहसीलदार, नांदेड
जि.नांदेड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मनोहर माधवराव थोरात, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. के. बी. गाजुलवाड, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड श्री.महेश अजबराव

वडदकर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत. त्रयथ पक्ष श्री.गंगासहाय चंदगीराम हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून नांदेड तालुक्यातील मे. गंगासहाय चंदगीराम परवाना धारक क्र. २०/९८ यांचेसंदर्भात एप्रिल,२००४ ते ऑक्टोबर,२००६ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहितीची मागितली होती.

> " नांदेड तालुक्याचे अर्धघाऊक रॉकेल विक्रेते मे. गंगासहाय चंदगीराम परवाना क्रमांक २०/९८ यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलचा महिनेवारी रॉकेल वितरण व स्टॉकची सत्यप्रती तसेच त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेलची वितरण तपशील व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्यांच्याकडून किरकोळ रॉकेल हॉकर्सना रॉकेलच्या दिलेल्या पावतीची (रक्कमेची) पावतीच्या सत्यप्रती मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने अशाप्रकारच्या एकूण १४ अर्धघाऊक विक्रेत्यासंदर्भात या एकाच दिवशी माहिती मागितली होती. या सर्व अर्जातील एकत्रित माहिती अपिलार्थीस देण्याकरिता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण रु.२,०४,०००/- इतकी रक्कम त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचविले. सदर रक्कम अपिलार्थी यांनी वेगवेगळया १४ अर्जाद्वारे मागणी केलेल्या अशाच प्रकारच्या माहितीशी संबंधित आहे. त्यातील गंगासहाय चंदगीराम यांचेशी संबंधित माहितीपोटी रु.२०,०००/- इतकी रक्कम आहे. सदर पत्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्यापृष्टयर्थ त्यांनी आपले कार्यालयातील जावक नोंदवही दाखविली, त्यावरुन त्यांनी अपिलार्थीचे हे पत्र दि. १.२.२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी

यांचेकडून सूचना प्राप्त होऊनही अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरले नाही. तथापि त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.२.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३.४.२००७ रोजी पारित केले. अपिलार्थीने त्यांच्या अशाच प्रकारच्या इतर १३ अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी याचबरोबर घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३.४.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये असे म्हटले आहे की,

"अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही अतीशय विस्तृत स्वरुपाची आहे करीता माहीती अधिकारी यांनी अपील कर्ता यांना सदरील माहीती दाखवावी व त्यातील आवश्यक माहीती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दयावी व सदरील आवश्यक माहीती ही अपीलकर्ता यांना माहीती अधिकारी यांनी १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन दयावी."

जन अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार संबंधितांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दाखविली, त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य प्राप्त करुन घेतली. सदर माहिती मिळाल्याचे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १९.४.२००७ रोजीच्या पत्रामध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीच्या संबंधित अर्जावर जन माहिती अधिकारी यांचेकडून दि.१९.४.२००७ रोजी माहिती दिली गेली, तथापि सदर माहिती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.४.२००७ रोजी रोजी द्वितीय अपिल दाखल केले होते. सदर अपिलाची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयामध्ये दि. २१.४.२००७ रोजी झाली आहे. अपिलार्थीने त्यांचा द्वितीय अपिल अर्ज आयोगाकडे सादर केल्यानंतर लागलीच तीन दिवसांनी अपिलार्थीस दि. १९.४.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली असून, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीने

त्यांचे समाधान झाले असल्याचे त्यांनी तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये नमुद केले आहे. अपिलार्थीस आता आवश्यक असलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले अपिल खारीज करण्यायोग्य आहे, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपिल खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

०१.अपिलार्थीचे अपिल खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोहर माधवराव थोरात, घ.नं.२.२.१२४ देगावचाळ, वजीराबाद नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०९

निर्णय दिनांक : ०३.०५.२००८

१ श्री. पवन सावळाराम मुर्शदपुरे, : अपीलार्थी

प्लॉट नं.४०,गल्ली नं.३,

प्रकाशनगर (प),

पो. मुकुंदवाडी जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),

जिल्हा परिषद औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता (बांधकाम)
जिल्हा परिषद, उपविभाग वैजापूर

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. पवन सावळाराम मुर्शदपुरे,

(त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, उपविभाग वैजापूर जि.औरंगाबाद श्री. विलास विठ्ठलराव निकम ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (सांख्यिकी) जि.प.औरंगाबाद श्री. सखाराम सुकदेव बिऱ्हाडे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०९.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये दि. ५.३.२००४च्या साप्ताहिक अहवालानुसार जन माहिती अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील कामाची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मा. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अंतर्गत वैजापूर कार्यक्षेत्रात कापुस वाडगाव पाकिटमधून सटाणा ते विरगाव भाग-२ मजूर उपस्थिती ५८.

शिवूर पाकिटमधून वाघला फाटा ते बेदवाडी मजूर उपस्थिती ६५ येथे मातीकाम केलेले आहे. रो.ह.यो.योजनेतून नोंदविलेले हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती अधिनियमात ३० दिवसात देण्यात यावे हि विनंती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांनी सदर अर्ज कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केला होता. अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उपविभागीय अभियंता (बांधकाम) पंचायत समिती, वैजापूर यांचेकडे -- फेब्रुवारी, २००७ च्या पत्रान्वये सदर अर्जाची प्रत पाठविली व अपिलार्थीस माहिती देण्याची सूचना केली. उपविभागीय अभियंता (बांधकाम) पंचायत समिती, वैजापूर यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीच्या अर्जाची प्रत झाल्यानंतर उपविभागीय अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन

घेण्यापोटी रु. १०२०/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात जमा करण्याचे त्यांचेकडील दि. २३.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. उपविभागीय अभियंता यांनी कळविलेले सदर शुल्क चुकीचे असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३.४.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश त्यांचेकडील दि. ५.५.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी, उपअभियंता (बांधकाम) जि.प.वैजापूर यांना, अपिलार्थी यांनी मागणी केलेली दि. ५.३.२००६ च्या साप्ताहिक अहवालाशी संबंधित माहिती आठ दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे, त्यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविली. तथापि सदर माहिती चुकीची असल्याचे कारणावरुन अपिलार्थी यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार दि. १६.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीचे शुल्क आकारले व चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांचेवर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० नुसार कार्यवाही करण्याची त्यांनी या अपिल अर्जामध्ये विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांना त्यांना चुकीचे शुल्क कळविले. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आठ पानांची असून ती एक सप्ताहाच्या कालावधीशी संबंधित आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रु.१०२०/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याची सूचना केली. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची आहे. तसेच त्यांनी

वाघलफाटा ते तेलवाडी या रस्त्यावर ६५ मजूर उपस्थित असलेल्या मजूरांच्या हजेरीपटाची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ३५ मजूर उपस्थित असलेला हजेरीपट दिला.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन त्यांनी अपिलार्थीस संबंधित मस्टरची माहिती पुरविली आहे.अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये प्रामुख्याने रस्त्यावरील उपस्थित मजूरांची संख्या त्यांना कळविली होती परंतु ५.३.२००४ रोजी या दोन्ही रस्त्यावर जे मस्टर्स भरले गेले त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. २३.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन त्यांनी आपले आदेश दि. १८.५.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहितीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांचेकडे करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती मागितली आहे. तथापि प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद उपविभाग, वैजापूर यांचेमते त्यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस माहिती दिली आहे. या प्रकरणात कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीवरुन मजूर उपस्थिती संदर्भात माहिती कळविली होती. तथापि कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयातून नेमके चुकीचे मजूर उपस्थितीचे आकडे अपिलार्थीस का देण्यात आले, याची जन माहिती अधिकारी यांना माहिती नाही. उपविभागीय अभियंता, उपविभाग वैजापूर व कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयामध्ये स्वतंत्ररित्या अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीसंदर्भात एकवाक्यता नसल्याचे, या प्रकरणी दिसून येत आहे. तसेच बांधकाम विभागामध्ये कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असता, त्यांनी आपली जबाबदारी टाळून हे काम उपविभागीय स्तरावरील कार्यालयावर देण्याची त्यांची कृती बरोबर नाही, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांना प्रथमतः संबंधित उप अभियंता यांनी चुकीचे शुल्क कळविले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती केवळ १६ पृष्ठांची होती, तथापि जन माहिती अधिकारी यांनी रु.१०२०/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. अर्थात् अपिलार्थीने सदर शुल्क भरलेले नाही व अपिलार्थीस सदर माहिती, जन अपिलीय अधिकारी यांचेकडून आदेश पारित झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी, दि. १८.५.२००७ रोजी पाठविली आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये व जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीमधील मजूरांच्या संख्येच्या असलेल्या फरकाचा कार्यकारी अभियंता यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसांचे आत ताळमेळ घालून अपिलार्थीस अचूक माहिती विनामूल्य पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच, संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस चुकीचे शुल्क कळवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने त्यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दोन महिन्याचे आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित उपविभागीय अभियंता यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच, दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली अचूक माहिती त्यांना सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पवन सावळाराम मुर्शदपुरे,प्लॉट नं.४०,गल्ली नं.३,प्रकाशनगर (प),पो. मुकुंदवाडी जि.औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, उपविभाग वैजापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२०

निर्णय दिनांक : ०५.०५.२००८

१ डॉ. सुनीता कुलभूषण धर्मराव, : अपीलार्थी
लोकपीठ ६७, शिवरामनगर, परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर,
जि.हिंगोली,

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा प्राचार्य,
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर,
जि.हिंगोली.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती सुनीता कुलभूषण धर्मराव , (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) या हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर, जि.हिंगोली,श्री. वामनराव वैजनाथराव

सूर्यवंशी ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे आपले वकील ॲड. ए.बी.धोंगडे यांचेसह हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ११.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे थकित पगारबीलासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "१) दि. १५.६.२००१ ते एप्रिल, २००४ या काळातील मला प्राप्त झालेले वगळून राहिलेले वेतन अद्याप पावेतो देण्यात आलेले नाही. हे वेतन मला का देण्यात येत नाही, यासंबंधी माहिती देण्यात यावी.
> २) मी यापूर्वी आपणास पाठविलेल्या दि. २३.१२.२००३, दि. १५.१०.२००४, दि. १.१.२००५ आणि दि. ५.७.२००६ या पत्रावर आपण काय कार्यवाही केली आहे या संबंधी माहिती.
> ३) दि. ५.१२.२००६ रोजीचे रजिस्टर्ड पत्र आपण सोडवून घेतले नाही. पत्र न सोडवून घेण्यासंबंधाच्या कारणांची माहिती.
> ४) दि. २८.१.२००७ रोजी माहिती अधिकाराखाली आपणास प्रत्यक्षात पाठविलेले पत्र घेण्यास आपण नकार दिला-पत्र न घेण्यासंबंधाच्या कारणांची माहिती.
> ५) दि. २८.१.२००७ रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविण्यासाठी आपणास पाठविलेले रजिस्टर्ड पत्र आपण सोडवून घेतले नाही. पत्र न सोडवून घेण्यासंबंधाच्या कारणांची माहिती."

अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा दिला आहे.

> "वरील विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यांत येते की, आपण उपस्थित असलेल्या काळातील पगार आपण अनुपस्थित असल्यामुळे वैयक्तिक खात्याला जमा करता आला नाही.
>
> आपण विनापरवानगी सतत अनुपस्थित असल्यामुळे पगाराची उर्वरित रक्कम शासनाकडे जमा करण्यांच्या विचाराधीन आहे.
>
> तरी आपण स्वतः प्रत्यक्ष येवून विविध विभागाकडून नादेय प्रमाणपत्र घेऊन लेखाविभागाकडे सादर करावे म्हणजे आपला देय असलेला पगार अदा करण्याबाबत विचार करण्यांत येईल."

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी  जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. १५.०५.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. ३१.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांचे महाविद्यालयाच्या उपस्थितीपटावरील स्वाक्षरीनुसार अपिलार्थी या महाविद्यालयात दि. २७.३.२००३ पर्यंत उपस्थित आहेत. त्यानंतर त्या विनापरवानगी अनुपस्थित आहेत, या पूर्वीच्या जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या दि. ३०.४.२००७ च्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांचे महाविद्यालयामध्ये समक्ष उपस्थित राहून विविध विभागाकडून 'ना देय' प्रमाणपत्र सादर करण्याची सूचना दिली होती. सदर 'ना देय' प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीचा पगार अदा करण्याची जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये तयारी दर्शविली होती.  तथापि या पत्राची दखल अपिलार्थीने घेतली नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.७.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या दि. ११.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. संबंधित महाविद्यालयाने त्यांना अद्यापि त्यांच्या वेतनाची रक्कम दिली नाही व या संदर्भात त्यांनी दिलेले अर्ज/निवेदने ते स्वीकारत नाहीत, त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ ज्या दि. ५.१२.२००६ व  २८.१.२००७ रोजीची पत्रे जन माहिती अधिकारी यांनी स्वीकृत करुन घेतली नाहीत, त्या रजिस्टर्ड  पत्रांची पाकीटे

त्यांनी आयोगास दाखविली. त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये असेही सांगितले की, त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे त्यांचेकडील २३.१२.२००३, १५.१०.२००४, १.१.२००५ व ५.७.२००६ च्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना सादर केले असता सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वीकृत  करण्यास नकार दिला. त्यांचे संपूर्ण थकित वेतन संबंधित महाविद्यालयाकडून प्राप्त व्हावे, अशी त्यांनी आपल्या युक्तीवादामध्ये शेवटी विनंती केली. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे ॲड. ए.बी.धोंगडे यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने त्यांचे माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. २,३,४ व ५ यामध्ये उल्लेख केलेले कोणतेही पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. अपिलार्थीची उर्वरित पत्रे त्यांनी स्वीकृत केली असून अपिलार्थीची दि. ५.१२.२००६ व २८.१.२००७ ची पत्र न स्वीकारण्याचे त्यांना कोणतेही कारण नव्हते.अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. २ मध्ये संदर्भित केलेल्या पत्रांची त्यांचे कार्यालयामध्ये कुठेही पोच नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांनी त्यांचेकडील दि. ३०.४.२००७ रोजीच्या पत्रामध्ये समर्पक उत्तर दिले आहे. अपिलार्थीस त्यांचे देय वेतन ते अपिलार्थीस ७ दिवसांचे आत देण्यास तयार आहेत. तथापि सदर वेतन अदा करतांना अपिलार्थी यांनी त्यांचे महाविद्यालयामध्ये हजर असावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. ११.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीतील एकूण ५ मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित ४ मुद्यांवरील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींशी सुसंगत नाहीत, अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाचे पुढीलप्रमाणे पुरेसे स्पष्टीकरण केले आहे.

> " **'माहिती'** याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे,

नमुने, प्रतिमाने(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती."

सदर व्याख्येचे अवलोकन करता अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १,३,४ व ५ मधील अपिलार्थीस अपेक्षित माहिती ही या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते, कारण या माहिती मध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा व कारणांची माहिती अपेक्षित केली आहे. अशा प्रकारचा खुलासा 'माहिती' या शब्दाच्या वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यासंबंधीच्या व्याख्येत बसत नाही. मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना भाग आहे. अपिलार्थीचे सदर दिनांकाचे अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्तच झाले नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अर्ज देण्यासाठी त्या जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष गेल्या असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे सदर अर्ज स्वीकृत करण्यास नकार दिला. अपिलार्थीने केलेल्या सदर अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांच्या या सर्व अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना महाविद्यालयामध्ये केलेल्या सेवेचे पूर्णकालीन वेतन त्यांना प्राप्त झाले नसल्याने सदर वेतन त्यांना प्राप्त होण्याकरता त्यांनी प्राचार्यांना विनंती केल्याचे दिसून येते, या चारही पत्रातील मजकुर एकसारखाच असून त्याचेतील आशयही एकच आहे. थोडक्यात, अपिलार्थी यांना त्यांनी संबंधित महाविद्यालयामध्ये केलेल्या कामाचे वेतन हवे असल्याचे येथे दिसून येते. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस देय असलेले संपूर्ण वेतन अपिलार्थीस सात दिवसाचे आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने सदर वेतन स्वीकारण्यासाठी त्यांचे महाविद्यालयात समक्ष हजर राहिले पाहिजे या अटीवर मान्य केले आहे, हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी, आयोगासमोर कबूल केल्याप्रमाणे कृती केल्यास

अपिलार्थीचे कोणतेही गाऱ्हाणे असण्याचे कारण उरणार नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस त्यांचे अर्जातील मुद्दा क्र. २ मधील अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ डॉ. सुनीता कुलभूषण धर्मराव,लोकपीठ ६७, शिवरामनगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमतनगर, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५४

निर्णय दिनांक : ०५.०५.२००८

१ श्री. अब्दुल रऊफ म.युसुफ, : अपीलार्थी
डॉ. बी.एस.पगारे कॉम्प्लेक्स, बसस्टॅण्ड रोड
भोकरदन ता.भोकरदन जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
बदनापूर जि.जालना.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपविभागीय कृषी अधिकारी,
जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अब्दुल रऊफ मोहम्मद युसुफ (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बदनापूर जि.जालना श्री. शिवनाथ माणिकराव घनघाव, ( त्यांना

यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना यांचे प्रतिनिधी तंत्र अधिकारी श्री. नंदकुमार अनंतराव टाक ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १०.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून तालुका कृषी अधिकारी श्री. एस.बी. पाटील यांचे कार्यकालामधील केलेल्या रोहयो कामासंदर्भात, एप्रिल २००४ ते १०.४.२००७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " तालुका कृषी अधिकारी एस.बी.पाटील यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये रो.ह.यो. योजनेवर किती खर्च केला व किती कामे तपासणी केली. त्यांची एकूण रक्कम व तपासणी केलेल्या एकुण कामांची माहिती मिळावी ? "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी केलेल्या मूळ अर्जामध्ये कामाचा तपासणी स्तर कळविला नाही, असे कळवून, अंतीमतः त्यांना माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ०७.०५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जासंदर्भात त्यांचे दि. १.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जामध्ये तपासणीस्तर स्पष्ट केला नसल्याने अपिलार्थीचे अपिल निकाली काढले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारे पत्र दिल्याचे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.तसेच ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीसाठी वारंवार उपस्थित राहिले असतांना देखिल त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही. मात्र संबंधितांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली गेली. अपिलार्थी हे, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते व्यक्तीशः उपस्थित राहिल्यासंदर्भात आयोगाकडे कोणताही लेखी पुरावा सादर करु शकले नाहीत. या प्रकरणी त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमानुसार कार्यवाही करण्याची त्यांच्या युक्तीवादामध्ये आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते.अपिलार्थीच्या दि.१०.४.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. २०.४.२००७ रोजी उत्तर देऊन अपिलार्थीकडे तपासणीस्तराची मागणी केली. अपिलार्थीने जर त्यावेळी तपासणीस्तर कळविला असता, तर ते अपिलार्थीस त्याचवेळी माहिती देऊ शकले असते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस १० दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे त्यांनी आज आयोगासमोर कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपीलार्थी यांनी दि. ७.५.२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलासंदर्भात, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ११.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस

आवश्यक ती माहिती देण्याच्या सूचना दिल्या होत्या. तद्नंतर त्यांचे दि. १.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थी यांच्या अर्जाद्वारे अपेक्षित केलेल्या माहितीत तपासणीस्तर स्पष्टपणे नमुद न केल्याने, अपिलार्थीचे अपिल निकाली काढल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील विषयासंदर्भात त्यांचेकडे दि. २५.६.२००७ रोजी म्हणजेच राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जानंतर अपिलार्थीने लेखी लिहून दिले की, त्यांना या माहितीची आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांचे या अर्जावर पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. १०.४.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये तपासणीस्तर निश्चितपणे स्पष्ट केला नसल्याने माहिती देण्याचे नाकारले. तपासणीस्तर या शब्दाचा अर्थ कोणत्या स्तरावरील अधिकाऱ्याने तपासणी केली असा होतो. अपिलार्थीच्या वरील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी श्री. एस.बी.पाटील तालुका कृषी अधिकारी यांनी तपासणी केलेल्या कामांची माहिती मागितली होती. याचा अर्थ अपिलार्थीस तालुकास्तरावरील तपासणी केलेल्या कामाची माहिती, विशेषतः श्री. एस.बी.पाटील यांनी तपासणी केलेल्या कामांची माहिती हवी होती.जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि. २०.४.२००७ व दि. १.६.२००७ रोजीच्या पत्रामध्ये तपासणीस्तर हा मुद्दा उपस्थित करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, असे या ठिकाणी दिसून येते. अपिलार्थीने तालुका कृषी अधिकारी श्री. पाटील यांनी तपासणी केलेल्या कामाची माहिती मागविली होती. सदर माहिती निश्चित अशा स्वरुपाची होती, परंतु अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना अवघड वाटल्यावरुन त्यांनी तपासणीस्तराचा मुद्दा उपस्थित करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळल्याचे दिसून येते. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी म्हणण्यासोबत अपिलार्थीने त्यांना दिलेल्या दि. २५.६.२००७ च्या पत्राची प्रत

सादर केली आहे. त्यामध्ये अपिलार्थीने स्पष्टपणे त्यांना या माहितीची आवश्यकता नसल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीने सदर कबूली त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिला नंतर (दि. १२.६.२००७ रोजी) दिलेली आहे, त्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना वाटले, म्हणून अपिलार्थी माहिती मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. या पत्रासंदर्भात अपिलार्थीस खुलासा विचारला असता, अपिलार्थीने कृषी खात्याच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडून या पत्रावर बळजबरीने सही करुन घेतल्याचे आयोगास सांगितले. अर्थात ते कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारची बळजबरी केल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. आज सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच अपिलार्थी यांनी त्यांना माहितीची आवश्यकता नाही, असे त्यांचेकडील दि. २५.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांना लिहून दिलेले असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाहीचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि त्यांना आयोगातर्फे या प्रकरणी त्यांनी केलेल्या कृतीबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे त्यांनी त्यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या अर्जांवर सकारात्मक दृष्टीकोण ठेवून कार्यवाही करावी, अशा त्यांना सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१.अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल रऊफ म.युसुफ,डॉ. बी.एस.पगारे कॉम्प्लेक्स, बसस्टॅण्ड रोड भोकरदन ता.भोकरदन जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बदनापूर जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९२

निर्णय दिनांक : ०५.०५.२००८

१ श्री. राधेश्याम गोपीकिशन मंत्री, : अपीलार्थी
१०, अमित अपार्टमेंट मंठा रोड,
जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
जालना विभाग, जालना.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सहा.धर्मादाय आयुक्त,
जालना विभाग, जालना.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राधेश्याम गोपीकिशन मंत्री, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत,तर जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना. जि. जालना श्री. यशवंत कौराजी कचरे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना श्री. साहेब विठ्ठलराव भुतके ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १५.०३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००१ ते २००३ या कालावधीतील बदनापूर येथील श्री. बालाजी मंदिर ट्रस्ट न्यास नोंदणी क्र. A१२८२ ची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) वरील ट्रस्टबाबत १)बद्रिनारायण श्रीराम मंत्री २) ताराचंद जगन्नाथ दुधानी रा. बदनापूर हयांची ३०.८.०१ ला परिशिष्ट अ मध्ये अकरा नावे दिली स.घ.आ.हयांनी २३.१.०३ रोजी 'परिशिष्ट अ' मध्ये अर्जदार क्र.२ सहित ५ (पाच) नावे कमी करुन तीन नवीन नावे कोणत्या निष्कर्षावर काढली व घेतली ते निष्कर्षाची माहिती देणे २) सदर प्रकरणी जाहीर प्रकटन आवश्यक नव्हते का? ३) सदरील किती व कोणत्या विश्वस्तांची संमतीपत्रे घेतली? ४) परिशिष्ट अ मध्ये ३२ लाखाची जंगम व स्थावर दर्शविली त्याबाबत सविस्तर माहिती देणे.५) सर्वसाधारण उत्पन्नाचा अंदाज दर्शविला काय? किती? कसा ६) सदरील परिशिष्ट अ मधिल नोंदीप्रमाणे ट्रस्टसंबंधी हिशोबांच्या व ईतर कागदपत्राच्या पाहणीसाठी काय कार्यवाही करावी लागेल हयाची माहिती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १६.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन खालीलप्रमाणे कळविले आहे.

> "उपरोक्त विषयीच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, आपण माहितीच्या अधिकारा खालील अर्जात मुद्दा क्रमांक एक ते सहा बाबत काय कार्यवाही केली, याबाबत मत मागविले आहे. त्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, वरील सर्व मुद्यान बाबत न्यायीक अधिकारी तथा मा.

सहाय्यक धर्मादाय आयुक्त जालना यांनी त्यांच्या अधिकारात निर्णय दिलेले आहेत, त्यामुळे न्यायीक अधिकाऱ्यांचे निश्कर्षाबाबत व निर्णयाबाबत मला अभिप्राय किंवा माहिती देता येत नाही.

आपण आपल्या वकिला मार्फत मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त,जालना यांचेसमोर तसा रितसर अर्ज सादर करावा. "

जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. २३.५.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे.अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.६.२००७ रोजी पारित केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या या निर्णयामध्ये अपिलार्थीचे अपिल फेटाळून लावले असून अपिलार्थीने संबंधित ट्रस्टच्या परिशिष्ट १ ची प्रमाणित प्रत प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सदर निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३०.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १५.३.२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दि. १६.४.२००७

रोजी योग्य ते उत्तर दिले आहे. अपिलार्थी यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही न्यायिक प्रकरणात दिलेल्या निर्णयातील कृती खरी वा खोटी अशा प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. न्यायिक प्रकरणी दिलेल्या निर्णयावर अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर देणे संयुक्तिक वाटत नसल्याने व उत्तर दिल्यास न्यायिक अधिकाऱ्याच्या कामावर टिकाटिप्पणी केल्याप्रमाणे होईल, असे वाटले, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस वरीलप्रमाणे उत्तर पाठविले.अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व त्यासंदर्भातील इतर माहिती, संबंधित प्राधिकरणाने दिलेल्या निर्णयामध्ये आहे व या निर्णयाची प्रत अपिलार्थीस प्राप्त झालेली आहे. संबंधित प्राधिकरणाने निर्णयाची प्रत अपिलार्थीस कधी पाठविली, अपिलार्थीस तो निर्णय कधी प्राप्त झाला, हे विचारले असता त्यांना निश्चित तारीख आठवत नाही, असे त्यांनी आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. २५.१.२००७ रोजी रुजू झाले असून ते या पदावर रुजू होण्यापूर्वी बदनापूर येथील बालाजी मंदिर न्यासाच्या संदर्भात तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त यांनी आदेश दिले होते. सदर आदेश त्यांनी त्यांना देण्यात आलेल्या पूर्णन्यायिक अधिकारितेमधील तरतुदीअन्वये दिले होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीची कारणमिमांसा या निकालपत्रात दिलेली आहे. अपिलार्थीच्या दि. २३.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर त्यांनी १.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १८.६.२००७ रोजी पारित केले आहेत. सदर आदेश अपिलार्थीस प्राप्त झाले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त यांनी संबंधित न्यासासंबंधी घेतलेला निर्णय कोणत्या निष्कर्षावर आधारित होता, याची प्रामुख्याने विचारणा केली होती व या संदर्भात त्यांनी वेगवेगळे प्रश्न त्यांचे वरील माहितीच्या अर्जात उपस्थित केले आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात उपस्थित केलेल्या मुद्या क्र. २ संदर्भात अर्जदारांची नावे काढणे व घेणे याबाबतचा निर्णय घेणे अथवा जाहीर प्रगटन करुन नंतर त्याद्वारे निर्णय घेणे, हे सहायक धर्मादाय आयुक्त यांचे स्वेच्छाधिकार आहेत, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले. तत्कालीन सहायक धर्मादाय आयुक्त यांनी स्वेच्छाधिकारात निर्णय घेतल्याने त्यांनी हा निर्णय घेतांना कोणते निष्कर्ष लावले, हे अपिलार्थीस आता ज्ञात करुन देता येणे शक्य नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ व ५ संबंधातील माहिती संबंधित न्यासाच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेली आहे. अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दा क्र.३ ची माहिती अपिलार्थीस संबंधित कागदपत्रांची प्रत्यक्षात तपासणी केल्यानंतरच मिळू शकेल, असे आयोगास वाटते. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांना संबंधित कागदपत्रांची तपासणीसाठी काय कार्यवाही करावी लागेल, याची माहिती विचारली होती. याचे उत्तर अगदी सोपे आहे. अपिलार्थी यांनी संबंधित न्यासाशी संबंधित कागदपत्रांची नस्ती व अभिलेखे पहाणीसाठी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(ज)(एक) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे वेगळयाने अर्ज केल्यास, अधिनियमातील वरील तरतुदीनुसार सदर अभिलेखे व नस्त्या जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्या लागतील. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारलेली आहे. तथपि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती, अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे सदर न्यासासंबंधी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखे व नस्त्यांची पहाणी केल्यानंतरच त्यांना मिळू शकेल, असे आयोगास वाटते. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे बदनापूरस्थित बालाजी मंदिर न्यासाशी संबंधित नस्त्यांची पहाणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांचेकडे अधिनियमातील वरील तरतुदीनुसार आवश्यक तो

अर्ज वेगळयाने करावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अशाप्रकारच्या नस्तींच्या पहाणीसाठीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी विषयाधीन न्यासासंबंधीच्या संपूर्ण नस्त्या व अभिलेखे अपिलार्थीस त्यानंतर ३० दिवसांचे आत पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्या, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ संबंधी माहिती न देऊन अपिलार्थीस त्यांचे दि. १६.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या अर्जावर त्यांनी आवश्यक ती कार्यवाही सकारात्मक दृष्टीकोनातून करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राधेश्याम गोपीकिशन मंत्री, १०, अमित अपार्टमेंट मंठा रोड,जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९३

निर्णय दिनांक : ०५.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बाबूराव माणिकराव खाटीक,<br>मु.दिनापूर पो.धुपखेडा ता.पैठण,<br>जि. औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दिनापूर,<br>ता.पैठण, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, पैठण जि. औरंगाबाद | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. बाबूराव माणिकराव खाटीक, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दिनापूर पो. धुपखेडा ता.पैठण जि. औरंगाबाद श्री. घनःशाम रामा गायकवाड, सध्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,दिनापूर श्री. राम जगन्नाथ ढेपे (त्यांना यापुढे

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (पंचायत) श्री. कैलास तुकाराम जाधव (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०७.०४.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून १.४.२००४ ते ७.४.२००७ मधील कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १.४.२००४ ते ७.४.२००७ या काळात ग्रा.पं.राबवलेल्या विविध योजनावर करण्यात आलेल्या खर्चाचा तपशिल व अंकेक्षकाचा अहवाल.
>
> ग्रा.पं.ला मिळालेली रक्कम व खर्च केलेला तपशील. रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांचे हजेरीपत्रक व पगारपत्रक"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांचेकडील दि. ०७.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रु.१०/- इतके शुल्क त्यांच्या कायाल्यात/बँकेत भरण्याची सूचना केली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. १६.५.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना जाणुनबूजून चुकीची,अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तसेच सदर माहिती तपशीलवार नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी दि. २५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संबंधी आपले आदेश दि. २७.७.२००७ रोजी पारित केले आहेत. या अपिल निर्णयामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत

" केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदार श्री. बाबूराव मानिकराव खाटीक, यांना या पुर्वी देण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे आता संबंधितास त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संपुर्ण तपशीलवार माहिती देण्यात यावी व आवश्यक असलेले अभिलेखे त्यांना पहाण्यास उपलब्ध करुन देण्यात यावे. व त्यामधुन त्यांना हवी असलेल्या अभिलेख्यांच्या प्रती विनाविलंब देण्यात याव्यात. "

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३१.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल करुन त्यामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडून ग्रामसेवकावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व त्यांना आवश्यक असलेली कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये सदर कामाचा तपशील दिलेला नाही. कामाचा तपशील म्हणजे निश्चितपणे अपिलार्थीस काय अपेक्षित आहे, असे विचारले असता अपिलार्थी यांनी ग्राम पंचायतीतर्फे केल्या गेलेल्या कामावरील मजूरीचा खर्च किती झाला व किती सिमेंट वापरले गेले याबाबतचा तपशील हवा होता. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये त्यांना एकूण रु.५७३७५/- इतका निधी मिळाल्याचे नमुद केले आहे. तथापि त्यांनी कामावर केलेल्या खर्चाची बेरीज केली असता ती ७६५००/- इतकी येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. मिळालेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च कसा केला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना विचारले

असता, त्यांनी त्यावेळी त्यांचेकडे यापूर्वीच्या कालावधीतील अखर्चित निधी उपलब्ध होता व त्यामधून ही जास्तीची रक्कम खर्च केली असल्याचे आयोगास सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांना, १२ व्या वित्त आयोगानुसार प्राप्त निधी व घेतलेल्या कामांची माहिती विचारली असता, जन माहिती अधिकारी यांनी रु.४७४५०/- इतका निधी प्राप्त झाला परंतु त्यामधून खर्च कमी झाला असे सांगितले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी एकूण शिल्लक रकमेचा उल्लेख या ठिकाणी करावयास हवा होता, तथापि त्यामध्ये त्यांनी अशाप्रकारचा उल्लेख केला नाही. या उदाहरणावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस पंचायत समिती मार्फत दि. ७.५.२००७ रोजी त्यांनी सदर माहिती पोटीचे रु. १०/- इतके शुल्क पंचायत समिती कार्यालयामध्ये भरल्यानंतर दि. ७.५.२००७ रोजी देण्यात आली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या दि. १६.५.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी दि. २५.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन दि. २७.७.२००७ रोजी आपले आदेश पारित केले असून अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांना सूचना केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी पंचायत समितीमार्फत दि. ७.५.२००७ रोजी दिलेली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने विचारलेल्या माहितीतील अंकेक्षकाचा अहवाल (ऑडीटर रिपोर्ट) या मुद्याव्यतिरिक्त इतर सर्व माहिती अपिलार्थीस दिली आहे. अंकेक्षकाचा अहवाल त्यांचे स्तरावर उपलब्ध होत नसल्याने त्यांनी तो अपिलार्थीस दिला नसावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थी यांनी फक्त

'खर्चाची तपशीलवार माहिती' हा शब्द वापरला आहे. तथापि तपशीलवार म्हणजे अपिलार्थीस नेमक्या कोणत्या मुद्यावर माहिती हवी आहे, निश्चितपणे त्या शब्दाचा काय अर्थ आहे, याचे त्यांनी स्पष्टीकरण न केल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सद्सद्विवेक बुध्दीला पटेल अशी माहिती अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल मोघम निर्णय दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी किमान या टप्प्यावर तरी, अपिलार्थीस तपशीलवार या शब्दामध्ये अंतर्भूत होणाऱ्या मुद्याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांना करणे, योग्य ठरले असते, तथापि त्यांनीही, अपिलार्थीस तपशीलवार माहिती देण्याची व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे, पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्याची मोघम सूचना केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती देण्याचा दृष्टीकोन जरी सकारात्मक असला तरी त्यांनी या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ या नात्याने अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या तपशीलवार या शब्दातील अंतर्भूत मुद्याविषयी जन माहिती अधिकारी यांना अवगत करुन देणे अपेक्षित होते, असे आयोगाचे मत आहे. मूळात अपिलार्थीने मोघम स्वरुपात माहिती मागितलेली आहे व अपिलार्थीच्या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या बुध्दीला पटेल, अशी माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत दिली आहे, हे पाहता अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक माहितीचे शुल्क न स्वीकारता सदर शुल्क पंचायत समिती स्तरावर स्वीकारले गेले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सरळ माहिती न देता अपिलार्थीने विचारलेली माहिती प्रथम पंचायत समिती कार्यालयात सादर करुन नंतर पंचायत समिती कार्यालयातर्फे अपिलार्थीस माहिती देण्यात आली. वास्तविकतः या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे माहितीपोटीच्या आवश्यक त्या शुल्काची मागणी करुन, सदर शुल्क अपिलार्थीने त्यांचेकडे भरल्यानंतर अपिलार्थीस ती माहिती सरळ त्यांना देणे

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अभिप्रेत आहे, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती या प्रकरणी केली नाही, सबब जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येते की, यापुढे त्यांनी त्यांच्या कडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहितीसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जाबाबत अर्जदारास माहिती मिळण्यास विलंब होईल, अशा प्रकारच्या चुका टाळाव्यात.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबूराव माणिकराव खाटीक, मु.दिनापूर पो.धुपखेडा ता.पैठण जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत दिनापूर पो.धुपखेडा ता.पैठण जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९४

निर्णय दिनांक : ०५.०५.२००८

१ श्री. नंदकुमार किसनराव खामकर, : अपीलार्थी
मु.पो.तेरखेडा ता.वाशी जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तहसीलदार, वाशी,
जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपविभागीय अधिकारी, भूम,
जिल्हा उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नंदकुमार किसनराव खामकर, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाशी जि. उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी अव्वल कारकुन श्री. कमलाकर किसनराव देशमुख, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम जि.उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी अव्वल कारकुन श्री. ज्योतिराम

लक्ष्मण कोरे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २१.०२.२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे तेरखेडा येथील स्वस्त धान्य दुकाने क्र.१,२,३ व ४ च्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) अंत्योदय योजनेतील कार्ड धारकांची संख्या व त्यांची नावे, त्यांना देण्यात येणारे धान्याच्या पावत्या.

२) ए.पी.एल.

३) बी.पी.एल.अन्नपूर्णा या योजनेतून येणारे धान्य किती येते.(कोण)त्या ग्राहकांना दिलेल्या पावत्या. या सर्व योजनांचे

४) दरपत्रक वाटपाची माहिती सन २००५ ते २००७ पर्यंतची,

५) प्रत्येकी दुकानातील कार्डधारकाची मुळ कार्ड संख्या व नवीन कार्डधारक संख्या.

६) रो.ह.यो. व संपूर्ण उपयोजना यांच्या अंतर्गत वाटप झालेल्या मजूरांचीयादी व धान्य वाटपांच्या पावत्या."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

या अर्जावर त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे. तथापि त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी या अर्जासोबत सादर केले नव्हते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ११.४.२००७ रोजी प्रथम अपिल सादर

केले आहे.अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता आपले आदेश सरळ दि. २५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपिल मंजूर करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आठ दिवसांचे आत देण्याची जन माहितीअधिकारी यांना सूचना केली. जन अपिलीय अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांचे निर्णयाद्वारे आदेशित केले होते, तरी त्या वेळेपर्यंत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबत कोणताही पुरावा सादर केला नव्हता. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपोटी एकूण रु.६०१८/- इतके शुल्क बँकेत जमा करण्याविषयी अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थी यांनी ते दारिद्रयरेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २४.७.२००७ रोजी म्हणजेच जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय पारित झाल्यानंतर चार महिन्यांनंतर सादर केले आहे. अपिलार्थीचे सदर प्रमाणपत्र प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संकलीत करुन ती त्यांना दि. ३०.९.२००७ रोजी देऊ केली. तथापि सदर माहिती अपिलार्थी यांनी स्वीकृत केली नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २७.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले, सदर अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांना दिलेल्या मुदतीत माहिती न दिल्याने आयोगाकडे सदर अपिल दाखल केल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून वेळेत माहिती प्राप्त झाली नाही, जन माहिती अधिकारी

यांनी, त्यांचा मूळ अर्ज सादर झाल्यानंतर ३५ दिवसात माहिती द्यावी, असे त्यांना अपेक्षित होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर दंडाची कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, दि. २१.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र जोडले नव्हते, त्यांनी या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, एवढेच म्हटले होते. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचेकडे त्यांनी दाखल केलेल्या अपिलावरील अपिल निर्णय प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याचे दि. ११.९.२००७ रोजीचे त्यांचे पत्रान्वये अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर प्रमाणपत्र दि. २४.९.२००७ रोजी त्यांचेकडे सादर केले. अपिलार्थीचे सदर प्रमाणपत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दि. ३०.९.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये देऊ केली असता अपिलार्थीने सदर माहिती घेण्याचे नाकारले. अपिलार्थीस सदर माहिती त्यांनी हलका शिपाई, येरमाळा यांचेमार्फत देऊ केली होती. अपिलार्थीने सदर माहिती स्वीकृत न केल्याने संबंधित शिपायाने सदर माहिती त्यांना परत आणून दिली. आज रोजी सदर माहिती त्यांनी सोबत आणली असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ११.४.२००७ रोजीच्या अपिल अर्जावर त्यांनी दि. २५.५.२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अर्ज करतांना त्यांनी संबंधित ग्रामपंचायतीने दिलेले दि. १४.२.२००७ रोजीचे प्रमाणपत्र सादर केले होते, तथापि या प्रमाणपत्रावर ग्राम विकास अधिकाऱ्याची सही असल्याने ते अवैध ठरत होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने वरील अर्ज करते वेळी ते स्वतः दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचा त्यांच्या अर्जात उल्लेख केला होता,

तथापि या प्रथम अर्जासोबत कोणताही वैध पुरावा जन माहिती अधिकारी यांना सादर केला नव्हता. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दि. १४.२.२००७ रोजीचे त्यांना ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेले प्रमाणपत्र सादर केले होते व यावर ग्रामसेवकाची सही होती. तथापि ग्रामसेवकाच्या सहीने ग्राम पंचायत स्तरावर दिले जाणारे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र हे वैध मानण्यात येत नाही. अपिलार्थीने सादर केलेले त्यांचे दारिद्रयरेषेखालील वैध प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांना प्रथमतः दि. २४.९.२००७ रोजी प्राप्त झाले होते. तद्नंतर त्यांनी दि. ३०.९.२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांचे कार्यालयातील शिपायामार्फत उपलब्ध करुन दिली होती. परंतु अपिलार्थीने या प्रकरणी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल केले असल्याच्या कारणावरुन सदर माहिती स्वीकृत करण्याचे नाकारले होते.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती आयोगास दाखविली. सदर माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अर्जासोबत त्यांचे दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत कोणताही पुरावा सादर केला नव्हता, अपिलार्थीने वैध प्रमाणपत्र दि. २४.९.२००७ रोजी सादर केल्यानंतर, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी लागलीच आवश्यक ती माहिती तयार करुन अपिलार्थीस ती विनामूल्य देऊ केली आहे, तथापि अपिलार्थीने सदर माहिती स्वीकृत करण्याचे नाकारले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही, त्यामुळे त्यांचेवर कोणत्याही प्रकारच्या कारवाईचे आदेश नाहीत. मात्र अपिलार्थीची सदर माहिती स्वीकृत न करण्याची त्यांची कृती त्यांचेवर निश्चितपणे दोषारोपण करते. अशाप्रकारे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यास ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने व आज रोजी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांचेतर्फे अपिलार्थीस विनामूल्य देण्यात

आली आहे, हे पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रसंगावशात् आयोगास असे आढळून आले की, मूळात जन माहिती अधिकारी यांचेकडे विस्तृत व्याप्ती असलेली माहिती मागावयाची, सदर अर्ज करतांना दारिद्रयरेषाखालील प्रमाणपत्र सादर करावयाचे किंवा न करावयाचे, सदर माहितीची व्यक्तीशः मागणी करावयाची व माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः कधीही कार्यालयात उपलब्ध व्हावयाचे नाही व विहित मुदतीनंतर विनामूल्य माहितीसाठी दावेदार व्हावयाचे अशाप्रकारची प्रवृत्ती समाजात मोठया प्रमाणात वाढीस लागल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारच्या प्रवृत्तींना वेळीच आळा न घातल्यास माहितीचा अधिकार अधिनियमाची धार बोथट होण्यास फार वेळ लागणार नाही, असे आयोगास वाटते. यादृष्टीने आताच या बाबींवर सर्वस्तरावर विचार होणे आयोगास आवश्यक वाटते.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदकुमार किसनराव खामकर, मु.पो.तेरखेडा,ता.वाशी, जि.उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाशी जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९१

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. बस्वराज नागठाणे, : अपिलार्थी
सिडको एन ५, घर नं. ८१२
सह्याद्रीनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बस्वराज नागठाणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. प्रमोद खुशाल पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री.

बलभिम रामभाऊ देवणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००६ ते ०१-११-२००६ या कालावधीतील त्यांच्या भांडार व लेखा शाखेशी संबंधीत माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

> " वरील विषयी विनंती की, १ जानेवारी २००६ ते १ नोव्हेंबर २००६ या कालावधीत स्टोअरला काय काय खरेदी करण्यात आले त्याची कोटेशनच्या प्रती व त्याची बिले मिळावे तसेच मार्च २००६ या महिन्यात कोणकोणत्या हेडला किती एल. ओ. सी. आली व ती कशी खर्च केली त्याचे विवरण द्यावे. मार्च महिन्यातील खर्चाचा तपशील कॅशबुकच्या झेरॉक्स प्रतीसह मिळावे ही विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी काही माहिती प्राप्त करुन देण्यापोटी रुपये ४०० /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व काही माहिती तयार करण्याची कारवाई चालू केली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुचनेनुसार अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००६ रोजी रुपये ४०० /- इतक्या रक्कमेचा भरणा केला. तदनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी भांडार शाखेची माहिती त्यांना दिनांक ०४-०१-२००७ रोजी हस्तांतरीत केली. सदर माहिती प्राप्त झाल्यापृष्ट्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१२-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर पोचसही दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना उर्वरीत माहिती मिळण्याची मागणी केली आहे व माहिती न देणा-या अधिका-यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-०४-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)

अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत पुरविली नाही. ते ज्या ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले त्या त्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस सर्व प्रथम भांडार शाखेची माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ते शुल्क आकारुन दिली आहे. भांडार शाखेची उर्वरीत माहिती त्यांनी दिनांक १८-०३-२००७ रोजी दिली. तर लेखा शाखेशी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०३-२००८ रोजी पुरविली आहे. दिनांक १८-०३-२००७ व २८-०३-२००७ रोजी अपिलार्थीस दिलेल्या माहितीकरिता कोणतेही शुल्क आकारलेले नाही. अपिलार्थीस ही माहिती देण्या-करिता लेखा शाखेतील तत्कालीन वरिष्ठ लेखा लिपीक यांच्यामुळे उशीर लागला.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-०४-२००७ रोजी पारीत केले.

या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठी होती. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी काही भाग जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सहज देणे शक्य होते. या भागापैकी भांडार शाखेशी संबंधीत माहिती अपिलार्थीस दिनांक ०४-०१-२००७ रोजी त्यांनी दिली व उर्वरीत माहिती दिनांक १८-०३-२००८ रोजी दिली. तर लेखा शाखेशी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांनी दिनांक २८-०३-२००८ रोजी दिल्याचे दिसून येते. भांडार शाखेची उर्वरीत माहिती व लेखा शाखेशी संबंधीत संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांना १ वर्ष ३ महिने ७ दिवस इतका विलंब लागलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला हा विलंब निश्चितपणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कार्यालयातील विविध शाखेकडून प्राप्त करुन घेऊन ती एकत्रित स्वरुपात अपिलार्थीस द्यावयाची होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती

देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता अपिलार्थीस विलंबाने माहित प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी अशा त-हेने जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी जबाबदार आहेत व त्यांनी स्वतःला त्यांच्या कृतीव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी पात्र ठरविले आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जून २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांना आता संपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यसंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

३.	अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांनी वरील आदेश क्रमांक २ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक	०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. बस्वराज नागठाणे, सिडको एन ५, घर नं. ८१२ सह्याद्रीनगर, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२२

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. पंढरीनाथ विक्रम पा. अंभोरे, : अपिलार्थी
मु. पो. शेलगाव तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा पोलीस अधीक्षक, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष पोलीस महानिरिक्षक,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

जन अपिलीय अधिकारी : पोलीस अधीक्षक, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पंढरीनाथ विक्रम पा. अंभोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय श्री. महेंद्र गोपीनाथ भोकरे व

विशेष पोलीस महानिरिक्षक परिक्षेत्र औरंगाबाद यांचे प्रतिनिधी पोलीस उप अधीक्षक श्री. प्रल्हाद संपतराव कस्तुरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर पोलीस अधिक्षक जालना व विशेष पोलीस महानिरिक्षक परिक्षेत्र औरंगाबाद हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या खात्यांतर्गत पोलीस प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" लाच लुचपत खात्या अंतर्गत पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल झालेल्या व त्याअंतर्गत निलंबीत झालेले व न निलंबीत झालेले पोलीस व पोलीस अधिकारी याची यादी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी लाच लुचपत खात्यांतर्गत पोलीस अधिकारी

व कर्मचा-यावर नोंदविलेले गुन्हे व निलंबीत न झालेल्या कर्मचा-यांची यादी मागितली होती.

अपिलार्थीने सदर अपील विशेष पोलीस महानिरिक्षक, औरंगाबाद यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी विशेष पोलीस महानिरिक्षक हे जन अपिलीय अधिकारी नसल्यामुळे व पोलीस अधीक्षक जालना हे जन अपिलीय अधिकारी असल्याने विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा सदर अपील अर्ज पोलीस अधीक्षक, जालना जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे पाठविला व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने त्यांच्या कडील दिनांक १८-०६-२००७ रोजी विशेष पोलीस महानिरिक्षक, औरंगाबाद यांच्याकडे केलेल्या एका अर्जास अनुसरुन विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालयाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जातील निम्मी माहिती पुरविली. सदर माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचा काही भाग आहे. विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक ०३-०७-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली होती. तथापि सदर माहिती प्राप्त होण्यापुर्वीच व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे फलक सहजपणे दृष्टीस पडतील अशा पध्दतीने लावलेले नाहीत. त्यांनी माहितीसाठीचा केलेला अर्ज जर चुकीच्या प्राधिकरणाकडे केला होता तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत सक्षम प्राधिकरणाकडे पाठवून द्यावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत त्यांना पुरविण्यात आलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे व सदर माहिती देखील त्यांना ६० दिवस इतक्या विलंबाने प्राप्त झाली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटी भरावे लागणारे शुल्कासंदर्भात काहीही कळविले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार संबंधीत पोलीस निरिक्षक यांच्याकडे होता. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १८-०४-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थी सदर माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात हजर होतील या अपेक्षेने त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस त्यावेळी पाठविली नाही. अपिलार्थी यांचा मुलगा त्यांच्या विभागात नोकरीस असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मुलास दिनांक २०-०४-२००७ व दिनांक ३०-०४-२००७ रोजी बोलावून सदर माहिती त्यांच्या वडिलांनी अद्याप नेली नाही म्हणून ही माहिती त्यांना घेऊन जाण्यास सांगावे असे सूचित केले. तदनंतर अपिलार्थी येण्याची दिनांक ३०-०४-२००७ पर्यंत वाट पाहून त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या

पत्त्यावर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पाठवून दिली. सदर माहिती त्यांनी विशेष पोलीस महानिरिक्षक यांना त्यांच्या दिनांक २९-०६-२००७ व ०२-०७-२००७ च्या पत्रान्वये देखील पाठविली होती.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला. तथपि ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नसल्याने, त्यांनी अपिलार्थीचे अपील पोलीस अधीक्षक जालना यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००७ रोजी आवश्यक त्या कार्यवाही-साठी पाठविले. याच विषयावर अपिलार्थीने त्यांच्याकडे १८-०६-२००७ रोजी स्वतंत्र अर्ज केला असता, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी, त्यांच्याकडील अपील अर्जात मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यावर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ अन्वये त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीत कारवाई करणे जरुरीचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारे कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक १८-०४-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती व सदर माहिती तयार असल्याबाबत अपिलार्थीच्या मुलास सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे कारण अपिलार्थी व त्यांचा मुलगा या दोन्ही वेगवेगळ्या व्यक्ती

आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती. अर्थात अपिलार्थी जरी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तीशः हजर झाले नाहीत, तरी त्यांनी दिनांक ३०-०४-२००७ रोजी विहित मुदतीत पोस्टाने माहिती पाठविल्याचे ते सांगत आहेत. अपिलार्थीस त्यांनी पोस्टाव्दारे माहिती पुरविल्याचा कोणत्याही पुरावा ते आज आयोगास सादर करु शकले नाहीत. यावरुन अपिलार्थीस खरोखरच माहिती मिळाली किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार असून ते अपिलार्थीस ती ३ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत, हे पाहता संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे म्हटले आहे. तथापि युक्तिवादाच्या शेवटी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादातील सदर माहिती खोटी असल्याबाबतचे अभिप्राय त्यांनी चुकीने व्यक्त केल्याचे आयोगासमोर सांगितले. त्यामुळे अपिलार्थीस संबंधीत प्राधिकरणाकडून अपूर्ण माहिती मिळाली एवढाच मुद्दा विचारार्थ राहतो. अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी तयारी दर्शविली आहे हा मुद्दा देखील आता निकाली निघत आहे.

या प्रकरणी आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने जर व्यक्तिशः माहिती मागविली होती तर अपिलार्थीस सदर माहितीपोटी भरावे लागणारे शुल्क कळविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची होती. उपरोक्त प्रकरणी त्यांनी आपले हे कर्तव्य नीटपणे पार पाडले नसल्याचे आयोगाच्या

निदर्शनास आले आहे. त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्यदक्षतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे. इतःपर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सतर्कतेने कार्यवाही करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद<br>
दिनांक ०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंढरीनाथ विक्रम पा. अंभोरे, मु. पो. शेलगाव तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष पोलीस महानिरिक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२३

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. नारायण आसाराम शेंगुळे, : अपिलार्थी
एन १२, जी ५५, स्वामी विवेकानंद नगर,
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद

३ त्रयस्थ पक्ष : : विद्यासागर कन्याप्रशाला खंडाळा तालुका वैजापूर जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण आसाराम शेंगुळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. महमद अब्दुल खालिक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण

उपसंचालक श्रीमती सुमन देशमाने (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९९ ते २००६ या कालावधीतील विद्यासागर कन्या प्रशाला खंडाळा तालुका वैजापूरच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" वरील कालावधीच्या सर्व संच मान्यता शाळेच्या प्रस्तावासहीत प्रस्तावावरील आपल्या कार्यालयाच्या मान्यतेसह. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका विद्यासागर कन्या प्रशाला यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे व त्यांच्याशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आपली मागणी विद्यासागर कन्या प्रशाला यांच्याकडे करण्याबाबत त्यांच्या दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले व त्याची प्रत अपिलार्थीस देऊन यासंदर्भातील माहिती त्यांनी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापिकेकडून घ्यावी असे त्यांना सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, विद्यासागर कन्या प्रशाला या संस्थेने १९९९ ते २००६ मध्ये ज्या शिक्षकांच्या नेमणुकीचे प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केले होते त्या शिक्षकांच्या नेमणुकीच्या मान्यतेच्या प्रस्तावाची प्रत त्यांना हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये मागणी केलेली माहिती ही नव्याने केली असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये शाळेच्या संच मान्यतेच्या प्रतीची १९९९ ते

२००६ या कालावधीशी संबंधीत मागणी केली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापिकेने देणे अभिप्रेत असल्याने त्यांनी अपीलार्थीचा अर्ज दिनांक १३-१०-२००६ रोजी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापिकेकडे पाठविला. संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वयें आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविलेल्या पत्राची प्रत त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना पाठविली आहे. या पत्रावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती, त्यांना दिली असल्याचे दिसून येते. अपिलार्थी हे सध्या या शाळेचे सचिव असून अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत शाळेकडे उपलब्ध असते. अशा प्रकारच्या माहितीचे अपिलार्थी हेच मुळात विश्वस्त आहे. अपिलार्थीने संच मान्यतेच्या प्रती संदर्भात माहिती मागितली आहे. प्रत्येक शाळेस त्यांच्याकडील शिक्षण विभागाची संख्या निश्चित करण्याकरिता दरवर्षी वेगवेगळी संच मान्यता विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार दिली जाते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे केलेली माहितीची मागणी व वरील प्रमाणे केलेला युक्तिवाद पूर्णतः भिन्न असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात यावे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्या जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमल्या गेल्या नसल्याने त्यांनी कोणतीही कारवाई न करता जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले व त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रें पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून वैयक्तीक मान्यतेच्या प्रती हव्या आहेत तथापि त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना संच मान्यतेच्या शाळेच्या प्रस्तावासहीत अशा प्रकारची मागणी केली. शाळेच्या निश्चित कोणत्या प्रस्तावाची त्यांना माहिती हवी आहे हे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. अपिलार्थीने मागितल्याप्रमाणे संबंधीत संस्थेचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संच मान्यतेच्या प्रती पुरविल्या होत्या. संच मान्यता प्रतीमध्ये फक्त विद्यार्थ्यांची संख्या व तुकड्या एवढाच तपशील दिलेला असतो मात्र अपिलार्थी यांना ते या संस्थेचे सचिव होण्यापुर्वी केलेल्या विविध नेमणुकासंदर्भात व नेमके शिक्षणाधिकारी कार्यालयाने दिलेल्या मान्यतेसंदर्भात माहिती हवी आहे. सदर माहिती ज्या मुख्याध्यापिकेच्या ताब्यात आहे त्या मुख्याध्यापिकेस आता संस्थेने कामावरुन काढले असून सदर माहिती संस्थेकडे उपलब्ध नाही मात्र ती त्यांना हवी आहे. अशा परिस्थितीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सदर संस्थेस सहाय्य करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, संबंधीत संस्थेने मागितलेली कागदपत्रे त्यांना पुरविण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन त्यांना पूर्ण सहकार्य करावे. मात्र या कामी अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमानुसार वेगळा अर्ज करावा लागेल हेही त्यांच्या ध्यानात आणून देण्यात येत आहे. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागतांना ज्या चुकीच्या स्वरुपात माहिती मागविली आहे व ज्या स्वरुपात त्यांना ती माहिती संबंधीत संस्थेच्या जन माहिती अधिका-याने पुरविली आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक ०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण आसाराम शेंगुळे, एन १२, जी ५५, स्वामी विवेकानंद नगर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२५

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. वसंत निशिकांतराव मसलेकर, : अपिलार्थी
माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक
बांधकाम उपविभाग, माजलगाव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, अंबाजोगाई
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वसंत निशिकांतराव मसलेकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव यांचे प्रतिनिधी शाखा अभियंता श्री. केशव नारायण नरवाडकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन

अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. विलास लक्ष्मणराव कांबळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजलगाव शहरातील जुने बसस्थानक ते चुनूमा चौकापर्यत त्यांनी केलेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. जुने बसस्थानक चुनूमा चौकापर्यत झालेले सिमेंट रोड बांधकामाबाबतचे अंदाजपत्रक किती रु. होते त्या कामासंदर्भात कोणाचे निविदा प्राप्त झाल्या होत्या ते काम कोणास दिले होते.

२. त्या कामाची गुणनियंत्रकाकडून तपासणी केली का? नाही तर कारण?

३. त्या रोडचे काम हे बोगस स्वरुपाचे झाले आहे. सदर रस्ता काही दिवसात खराब झाला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याचे अनेक रुपये पाण्यात गेले आहेत. सदर गुत्तेदार विरुध्द काय कार्यवाही केली. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. सुनावणी न घेण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळून लावल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिका-यास त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांना आदेश देण्याची विनंती केली आहे. व जन माहिती अधिकारी हे दोषी असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस ज्या कामासंदर्भात माहितीची आवश्यकता होती त्या कामाचे अंदाजपत्रक व इतर तपशील घेऊन ते दिनांक २९-०४-२००८ रोजी अपिलार्थी यांच्या निवासस्थानी

गेले असता, अपिलार्थीने त्यांच्याकडून माहिती स्विकृत करण्यास नकार दिला. अपिलार्थीने मागितलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थी यांचा दिनांक ०३-०३-२००७ रोजीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०४-०३-२००७ रोजी प्राप्त झाला असल्याचे त्यांनी या सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याचे कारण ते आज आयोगासमोर पुरेशी संधी देऊनही स्पष्ट करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची व्याप्ती व स्वरुप अतिशय मर्यादित व सोपे होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याची जर जन माहिती अधिकारी यांची इच्छा असती तर, एक दिवसाच्या आत देण्याइतपत ती सोपी होती. परंतु नागरिकांच्या अर्जाप्रती बेपर्वाई वृत्ती व स्वतःतील निष्क्रीयता यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही. ज्यावेळी आयोगाच्या सुनावणीची नोटीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे गेली त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थी यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००८ रोजी त्यांच्या प्रतिनिधीस माहितीसह अपिलार्थीकडे पाठविले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता या माहितीतील मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारली आहे ती माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील माहिती च्या व्याख्येशी सुसंगत नाही त्यामुळे मुद्दा क्रमांक २ संदर्भात गुणनियंत्रकाने तपासणी न करण्याचे कारण त्यांनी अपिलार्थीस कळविण्याचा गरज नाही. मात्र उर्वरीत मुद्यावर त्यांनी अपिलार्थीस माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना कलम ६ (३) नुसार ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या दिनांक २९-०४-२००८ रोजीच्या माहिती पत्राचे अवलोकन करता सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत अशी असल्याचे दिसते. अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती जरी प्राप्त होणार असली तरी ती अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त होणार आहे. सार्वजनिक प्राधिकरणाकडे कोणत्याही स्वरुपाची माहिती मागण्याचा हक्क माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे नागरिकांना त्यातील कलम ३ अन्वये प्राप्त झाला आहे तर कोणत्याही भारतीय नागरिकाने मागितलेली माहिती त्यास देणे हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील कलम ७ अन्वये प्रथम कर्तव्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी हे कर्तव्य नीटपणे पार पाडले नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून दीर्घकाळ वंचित ठेवण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव, बेपर्वाई व निष्क्रीयता स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. ही तरतूद पाहता या प्रकरणी अपिलार्थीस एवढ्या प्रदीर्घ कालावधी पासून माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी जबाबदार असलेले संबंधीत जन

माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे सर्व जण जबाबदार ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त हेण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दिर्घकाळ वंचित ठेवल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जून २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

४. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई यांनी वरील आदेश क्रमांक ३ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक ०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत निशिकांतराव मसलेकर, पाटील गल्ली, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५५

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसूल, : अपिलार्थी
घर नं. १-१६-३२,
जुना बाजार, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य प्रशासन अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक आरोग्य सेवा,
औरंगाबाद

निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसूल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा श्री. महमद एकबाल जिलानी (यापुढे त्यांना जन अपिलीय

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासन अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००१ ते ०५ मे २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-याबद्दल व नंतर सदर आदेश रद्द केल्यासंदर्भात त्यांच्या अधिपत्याखाली जिल्ह्याशी संबंधी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> ‘ तालुका कृषी अधिकारी एस.बी.पाटील यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये रो.ह.यो. योजनेवर किती खर्च केला व किती कामे तपासणी केली. त्यांची एकूण रक्कम व तपासणी केलेल्या एकुण कामांची माहिती मिळावी ? ‘

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडून अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली माहिती मागविली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या पत्राबरोबर अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत जोडली नाही. या पत्रामध्ये सर्व संबंधितांना दिनांक २६-०६-२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले होते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे नमूद करुन त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे

आदेशीत करण्यात यावे व जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी अशी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अर्ज केल्यानंतर एक वर्ष १ महिना इतका कालावधी व्यपगत होऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यांच्या अंदाजाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देण्यासाठी तयार केलेली माहिती अपूर्ण व चुकीची करण्यात आलेली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य मिळणे आवश्यक असून त्यांनी या प्रकरणी त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लावणारे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांनी लागलीच दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मागविली होती. अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर नजिकच्या कालावधीमध्ये ते आजारी पडल्याने, त्यांना अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करता आली नाही. ते या पदावरुन दिनांक २८-०५-२००७ रोजी पदमुक्त झाले आहे. नंतरचे जन माहिती अधिकारी सुनावणीसाठी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक २७-०३-२००८ रोजी रुजू झाले. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार असून ते अपिलार्थीस ती विनामूल्य व तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. सदर प्रतिसाद न देण्याचे कारण म्हणजे त्यांची प्रकृती ठीक नव्हती. ते रजेवर गेल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे काम त्यांच्या रजेच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांचे होते. तथापि त्यांनी त्यांचे कर्तव्य चोखपणे बजावल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती

अधिकारी यांनी औरंगाबाद विभागातील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा क्षयरोग अधिकारी इत्यादीकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती एकूण ६ वर्षाच्या कालावधीशी संबंधीत असून त्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात होती. आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे तयार करुन ठेवली आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच, ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणा-या प्रस्तावीत माहितीविषयी सदर माहिती चुकीची व अपुरी असल्याचे विधान केले. आयोग हे विधान फेटाळून लावत आहे कारण मुळात अपिलार्थीस मूळ माहिती प्राप्त झाली नसल्याने व ती अपिलार्थीने वाचली नसल्याने तिची सत्यासत्यता ती प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीस करता येणे शक्य नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी दिर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल या प्रकरणी जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्या सर्व कर्मचारी / अधिका-यावर उप संचालक आरोग्य सेवा औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय

कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आंत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच, ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल या प्रकरणी जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्या कर्मचारी / अधिका-यावर आरोग्य उप संचालक यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक ०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसूल, घर नं. १-१६-३२, जुना बाजार, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासन अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११९५

निर्णय दिनांक ०६-०५-२००८

श्री. इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, : अपिलार्थी
१७/१ एन-११ सेक्टर एल, सिडको,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
उपविभाग सिडको, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत,
शहर विभाग, गारखेडा, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, उपविभाग

सिडको श्री. नामदेव रानबा गांधले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंम्रनी मर्यादीत, शहर विभाग श्री. चंद्रसेन बद्रीलाल जाधव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९० ते २००७ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" 1. The Crescent co up Hsg Society had been submitting applications for shifting of electricity line passing over plot numbers 17/1 & 17/2, endangering] the life of the residents since 1994. What action has been taken in compliance of this illegitimate installation and its pursuit shifting ?

2. After 2002 MSEB has installed new electronic meter, this new meter was installed in how many houses, What was actual number of consumers, what is the percentage ? How many houses of MSEB officials were installed with e-meter, what is the percentage ?

3. Give the monthly amount of bill paid by all the officials of MSEB/MSEDL, for last fifteen (15) years, in the district/jurisdiction area of their residence.

4. How many MSEB/MSEDL consumers are their in your jurisdiction/district,

a) how many of them paying Rs 100 to 200 per month

b) how many of them paying Rs 201 to 300 per month

d) how many of them paying Rs 301 to 400 per month

e) how many of them paying Rs 401 to 500 per month

f) how many of them paying Rs 501 to 600 per month

g) how many of them paying Rs 601 to 700 per month

h) how many of them paying Rs 701 to 800 per month

i) how many of them paying Rs 801 to 900 per month

j) how many of them paying Rs 901 to 1000 per month

k) how many of them paying Rs 1001 to 1100 per month

l) how many of them paying Rs 1001 to 1200 per month

m) how many of them paying Rs 1201 to 1300 per month

n) how many of them paying Rs 1301 to 1400 per month

o) how many of them paying Rs 1401 to 1500 per month

p) how many of them paying Rs 1501 to 1600 per month

q) how many of them paying Rs 1601 to 1700 per month

r) how many of them paying Rs 1701 to 1800 per month

s) how many of them paying Rs 1801 to 2000 per month

t) how many of them paying Rs 2201 to 2200 per month

u) how many of them paying Rs 2201 to 2500 per month

v) how many of them paying Rs 2501 to 3000 per month

Of above How many have been installed with e-meter in 2002 and then now with another new METER ? What is your criteria ?

5. How many persons are their in your jurisdiction/ districts who are using electricity, without paying any amount i.e. Use of AKDE ?

6. Why doesn't MSEB/MSEDL envisage for using meter at their destination and/or at pole. As is done by the TELECom department , in spite of making false, desperate, revengeful and malafile allegations ?

6 (a) It is noteworthly in this context that the meter presently installed is at the stone throwing distance and/or ball shooting distance and height as the same has been installed facing the playground and under the JAMUN tree wherein the occurrence of stone throwing has been witnessed in past.

7. Give the names of the persons who entered my house in my absence without taking prior permission, that to the extend of entering Kitchen & Bedrooms, humiliating Indian in general and Muslim Culture in particular without accompanying any lady with them in pretext of changing the meter.

8. In 2002 when you installed the e-meter, why did you not installed in presence with demonstrating the functioning and the skeleton or the parts of the meter which you are alleging to be not in the condition which your predecessors installed ? Why the spot fest with prior intimation and appointment was not carried ?

9. Give the purchase procedure and purchase record of the e-meter (2002) and that of installed now. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस काही खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर पत्राचे अवलोकन करता या पत्राचा सूर अपिलार्थीस माहिती नाकारण्याकडे आहे असे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०५-२००७, ०५-०६-२००७, ०६-०६-२००७ व ०३-०७-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावण्यास हजर न राहू शकल्याने या प्रकरणातील सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांना घेता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिल्याचे व माहिती नाकारल्याचे व

त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर ३० दिवसात कोणतीही कारवाई केली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे विचारलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ व ४ संदर्भातील माहिती आवश्यक आहे. त्यांनी मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती १७ वर्षे इतक्या कालावधीशी संबंधीत आहे परंतु आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना २००५-२००६, २००६-२००७ या वर्षातील माहिती जरी दिली तरी ती त्यांना पुरेशी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या विद्युत मिटरची त्यांनी दिनांक ०८-०२-२००७ रोजी तपासणी केली असता, सदर मिटरमध्ये बदल करुन ते ४२ टक्के इतके कार्यक्षमतेने चालविले जात होते व याव्दारे कमी बिलाची आकारणी करण्यात येत होती. या सर्व प्रक्रियेला अपिलार्थी हेच जबाबदार असल्याचे सिध्द झाले होते. त्यांची विजेची चोरी पकडल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचा आधार घेऊन अशा प्रकारची माहिती विचारीत असतात. अपिलार्थीने केलेल्या वीज चोरीसंदर्भात अपिलार्थीस या वीज चोरीची भरपाई करण्याकरिता बील देण्यात आले. तथापि सदर बिलाची रक्कम अपिलार्थीने न भरल्यामुळे अपिलार्थीवर दिनांक ११-०६-२००७ रोजी एफ. आय. आर. दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायालयाकडे सध्या प्रलंबीत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ची पूर्ण, मुद्दा क्रमांक २ ची अंशतः माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देऊ शकतील. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील किती जणांना अशा प्रकारे वीज बील आकारले गेले आहे याची माहिती ते अपिलार्थीस देऊ शकतील,

मात्र याबाबत किती जणांनी अशा प्रकारचे बील भरले याची माहिती ते अपिलार्थीस देऊ शकणार नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती ते अपिलार्थीस या प्रकरणी दाखल केलेल्या एफ. आय. आर. प्रकरणातील देऊ शकतील. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमाक ७ व ८ ची संबंधीत माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ९ संदर्भात ते अपिलार्थीस १५ दिवसात माहिती देऊ शकतील.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २३-०४-२००७ रोजीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी अर्जदारास रजिस्टर पोस्टाने पत्रे पाठविली. एकदा अपिलार्थीच्या भ्रमणध्वनीवर संदेश दिला. तथापि अपिलार्थी हे दिलेल्या दिवशी कधीही हजर न झाल्याने त्यांच्या अपिलाची सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रावरुन त्यांचे अपील फेटाळले व दिनांक १७-०७-२००७ रोजी आर. पी. ए. डी. व्दारे पाठविलेल्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांचे अपीलावरील निर्णय कळविला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ वर्षाची इतक्या कालावधी संबंधीत माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील एकूण ९ मुद्दयापैकी मुद्दा क्रमांक ४, ६ या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला जो माहितीचा अधिकार अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक ३ व्दारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत औरंगाबाद जिल्ह्यातील अधिका-यांनी दरमहा किती बिले भरली त्याची देखील १७ वर्षाच्या कालावधीतील माहिती मागविली जी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांना संबंधीतांकडून १७ वर्षाची माहिती गोळा करुन ती अपिलार्थीस देणे शक्य नाही. याबाबत त्यांनी कलम ८ (त्र) चा आधार घेतला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ चे अवलोकन केले असता, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त होणा-या बिलाचे सांख्यिकी पृथःकरण मागितले आहे. आपल्याकडील उपलब्ध माहितीचे सांख्यिकी पृथःकरण करुन ते अपिलार्थीस पुरविणे जे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नाही. येथे असे लक्षात घेतले पाहिजे की, जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीचे विश्वस्त असतात. अपिलार्थीने प्रश्न विचारणे व त्यांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहितीवरुन तयार करुन देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीस १०० टक्के माहिती जन माहिती अधिकारी यांना देता येणे जवळपास अशक्यप्राय असल्याचे दिसून येते. तथापि आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती जास्तीत जास्त १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगास आश्वासित केले

आहे. त्यानुसार त्यांनी ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची विद्युत चोरी पकडली असल्याने व त्या प्रकरणी अपिलार्थीविरुध्द जन माहिती अधिकारी यांच्याकडून खटला दाखल केला गेला असल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारची विस्तृत स्वरुपाची माहिती विचारली हे येथे सप्रमाण सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये बदल करुन अर्जदारांनी मागितलेल्या माहितीच्या व्याप्तीस मर्यादा घालणे हे अत्यंत निकडीचे झाले आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यांत येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक ५ व मुद्दा क्रमांक ९ ची संपूर्ण व मुद्दा क्रमांक २ ची अंशतः माहिती हे आदेश

निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. इनामदार ख्वाजा मोईनुद्दीन, १७/१ एन-११ सेक्टर एल, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, उपविभाग सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, शहर विभाग, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२६

निर्णय दिनांक : ०७.०५.२००८

१ श्री. वैभव छबुराव जाधव : अपीलार्थी

१-७-१२३, 'शंकरपार्वती' निवास,

गोपाळपुरा, जालना जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो),

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.

२ जन अपिलीय अधिकारी,

तथा जिल्हाधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त जिल्हाधिकारी, जालना.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. वैभव छबुराव जाधव (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जालना श्री. बाबूराव अमृतराव वाडेकर ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल)हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०८.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंबड तालुक्यामध्ये वन विभागाकडून, रो.ह.यो. योजनेखाली झालेल्या कामासंबंधातील खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) अंबड परिक्षेत्र कार्यालया वन विभागामार्फत रो.ह.यो.अंतर्गत जानेवारी २००२ ते मार्च २००६ पर्यंत झालेल्या सर्व प्रकारच्या कामाच्या आपल्या कार्यालयातून मंजूर झालेल्या अंदाजपत्रकांच्या सत्यप्रती

२) वरील अंदाजपत्रकांच्या तांत्रिक मान्यतेच्या नोंदणीच्या आपलया कार्यालयातील रजिस्टरच्या अभिलेखाच्या सत्यप्रती.

३) वरील निर्देशित मंजूर अंदाजपत्रकीय कामांना मंजूर निधी, पतमर्यादा (एल.ओ.सी.) खर्च याबद्दल सविस्तर माहिती.

४) वरील अंदाजपत्रकीय कामाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयात वन विभागामार्फत कामावरील मजुराबाबत देण्यात आलेल्या अहवालाच्या सत्यप्रती.

५) सदरील विभागामार्फत आपणाकडे या कालावधीत निधी मागणी व आपल्या विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधी आलेल्या संपूर्ण कार्यालयीन पत्र व्यवहाराची सत्यप्रती.

६) वरील अंदाजपत्रकीय कामाच्या संदर्भात आपल्या विभागात या कालावधीत तहसीलदार, जिल्हाधिकारी किंवा लोकप्रतिनिधीमार्फत दाखल तक्रारी व त्यावरील आपल्या कार्यालयामार्फत झालेली कार्यवाही निकाल सविस्तर सत्यप्रतीसह. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत वन परिक्षेत्र अधिकारी,

अंबड यांना पाठवून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,२,४ व ५ ची माहिती त्यांचे विभागाशी संबंधित असल्याने ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची सूचना केली व मुद्दा क्र. ३ आणि ६ च्या बाबतीत त्यांनी अपिलार्थीस सदरची माहिती त्यांचे कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.४.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीने केलेल्या अपिल अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ५.५.२००७ व १.६.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थीस हे गैरहजर असल्याने ही सुनावणी होऊ शकली नाही व अंतिमतः जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात त्यांच्याकडील दि. ३०.६.२००७ च्या पत्रान्वये आदेश पारित केले. सदर आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरुन अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ व मुद्दा क्र. ६ बाबतची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित केले.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या  अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील केले असता, त्यांनी ३० दिवसांत सदर अपिलावर निर्णय दिला नाही, त्यामुळे संबंधितांवर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार कार्यवाही करण्यात यावी, असे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती कोणत्याही प्रकारे त्यांना प्राप्त झाली नाही व या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी

त्यांचेकडे कोणताही पत्रव्यवहार केला नाही. अपिलार्थी यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आजतागायत अप्राप्त आहे. सदर माहितीची त्यांना आज रोजीही आवश्यकता आहे.

आज जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती त्यांचेकडे आज रोजी तयार असून सदर माहिती अपिलार्थीस ते विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थी यांनी व्यक्तीशः माहितीची मागणी करुन, ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाची क्षमा मागितली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी प्रस्तावित केलेल्या दि. ५.५.२००७ व १.६.२००७ रोजीच्या अपील सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी गैरहजर राहिले. त्यानंतर त्यांनी दि.३०.६.२००७ रोजी आपले आदेश पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध होती. माहिती उपलब्ध असतांनाही त्यांनी त्यांचेकडील दि. २८.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२,४ व ५ ची माहिती अपिलार्थीस परस्पर देण्याची सूचना केली व याच पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांचे अर्जातील उर्वरित मुद्यांसंदर्भातील माहिती त्यांचे कार्यालयातून घेऊन जाण्यास कळविले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्यापृष्ठयर्थ आयोगास कोणताही पुरावा (जावक नोंदवहीची सत्यप्रत), आयोगाने पूर्वसूचना देऊनही आयोगास दाखवू शकले नाहीत, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

त्यांच्या दि. २८.३.२००७ रोजीचे पत्र पाठविले किंवा कसे, याबाबत संदेह निर्माण होत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडून दि. २३.४.२००७ रोजी प्रथम अपील केले आहे, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.६.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांच्याच मुद्यांची री ओढली. रोजगार हमी योजना कार्यक्रमाची अंमलबजावणीसाठी प्रचलीत व निश्चित अशी प्रणाली सर्व शासनयंत्रणेमध्ये गेली अनेक वर्षे रुढ आहे, त्यामध्ये कोणत्याही क्षेत्रीय शासकीय यंत्रणेस रोजगार हमी योजनेतून त्यांना करावयाच्या कामाचे नकाशे, अंदाजपत्रके सर्वप्रथम तांत्रिक मान्यतेसह जिल्हाधिकारी कार्यालयास कमीत कमी दोन प्रतीमध्ये पाठविणे आवश्यक असते. त्यापैकी एक प्रत, सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर, जिल्हाधिकारी कार्यालय संबंधित यंत्रणेस परत करते व एक प्रत स्वतःच्या कार्यालयात ठेवून घेते. ही पध्दत गेली अनेक वर्षे शासकीय यंत्रणेमध्ये रुढ आहे. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ ची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे असणे अपेक्षित आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ चे अवलोकन करता तांत्रिक मान्यता नोंदणी रजिस्टर हे संबंधित यंत्रणेकडे ठेवले जाते, ज्यामध्ये ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे संभवत नाही. सदर माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज वन विभागातील संबंधित अधिकाऱ्याकडे, त्यांना प्राप्त झाल्यानंतर तो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) च्या तरतुदी प्रमाणे ५ दिवसांचे आत पाठवून द्यावयास होता, तथापि सदर अर्ज संबंधित यंत्रणेकडे पाठवून देण्यासाठी देखिल जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते.मुद्दा क्र. १ संदर्भात आयोगाने वर व्यक्त केलेले त्यांचे अभिप्राय मुद्दा क्र.४ व ५ बाबतही लागू होत आहेत. कारण प्रत्येक क्षेत्रिय यंत्रणा त्यांचेकडील कामावर असलेल्या मजूर उपस्थितीचा अहवाल दर आठवडयास जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवित असतात, त्यामुळे ही माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे क्रमप्राप्त आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती वन

विभागाच्या क्षेत्रिय कार्यालय व जन माहिती अधिकारी या दोघांकडे उपलब्ध असावयास हवी होती व या मुद्दावरील माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यांनी हा निर्णय देतांना तो विचारपूर्वक व निःपक्षपातीपणे दिल्याचे दिसत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असणे क्रमप्राप्त आहे हे त्यांना माहित असूनही त्यांनी हा मुद्दा सदर निर्णय घेताना दुर्लक्षित केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जातील माहितीच्या उपलब्धतेविषयी केलेले वरील विश्लेषण पहाता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २ वगळता उर्वरित सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी सदर अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यावर ताबडतोब अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) प्रमाणे करावयाची कार्यवाही करण्यास देखिल त्यांनी १५ दिवस इतका विलंब केला. अपिलार्थीच्या अर्जावर कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. उपरोक्त प्रकरणी अशा प्रकारच्या कृतीने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपवाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील इतर कर्मचारी/अधिकारी यांचे सहाय्य घेणे आवश्यक असते. जन माहिती अधिकारी यांना अशाप्रकारे सहाय्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, ही तरतुद पाहता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे सर्व अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून त्यांना प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यास जबाबदार ठरत आहेत. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक, यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन/प्रस्तावित करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१.अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक, यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन/प्रस्तावित करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वैभव छबुरावजी जाधव, १-७-१२३, 'शंकरपार्वती' निवास,गोपाळपुरा, जालना

जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२७

निर्णय दिनांक : ०७.०५.२००८

१ श्री. हेमंत मनोहरराव महाले, : अपीलार्थी
वरद गणेश मंदिरामागे, समर्थनगर,
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम)
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत मनोहरराव महाले (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.(पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपकार्यकारी अभियंता (प्रभारी) औरंगाबाद श्री. कमलाकर भिवाजीराव गायकवाड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,औरंगाबाद श्री. बलभीम रामभाऊ देवते (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. जी.आर.पाटील हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २६.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत केलेल्या कामासंदर्भात माहिती खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) शाखा अभियंता जी.आर.पाटील हे (सा.बां.पश्चिम उपविभाग) कन्नड येथे रुजू झाल्यापासून रोहयो अंतर्गत मार्च २००७ पर्यंत केलेल्या संपूर्ण कामांची यादींच्या छायांकित प्रती.

२) व त्या कामावरील पेमेंट केलेल्या मस्टरच्या छायांकित प्रती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १२.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती १५ दिवसांचे आत देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०७.२००७

रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे अधिनियमानुसार योग्य ती कार्यवाही होऊन माहिती उपलब्ध करुन देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्यापही अप्राप्त आहे. सदर माहितीची त्यांना आज रोजीही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. १४.३.२००८ रोजी संबंधित उपविभागामध्ये संकलीत करुन ठेवली होती परंतु उपविभागाने पत्र पाठवूनही अपिलार्थी हे सदर माहिती घेण्यासाठी स्वतः उपस्थित झाले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची तयारी दर्शवूनही माहितीचा स्वीकार न करण्याचे कारण अपिलार्थीस विचारले असता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याने सदर माहिती स्वीकारली नसल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागितलेली माहिती जास्त कालावधीची असल्याने सदर माहिती संकलीत करण्यासाठी त्यांना वेळ लागला, अशा प्रकारची माहिती त्यांचेकडे सहजरित्या उपलब्ध नसते.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. ३.५.२००७ रोजीच्या अपिल अर्जावर त्यांनी दि. १२.६.२००७ रोजी निर्णय पारित करुन सुनावणीचेवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसांचे आत माहिती देण्याचे मान्य केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, माहितीचा अधिकार अधिनियमाची संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्रितपणे कशाप्रकारे विडंबन केले याचे उदाहरण या प्रकरणाद्वारे आयोगासमोर आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड नव्हते अथवा सदर माहिती क्लिष्ट अशीही नव्हती. कारण अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे श्री. जी. आर. पाटील, शाखा अभियंता यांनी ते रुजू झाल्या पासून ते मार्च, २००७ पर्यंत रो.ह.यो. अंतर्गत केलेल्या कामाच्या मस्टर्सच्या छायाप्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने दि. २६.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून मार्च, २००७ पर्यंत त्यांचे कालावधीतील माहितीची मागणी केली आहे. मार्च, २००७ ची निश्चित कोणती तारीख याचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात केली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.३.२००८ रोजी देउ केलेली माहिती त्यांना, स्वीकारली नाही. माहिती स्वीकृत न करण्याचे कारण त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल, असे दर्शविले आहे. अपिलार्थी यांनी जरी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले असले तरी त्यांना जर त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये रस असता तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.३.२००८ रोजी देऊ केलेली माहिती हस्तगत करुन घेतली असती. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंबंधी या संपूर्ण कालावधीमध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यांनी मूळात अपिलार्थीस दि. २६.३.२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये, त्यांनी अधिनियमाद्वारे कलम ७ प्रमाणे जो प्रतिसाद देणे अभिप्रेत आहे, अशाप्रकारचा कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ४.६.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये कबूल करुनही अपिलार्थीस १५ दिवसात माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची निष्क्रिय कार्यप्रणालीद्वारे त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद

आहे.या सर्वजणांनी त्यांनी दर्शविलेल्या अशाप्रकारच्या वर्तनामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७.०५.२००८** — **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमंत मनोहरराव महाले, वरद गणेश मंदिरामागे, समर्थनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (प) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२४

निर्णय दिनांक : ०७.०५.२००८

१ श्री. प्रकाश प्रल्हादराव चौकटे : अपीलार्थी
'जाधव निवास', विकास कम्युनिकेशन
कोर्टाच्या मागे, भाग्यनगर, अहमदपूर,
रा. लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा प्रशासन अधिकारी,
सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सहसंचालक,
उच्च शिक्षण, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रकाश प्रल्हादराव चौकटे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड श्री. श्रीरंग बाबुराव भांगरे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण,नांदेड डॉ. सुनंदा गोपीनाथराव रोडगे (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २६.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) दि. ९ डिसेंबर, २००४ चे यु.जी.सी. चे परिपत्रक, तसेच महाराष्ट्र शासनाचे क्र.एनजीसी १२०२/(१६६/०२) विशि-४ दि. १३ जानेवारी २००५ चे परिपत्रक उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथील अधिव्याख्याता निवडीसाठी दि. २५.०१.२००४ रोजी झालेल्या मुलाखतीसाठी मा. श्री. डी.के.अंभारे, अधिव्याख्याता शासकीय अध्यापक महाविद्यालय परभणी हे शासकीय प्रतिनिधि उपस्थित होते. सदरील प्रतिनिधिंनी शिक्षण सहसंचालक कार्यालयात सादर केलेल्या मुलाखतीचा अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.

३) महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथिल अधिव्याख्याता निवडीसाठी दि. २५.१०.२००५ च्या मुलाखतीसाठी मा. श्री. डी.आर.कुलकर्णी अधिव्याख्याता शासकीय अध्यापक महाविद्यालय परभणी हे शासकीय प्रतिनिधी उपस्थित होते. सदरील प्रतिनिधींनी शिक्षण सहसंचालक कार्यालयात सादर केलेला मुलाखतीचा अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा."

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांना असे कळविले आहे की, त्यांनी मूळ अर्जामध्ये संबंधित परिपत्रक कोणत्या विषयाशी संबंधित आहे, याचा उल्लेख केला नसल्याने सदर परिपत्रकाची प्रत अपिलार्थीस देता येणे शक्य नाही. तसेच अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेल्या मुलाखतीचा अहवाल त्यांचे कार्यालयात जतन केला जात नसल्याने तो अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणे शक्य नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राद्वारे कोणतीही माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून

प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १२.०६.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या अपिल अर्जावर त्यांनी दि. १९.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचे नमुद करुन यामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुनःश्च् जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १९.५.२००७ रोजी पाठविलेल्या पत्राची एक प्रत या पत्रासोबत पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.५.२००७ रोजी पत्र पाठवून त्याद्वारे खोटी माहिती दिल्याचे, शासकीय प्रतिनिधीकडून अहवाल न मिळाल्याचे व दि. ९.१२.२००४ चे यु.जी.सी.चे परिपत्रक तसेच दि. १३.१.२००५ चे महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक त्यांचेकडे उपलब्ध असूनही त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे म्हटले आहे. तसेच आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तीस दिवसांचे आत कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कथित १९.५.२००७ चे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांचे अपिलावर निर्णय देतांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या मुद्यांतील मुद्दा क. १ शी संबंधित माहिती कोणत्या विषयाशी संबंधित आहे, याचा बोध होत नसल्याचे म्हटले आहे. तथापि सदर परिपत्रक त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध असूनही त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली नाही त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासनाचे दि. १३.१.२००५ रोजीचे

परिपत्रकही त्यांनी अपिलार्थीस दिले नाही. जन माहिती अधिकारी यांनी मुलाखतीचे अहवाल त्यांचे कार्यालयात जतन केले जात नाहीत,असे जे कळविले, याबद्दल त्यांना शंका वाटत आहे. जन माहिती यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती जाणुनबुजून दिली नाही, त्यामुळे त्यांचेवर आवश्यक ती कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना निश्चित कोणत्या विषयासंदर्भातील परिपत्रक हवे आहे, याचा उल्लेख केला नाही व अपिलार्थीने उल्लेखिलेल्या शासनाचे दि. १३.१.२००५ चे परिपत्रक त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने ते त्यांना पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. कारण संबंधित महाविद्यालयामध्ये श्री. अंभारे व श्री. कुलकर्णी हे शासकीय प्रतिनिधी या नात्याने मुलाखतीस गेले होते. मुलाखत संपल्यानंतर त्याचा अहवाल त्यांनी संबंधित समितीस/विद्यापिठास परस्पर पाठविला होता. त्याची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिली नव्हती. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येऊ शकली नाही. सदर प्रत स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात उपलब्ध होऊ शकेल व तसे त्यांनी अपिलार्थीस दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने प्रथम अपिल अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, त्यामुळे अपिलार्थीच्या अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी सुनावणी का घेऊ शकले नाहीत, याचे कारण त्यांना सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत साधे व सरळ होते. जन माहिती अधिकारी यांच्या मते त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे, अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की,

सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. अपिलार्थी यांचे मते जन माहिती अधिकारी यांचे दि. १९.५.२००७ रोजीचे पत्र त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेल्या त्यांचे दि. १२.६.२००७ रोजीच्या अपिलासंदर्भात दिलेल्या निर्णयासोबत त्यांना प्राप्त झाले. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीमध्ये फक्त आदेशाच्या/परिपत्रकाच्या तारखा एवढयाचा उल्लेख आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.५.२००७ च्या पत्राद्वारे कळवूनही अपिलार्थीने सदर पत्रक कोणत्या खात्याशी संबंधित आहे व कोणत्या विषयावर आहे, याचा तपशील जन माहिती अधिकारी यांना पुरविला नव्हता, त्यामुळे अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे निश्चितपणे जबाबदार आहेत, हे सिध्द होत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये पुरेसे स्पष्टीकरण दिले आहे. कोणत्याही अनुदानित अथवा विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व्याख्याते, अधिव्याख्याते वा इतर तत्सम पदाच्या मुलाखतीकरिता जन माहिती यांच्या कार्यालयातील अधिकारी हे शासकीय प्रतिनिधी म्हणून हजर असतात. मुलाखत संपल्यानंतर त्यांचेस्तरावर सदर मुलाखतीतील निष्कर्ष हे ते संबंधित विद्यापीठास अथवा निवड समितीस त्यांचे स्तरावर मूळ प्रतीत परस्पर पाठवून देतात. मुलाखतीसाठी सदर अधिकारी शासनाचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे वैयक्तिक क्षमतेमध्ये हजर असतात. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे संभवत नाही. अशाप्रकारे मुद्दा क्र.१ मध्ये माहिती मागतांना अपिलार्थीने मूळात अपूर्ण मुद्यावर जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली आहे, तर मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असणे वर विवेचन केल्याप्रमाणे संभवत नाही. मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अपेक्षित माहिती देता येणे शक्य नाही, हे वर उल्लेखिल्याप्रमाणे सिध्द झाले असून, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित परिपत्रक जन माहिती अधिकारी यांनी आता पुनःश्च् शोध घेऊन अपिलार्थीस सात दिवसांचे आत पुरविण्याचे आयोगासमोर मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांचे

मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर दडविल्याची अथवा माहिती देण्यास कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांचेवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश प्रल्हादराव चौकटे, रा. 'जाधव निवास' विकास कम्युनिकेशन कोर्टाच्या मागे, भाग्यनगर, अहमदपूर जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२८

निर्णय दिनांक : ०७.०५.२००८

१ श्री. गोरख केशव जाधव, : अपीलार्थी

रा. मंगरुळ, ता.कळंब, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,

मंगरुळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,

तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, कळंब,

जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंगरुळ ता.कळंब श्री. हनुमंत आसराजी झांबरे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.उस्मानाबाद श्री. वसंत देवराव वाघमारे (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी

असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री. गोरख केशव जाधव, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १८.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

> " मौजे मंगरुळ ता. कळंब येथील सीटी सर्वे नं. २८९, ४४६,२९३ संबंधी तारीख २३/१/२००७ रोजी दिलेल्या अर्जावरुन अद्याप ग्रामपंचायत रेकॉर्डला नोंद का घेतली नाही याची माहिती देण्याबाबत"

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जरी दि. १८.४.२००७ अशी तारीख असली, तरी जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः तो अर्ज दि. ६.६.२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून त्यांचेकडील दि. ८.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रु. २८/- भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांचेकडे केला नाही. मध्यंतरीच्या काळात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.५.२००७ रोजी प्रथम अपिल दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांचेकडील दि. २८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस चार दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०७.०७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची नोंद राज्य

माहिती आयोगाचे कार्यालयात दि. ९.७.२००७ रोजी झालेली आहे. या अपिल अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनीही कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेतल्याचे आयोगाचे निदर्शनास आणले आहे.

आज रोजी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी आपला युक्तीवाद त्यांचेकडील एका पत्राद्वारे सादर केला आहे. सदर पत्र आयोगाचे कार्यालयात दि. २८.४.२००८ रोजी प्राप्त झाले आहे. या पत्रामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणूनबुजून माहिती देण्याचे नाकारले असल्याचे म्हटले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल त्यांचे अपिल अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे नमुद केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेश द्यावेत व त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार शास्ती लावावी. अपिलार्थीचा हाच युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना दि. ६.६.२००७ रोजी पंचायत समितीमार्फत प्राप्त झाला. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर लागलीच त्यांनी त्यांचेकडील दि. ८.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे आवश्यक शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि सदर शुल्क अपिलार्थीने त्यांचे कार्यालयात भरले नाही. अपिलार्थीने त्यांचे अर्जात नमुद केलेले सि.स.नं.२८९, ४४६,२९३ हे भूखंड स्वतः खरेदी केलेले आहेत. या जागांची नोंदणी ग्रामपंचायत रेकॉर्डला घेणेसंदर्भात अपिलार्थी यांची मागणी आहे. महसूल विभागाचे दि. २७.३.१९९५ च्या परिपत्रकाप्रमाणे कोणत्याही मालमत्तेचे हस्तांतरण करतांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार विहित प्रमाणात मुद्रांक शुल्क व नोंदणी फी शासनास जमा करणे आवश्यक आहे. सदर फी जमा न करता अपिलार्थीस संबंधित मालमत्तेचे हस्तांतरण करुन हवे आहे. ग्रामपंचायतच्या

ठरावानुसार त्यांनी अपीलार्थी यांचेकडून सदर मालमत्ता खरेदी केल्याबद्दल संबंधित खरेदी खताची प्रत मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपिल अर्ज त्यांचेकडे दि. २८.५.२००७ रोजी प्राप्त झाला, या अर्जावर त्यांनी त्याचदिवशी निर्णय घेऊन अपिलार्थीस चार दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षतः दि. ८.६.२००७ रोजी माहिती देऊ केली असता सदर पत्र घेण्यास अपिलार्थीने नकार दिला. तद्‌नंतर त्यांनी दिलेल्या तोंडी सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०७.०७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना केलेल्या दि. २३.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांचे मालकीहक्काची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला का घेत नाही, याची कारणे विचारली आहेत. महसूल व वन विभागाचे परिपत्रकानुसार अपिलार्थीची विनंती, संबंधित मिळकतीच्या खरेदीखताशिवाय ग्रामपंचायत रेकॉर्डवर घेणे हे जन माहिती अधिकारी यांना शक्य नाही. त्यामुळे अपिलार्थी जोवर खरेदीखताच्या प्रमाणित नकला जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करीत नाहीत, तोवर अपिलार्थीच्या दि. २३.१.२००७ रोजीच्या अर्जावर अंतीम निर्णय होऊ शकत नाही. याही उपर अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे ते अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे का कार्यवाही करत नाहीत, याची कारणे मागत आहेत, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये ‘माहिती’ या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे, ती पुढीलप्रमाणे आहे.

" **'माहिती'** याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती."

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही या व्याख्येशी मूळीच सुसंगत नाही. जन माहिती अधिकारी अमुक एक निर्णय का घेत नाहीत, असे विचारण्याचे स्वातंत्र्य अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोठेही नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन अपिलार्थी यांना त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला करुन घ्यावयाची आहे परंतु यासाठी नियमाप्रमाणे आवश्यक असलेली खरेदीखताची प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे मात्र ते जन माहिती अधिकारी यांना पुरवित नाहीत, हे पाहता व मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोरख केशव जाधव, रा. मंगरुळ, ता. कळंब, जि.उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मंगरुळ, ता.कळंब जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२९

निर्णय दिनांक ०८-०५-२००८

अभिजित बाळकृष्ण सोनवणे, : अपिलार्थी

प्लॉट नं. १५१, एन. ५ दक्षिण

सावरकरनगर, सिडको, नवीन

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्या, सामाजिक कार्य
महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्या, सामाजिक कार्य
महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्राचार्या, सामाजिक कार्य महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद

# निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी अभिजित बाळकृष्ण सोनवणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या, सामाजिक कार्य महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर हेमलता श्रीकांत कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून २००१ ते २३-०२-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" अ) मूळ टी. सी. कोणास दिली,

ब) केंव्हा दिली,

क) कशी दिली. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीने मूळ माहितीचा अर्ज व त्यावरील अपील अर्ज हे दोन्ही अर्ज प्राचार्या सामाजिक कार्य महाविद्यालय औरंगाबाद यांच्याकडेच केल्याचे दिसून येते.

अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने मूळात प्रथम अर्ज केला त्यावेळी प्राचार्या ह्या अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत नव्हत्या त्यामुळे त्यांनी या अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही. तथापि अपिलार्थीच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या अपील अर्जावर जो प्राचार्याना दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्राप्त झाला यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक तो खुलासा केल्याचे दिसून येते. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीप्रीत्यर्थ त्यांनी प्राचार्याच्या कार्यालयामध्ये रुपये २५ इतके शुल्क जमा करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी,

त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जावर उत्तर प्राप्त झाले नाही व त्यांच्या अपील अर्जावर प्राप्त झालेले उत्तर समाधानकारक नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठविला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पोहोचल्याप्रीत्यर्थ संबंधीत कर्मचा-याने त्यांना पोच सही दिलेली आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांना त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाला नसल्याचे, त्यांना प्राचार्यांच्या दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्रावरुन प्रथम कळले. प्राचार्यांनी दिनांक १२-०६-२००७ रोजी दिलेल्या सह पत्रावरील अपिलार्थी यांना दिनांक ०८-१२-२००६ रोजी दिलेली सूचना अपूर्ण आहे. त्यांना मूळ टी. सी. प्राप्त झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीकडे उपलब्ध असलेल्या पावतीवर त्यांच्या कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षकाने अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापृष्ट्यार्थ सही केली आहे. तथापि संबंधीत अधीक्षकांनी अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोहोचविला नाही. संबंधीत कार्यालयीन अधीक्षकाच्या अशा प्रकारच्या इतर अनेक बाबीतही त्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे त्यांना आता सक्तीने सेवानिवृत्त करण्याची सूचना देण्यात आली आहे. तथापि त्यांच्या आदेशावर संबंधीत अधीक्षकास न्यायालयीन स्थगीती प्राप्त झाल्याने संबंधीत कर्मचारी अद्यापही त्यांच्या कार्यालयात कार्यरत आहे. अपिलार्थीने मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी त्यांच्या महाविद्यालयातून २००१ साली प्राप्त करुन घेतली. अपिलार्थीने तदनंतर थेट २००६ साली त्यांच्या

महाविद्यालयाकडे टी. सी. साठी अर्ज केला. अपिलार्थीने टी. सी. साठी अर्ज केल्यानंतर त्यांच्या महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या टी. सी. बुकाची त्यांनी पाहणी केली असता, टी. सी. क्रमांक ३०७ व ३४९ ही दोन्ही प्रमाणपत्रे टी. सी. बुकामध्ये उपलब्ध नसल्याचे व ती अज्ञात व्यक्तीकडून फाडून नेल्याचे त्याना आढळून आले. त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या टी. सी. संदर्भात त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये आवश्यक तो खुलासा केला आहे. अपिलार्थीस टी. सी. आवश्यक असल्यास व्दितीय प्रत (ड्युप्लिकेट) टी. सी. तयार आहे. अपिलार्थीस त्यांना मूळ टी. सी ची प्रत हवी असल्यास त्यासाठी अपिलार्थीने निश्चितपणे कोणती कारवाई करावी यासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये योग्य ते मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या कडील मूळ अभिलेख्यामध्ये टी. सी. रजिस्टरची काही पाने फाडली गेल्याने त्यांना अपिलार्थी कडून त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ च्या पत्राव्दारे दिलेल्या सुचनांचे अनुपालन होणे आवश्यक आहे असे वाटते. त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना मूळ टी. सी. प्राप्त झाली नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे सांगितले. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र त्यांच्याकडे सादर केलेले नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रा मध्ये संबंधीत महाविद्यालयाचे नाव बदलण्यात आले असून अपिलार्थीने ज्यावेळी मास्टर ऑफ सोशल वर्क ही पदवी घेतली त्यावेळी विद्यावर्धक समितीचे सामाजिक कार्य महाविद्यालयातून घेतली होती. तथापि सदर महाविद्यालय नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ यांनी अधिग्रहीत केले त्यामुळे अपिलार्थीने दिलेल्या कथित प्रतिज्ञापत्रात केलेला उल्लेख चुकीचा आहे. त्यांनी मागितलेल्या नमुन्यात जर अपिलार्थीने त्यांना प्रतिज्ञापत्र लिहून दिले तर अपिलार्थीस आवश्यक ते टी. सी. प्रमाणपत्र देण्यास त्या आजही तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज त्यांना मूळ टी. सी. प्राप्त होण्याकरिता केला होता.  तथापि त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मागणीवरुन असे दिसून येते की, त्यांच्या दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही पूर्णतः प्रश्नार्थक स्वरुपात असून ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नाही.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील २ (च) अन्वये माहिती या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट केली आहे.

**कलम २ (च) :-** "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती वरील व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येईल.  अपिलार्थीने ज्या टी.

सी. ची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. ती टी. सी. जन माहिती अधिकारी या, अपिलार्थीने आवश्यक ते प्रतिज्ञापत्र त्यांच्या कडे सादर केल्यास तात्काळ देण्यास तयार आहे. तथापि सदर प्रतिज्ञापत्र जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या नमुन्यात देण्यासाठी अपिलार्थी यांचा विरोध आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रतिज्ञापत्राचा नमुना पाहता त्यामध्ये महाविद्यालय विद्यावर्धक समिती या संस्थेमार्फत चालविले जात होते असा उल्लेख केला आहे तर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना देऊ केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये अपिलार्थीने वेगळ्या स्वरुपात त्याच्या नमुन्यात सादर केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते सहकार्य केल्याचे दिसून येत आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी लक्षात घेता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती मूळातच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०८-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ अभिजित बाळकृष्ण सोनवणे, प्लॉट नं. १५१, एन. ५ दक्षिण सावरकरनगर, सिडको, नवीन औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या, सामाजिक कार्य महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३०

निर्णय दिनांक ०८-०५-२००८

श्री. गायकवाड चंद्रकांत दगू, : अपिलार्थी
रा. वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उाविभागीय अधिकारी (महसूल),
वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

३ त्रयस्थ पक्ष १. : श्रीमती ज्योती रसिक कोठारी, रा. वैजापूर
२. : श्रीमती ज्योती जवाहर कोठारी रा. वैजापूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गायकवाड चंद्रकांत दगू (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार वैजापूर श्री. राम पुंजाजी मिराशे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर श्री. पिराजी लक्ष्मण सोरमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १० ऑगस्ट १९९३ रोजी सर्वे नंबर १४/१ मौजे वैजापूरच्या ७/१२ च्या उता-यामध्ये घेण्यात आलेल्या फेर क्रमांक ९२०९ च्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. फेर क्र. ९२०९ ची फेरफार नक्कल.

२. फेर घेण्यासाठी ज्योती रसिक कोठारी व ज्योती जवाहर कोठारी यांनी आपल्या कार्यालयाकडे केलेल्या अर्जाची नक्कल.

३. मंडळ अधिकारी व संबंधीत सक्षम अधिकारी यांनी फेर घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राची नक्कल.

१. फेर घेण्यापूर्वी बजावलेल्या नोटीसची नक्कल.

२. नोटीस तामील केलेल्या प्रतची नक्कल.

३. जाहीर प्रगटनाची नक्कल.

४. जाहीर प्रगटन पंचनामाची नक्कल.

५. फेर मंजूर करणा-या सक्षम अधिका-याच्या आदेशाची नक्कल.

६. रजिस्टर इसार पावती नसतांना घेण्यात आलेला फेर कोणत्या कलमान्वये घेण्यात आला त्या संबंधीत माहिती.

७. नोटीस संबंधिताने घेतलेली नसल्यास नोटीस तामील केली म्हणून पंचयादीची नक्कल.

८. फेर मंजूर झाल्यानंतर तलाठी यांनी हितसंबंधीतांना दिलेल्या सूचनापत्राची नक्कल.

९. फेर किती कालावधीत मंजूर केला त्याविषयी माहिती. "
अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मूळ अर्ज तलाठी सजा वैजापूर यांना उद्देशून केला होता व याच अर्जाची प्रत तहसीलदार वैजापूर यांच्याकडे त्याच दिवशी सादर केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर तहसीलदार वैजापूर यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये तहसीलदार वैजापूर यांनी अपिलार्थीस संबधीत फेरची नक्कल त्यांच्या कार्यालयातील नियमाप्रमाणे शुल्क भरुन हस्तगत करण्याचे सूचित केले व इतर माहितीसंदर्भात, त्यांनी तलाठी वैजापूर यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०४-२००७ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यानी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून निर्णय प्राप्त होऊनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे व सदर माहिती त्यांना लवकरात लवकर मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणात प्रत्यक्षतः तलाठी सज्जा वैजापूर हे जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थीचा दिनांक ०८-०२-२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याविषयी सूचित केले होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात संबधीत तलाठी व त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती संदर्भातील संचिकेचा नेटाने शोध घेतला तथापि सदर संचिका त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही. या संदर्भातील फेरफार क्रमांक नोंदवही त्यांना आढळून आली व फेरफार क्रमांक ९२०९ ची प्रत त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तथापि सदर प्रत अपिलार्थी अद्याप घेऊन गेले नाहीत. अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीतील एका मुद्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस अशा प्रकारे माहिती देऊ केली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ते ९ ची संबंधीत माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती ती संचिका आता आढळून येत नाही. संबंधीत तलाठी यांनी सदर संचिका आढळून येत नसल्याबाबतचे पत्र त्यांना दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २५-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ३०-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे सर्व्हे नंबर १४/१ मौजे वैजापूर येथील ८ एकर २० गुंठे इतक्या जमिनीचे मालक आहेत. तथापि त्यांच्या ७/१२ च्या उता-यावर इतर अधिकार या सदराखाली ज्योती रसिक कोठारी व ज्योती जवाहर कोठारी यांच्या नावे फेरफार क्रमांक ९२०९ चा उतारा घेतला गेला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही नावे ज्या कागदपत्राच्या आधारे घेतली आहेत त्या कागदपत्रांच्या प्रती हव्या आहेत. या संदर्भात तहसीलदार वैजापूर यांच्याकडे उपलब्ध असलेल्या फेरफार नोंदवहीवरुन त्यांनी अपिलार्थीस फेरफार पत्रकाची प्रत दिल्याचे दिसून येईल. मात्र उर्वरीत माहितीसंदर्भातील संचिका संबधीत तलाठी यांच्याकडे

उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. जमिनीच्या हस्तांतरणाबाबतची महत्वाची कागदपत्रे गहाळ झाल्यासंदर्भात संबंधीत तलाठ्यावर काय कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली असता त्यावर जन माहिती अधिकारी यांनी नकारार्थी उत्तर दिले हे पाहता महसूल विभागातील अधिकारी जमिनीच्या हस्तांरणाचे व्यवहार कितपत गांभीर्याने घेतात याची कल्पना येते. आज रोजी या जमिनीच्या इतर अधिकार नोंदीसंदर्भात उच्च न्यायालयात अपिलार्थी व इतर यांच्यामध्ये वाद चालू आहे. या न्यायालयीन प्रक्रियेकरिता अपिलार्थीस ही माहिती पुरावा म्हणून न्यायालयाकडे सादर करण्याकरिता हवी आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी व संबंधीत तलाठी यांनी आपले कर्तव्य योग्य त्या प्रकारे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात संबंधीत तलाठी यांनी दिनांक १६-०३-२००७ रोजी अहवाल दिला आहे. संबधीत तलाठ्याने अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास त्यांच्या पातळीवर सरळ उत्तर देणे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात तहसीलदार वैजापूर यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी

आपला अहवाल पाठविला. या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थी यांना अग्रेषित केलेली नाही. थोडक्यात संबधीत तलाठ्याच्या अशा प्रकारच्या कारवाईमुळे अपिलार्थी हे त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येते. संबंधीत तलाठी यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत अपिलार्थीस पाठविली असती तर त्यांची ही कारवाई माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य ठरली असती. अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याबाबत प्रथमतः तहसीलदार वैजापूर यांनी संबंधीत तलाठ्यास लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळले. या पत्राची प्रत तहसीलदार यांनी अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना दिनांक ०७-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना प्रथमतः दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या प्रकरणाची स्थिती अवगत करण्यात आली. अशा त-हेने अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात एकूण ४७ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. किंबहुना या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून ४७ दिवस इतक्या कालावधीकरिता सबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून वंचित ठेवले गेले हे म्हणणे

येथे जास्त उचित ठरेल. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या या विलंबाचे कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरुपात समर्थन असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस ४७ दिवस इतक्या कालावधीकरिता माहिती प्राप्त होण्यपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण (४७ दिवसाकरिता) रुपये ११७५० /- (अक्षरी- रुपये अकरा हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. याचबरोबर उपविभागीय अधिकारी वैजापूर यांना असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत प्रकरणाची संचिका गहाळ झाल्यासंदर्भात सर्व जबाबदार कर्मचा-यावर/ अधिका-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सदर संचिकेचा शोध घेऊन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस ४७ दिवस इतक्या कालावधीकरिता माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण (४७ दिवसाकरिता) रुपये ११७५० /- (अक्षरी- रुपये अकरा हजार सातशे पन्नास इतकी) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

३. उपविभागीय अधिकारी वैजापूर यांनी संबंधीत प्रकरणाची संचिका गहाळ झाल्यासंदर्भात सर्व जबाबदार कर्मचा-यावर/ अधिका-यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे

यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सदर संचिकेचा शोध घेऊन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०८-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड चंद्रकांत दगू, लाडवाणी गल्ली, विठ्ठल मंदिराचे पाठीमागे, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३१

निर्णय दिनांक ०८-०५-२००८

श्री. चौधरी महमंद मोईनोद्दीन गौस : अपिलार्थी
मणियार,
नेहरु चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा संशोधन अधिकारी व सदस्य
सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र
पडताळणी समिती क्रमांक १, विभागीय
समाजकल्याण अधिकारी कार्यालय,
सुराणानगर, जालना रोड, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय समाजकल्याण
अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र
पडताळणी समिती क्रमांक १,
औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चौधरी महमंद मोईनोद्दीन गौस मणियार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती श्री. रामदास नारायण वैद्य (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती श्री. दत्तात्रेय प्र. वाकोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. सन ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ उस्मानाबाद शहर मुस्लिम ओ. बी. सी. जातीचे एकूण किती प्रकरण दाखल झाले ? किती वैधता प्रमाणपत्र देण्यात आले ? व किती प्रकरणे प्रलंबीत आहेत.

२. मुस्लिम ओ. बी. सी. जात सिध्द करण्यासाठी किती पुरावे लागतात ? शासन नियमाप्रमाणे कोणकोणते कागदपत्र लागतात ? त्याच्या शासन आदेशाची प्रत द्यावी.

३. आपण जे कागदपत्राची मागणी करता ते कोणते कागदपत्रे ? व कोणत्या शासन आदेशाप्रमाणे ?

४. शासन नियमाप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्र किती दिवसात देणे बंधनकारक आहे ?

५. शासन नियमाप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र वेळेवर देण्यात आले नसेल तर संबंधीत अधिका-यांवर कोणती कारवाई होते ?

६. सन ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ पर्यत (हिंदू मुस्लीम) ओ. बी. सी. चे किती जात पडताळणी प्रमाणपत्राचे प्रकरण दाखल झाले (मराठवाडा विभाग) ? किती वैधता प्रमाणपत्र देण्यात आले ? व किती रद्द करण्यात आले ? तसेच हिंदू ओ. बी. सी. चे (मराठवाडा विभागात) एकूण किती जात पडताळणी प्रमाणपत्राचे प्रकरण दाखल झाले ? किती वैधता प्रमाणपत्र देण्यात आले व किती रद्द करण्यात आले व किती प्रलंबीत आहेत ? तसेच मुस्लीम ओ. बी. सी. चे (मराठवाडा विभागात) एकूण किती जात पडताळणी प्रमाणपत्राचे प्रकरण दाखल झाले ? किती वैधता प्रमाणपत्र देण्यात आले ? व किती रद्द करण्यात आले ? व किती प्रकरणे प्रलंबीत आहेत.

७. सन २००६ मध्ये झालेल्या न. प. निवडणुकीवेळी उस्मानाबाद शहरातील हिंदू मुस्लीम ओ. बी. सी. दोन्ही समाजाचे मिळून एकूण किती प्रकरण दाखल झाले ? निवडणुकीपूर्वी हिंदू ओ. बी. सी. चे किती जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले व मुस्लीम ओ. बी. सी. चे किती जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले.

८. सन ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ पर्यत गृहचौकशी झालेल्या उस्मानाबाद शहरातील मुस्लीम ओ. बी. सी. अर्जदाराचे नाव काय आहे ? जात कोणती आहे ? पत्ता काय आहे ? पंचाचे नाव काय आहेत ? जागेवर पंचनामा झाला काय ? याची माहिती द्यावी.

९. गृहचौकशीचे वेळी पंचाचे जबाब घेणे आवश्यक आहे का ?

१०. जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल झाल्यानंतर आपणाकडून त्रुटी एकदाच काढली जाते का ? किंवा अनेक वेळी त्रुटी काढून कागदपत्राची मागणी केली जाते ?

११. जात पडताळणी प्रमाणपत्राची सुनावणी (अर्जदाराची) एकदाच होते का ? नियमाप्रमाणे किती वेळा सुनावणी व्हायला पाहिजे ?

१२. ज्या मुस्लीम ओ. बी. सी. अर्जदाराकडे जात सिध्द करण्यासाठी सबळ पुरावे आहेत त्यांची गृहचौकशी आवश्यक आहे का ? ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ पर्यत दाखल झालेल्या मुस्लीम ओ. बी. सी. अर्जदाराने (उस्मानाबाद शहर) काय पुरावे जोडले आहेत त्याची माहिती ?

१३. उस्मानाबाद शहरातील ज्या हिंदू ओ. बी. सी. अर्जदाराकडे सबळ पुरावे आहेत त्यांची गृह चौकशी केली जाते काय ? केली असेत तर त्या अर्जदाराची नावे व माहिती द्यावी व अर्जदाराने कोणते पुरावे जोडले त्याची माहिती द्यावी (०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७).

१४. माहिती अधिका-याच्या नियमानुसार माहिती देण्यासाठी प्रति पान किती रुपये दर ठरलेला आहे. दर ठरलेले शासन परिपत्रकाची प्रत देणे.

१५. अतिरिक्त आयुक्त सांगळेसाहेब यांनी आजपर्यत त्यांच्या कालावधीत मराठवाडा विभागात हिंदू ओ. बी. सी. चे किती वैधता प्रमाणपत्र दिले ? व मुस्लीम ओ. बी.सी.चे किती वैधता प्रमाणपत्र दिले ? तसेच उस्मानाबाद शहरातील हिंदू ओ. बी. सी. चे किती वैधता प्रमाणपत्र दिले व मुस्लीम ओ. बी. सी. चे किती वैधता प्रमाणपत्र किती दिले ? किती वैधता प्रमाणपत्र दिले ?

१६. ०१ मार्च २००० ते ०१ मार्च २००७ पर्यत ज्या मुस्लीम ओ. बी. सी. अर्जदाराची गृहचौकशी झाली त्या सर्व अर्जदारांच्या दक्षता पथकाच्या अहवालाची प्रत व त्या सर्व अर्जदारांची पंचनाम्याची प्रत देण्यात यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या १६ मुद्दयावरील माहितीसंदर्भात काही खुलासा केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलासंदर्भात दिनांक १५-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०४-०७-२००७ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्देनिहाय व सविस्तर माहिती दिली असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अपिलीय अधिका-याने त्यांच्या अपिलावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशीरा, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीचे अपिलीय अधिकारी यांनी समर्थन केले आहे व त्यांना मुद्देनिहाय माहिती दिली असे गृहीत धरुन त्यांचे अपील अमान्य केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती मुद्देनिहाय नसून त्यांना मुद्देनिहाय माहिती मिळावी व संबधीत अधिका-यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे यथायोग्य कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीची मागणी करतेवेळी नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती इत्यादीच्या निवडणुका असल्यामुळे व या कालावधीत त्यांच्याकडे या निवडणुका-संबंधीची बरीच प्रकरणे प्रलंबीत असल्याने अपिलार्थीस त्यांना विहित मुदतीत उत्तर देता आले नाही. अपिलार्थीने ज्या स्वरुपात त्यांच्याकडे माहिती मागविली होती त्या स्वरुपात माहिती जतन करुन ठेवली जात नाही. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये योग्य ते स्पष्टीकरण दिले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपात असून अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहिती अपेक्षित केली आहे त्या स्वरुपात माहितीचे जतन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत केले जात नाही. जात पडताळणी समितीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गाची संख्या पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देणे हे काम जिकरीचे आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०४-०७-२००७ रोजी पारीत

केले.  अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.  अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही असे म्हटले आहे.  तथापि हे विधान वस्तुस्थितीला धरुन नसून हे विधान त्यांना क्लेषकारक आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणावर आहे.  अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०४-२००७ रोजी दिलेल्या उत्तरा-दाखल पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता, त्यामध्ये अपिलाथीने विचारलेल्या प्रश्नांना सरळ उत्तरे दिली गेली नसल्याचे दिसून येते.  जन माहिती अधिकारी यांना याबाबत विचारले असता अपिलार्थीने ज्या स्वरुपात माहितीची विचारणा केली आहे त्या स्वरुपात सदर माहिती ठेवली जात नसल्याचे आयोगास सांगितले.  जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती त्यांना हवी असल्याचे त्यांच्या कार्यालयातील सर्व अभिलेख व नस्त्या त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी देखील दर्शविली आहे. तथापि

त्या पाहण्यास अपिलार्थी हे तयार नाहीत त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या कागदपत्रामध्ये उपलब्ध आहे त्या कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे सोयस्कर होईल असे आयोगाचे मत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील ज्या कागदपत्रामध्ये उपलब्ध आहे त्या सर्व कागदपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात याव्यात.  अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर कोणत्याही टप्प्यावर टाळाटाळ केल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून न आल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगवशात् अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण ७ वर्षाची व प्रचंड प्रमाणात व्याप्ती असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.  अशा प्रकारची मोठी व्याप्ती असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचे आयोगास आढळून आले त्यामुळे अशा प्रवृत्तीला आवर घालण्याच्या दृष्टीने अर्जदारास

आवश्यक असलेल्या माहितीच्या आकारमानावर बंधने घालण्याची गरज आहे असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती १० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक ०८-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी महमंद मोईनोद्दीन गौस मणियार, नेहरु चौक, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, सुराणानगर, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३६

निर्णय दिनांक १२-०५-२००८

श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
रा. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
माजलगाव तालुका माजलगाव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
अंबाजोगाई जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण ग्यानबा बापमारे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, माजलगाव श्री. कोंडा सत्थनारायण सुबय्या (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबाजोगाई श्री. कासीम अली बशीर अली फकीर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९३ ते २००७ पर्यतच्या कालावधीतील घरगुती वापराकरिता घेतलेल्या विद्युत मिटरसंबंधी दुरुस्तीसंदभात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ वर दर्शविल्याप्रमाणे मिटर घेतले आहे. याबाबत आपल्या कार्यालया ला बील दुरुस्तीबाबत व नावात झालेल्या दुरुस्तीबाबत अनेक वेळा अर्ज दिले. परंतु ग्राहकाच्या नावात दुरुस्ती झाली परंतु बीलात अद्यापपर्यत दुरुस्ती झालेली नाही. करीता विद्यूत बीलात रिडींग प्रमाणे दुरुस्ती करुन मिळावी. व दुरुस्त केलेले रिडींगपमाणे बील द्यावे ही विनंती. ”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जावर कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास नाकारले असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १३-०४-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत मोफत माहिती देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सुचनेपमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्या मिटर दुरुस्तीची मागणी मान्य करता येणे शक्य नसल्याचे कळविले. या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांच्याकडील थकीत बील रक्कमेची माहिती कळविली असून या बिलातील रक्कम योग्य असल्याचा निर्वाळा अपिलार्थीस देऊन थकीत बिलाची पूर्ण रक्कम त्यंच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती कायम ठेवली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य मिळण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दुरुस्त मिटरच्या रिडींगप्रमाणे त्यांना बील आकारल्यास ते बील भरण्यास ते तयार आहेत. त्यांचे मिटर संबंधीत विद्युत वितरण कंपनीने काढून नेले

असल्याने ते परत बसवावे व त्यांना मिटरच्या रिडींगसह प्रत्येक महिन्यास बिल देण्यात यावे ते बिल भरण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस रिडींगप्रमाणे बिल दिलेले आहे. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनाक १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये सद्यस्थिती कळविली आहे. (त्याच्या अर्जातील संदर्भातील).

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मिटरप्रमाणे तपासणी करुन अपिलार्थीस आवश्यक वाटल्यास सुधारीत बिल देण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जाव्दारे, स्वतःच्या विद्युत मिटरच्या दुरुस्ती व बीलासंदर्भातील तक्रारीचा निपटारा करुन घेण्याचे ठरविले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन पाहता यामध्ये अपिलाथीने यांच्या मिटरची दुरुस्ती करुन मिळावी व दुरुस्त केलेले बिल त्यांना द्यावे या विनंतीस माहितीचे स्वरुप देण्याचा प्रयत्न केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. जी खालील प्रमाणे आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

“माहिती” याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीने मागितलेली माहिती वरील व्याख्येशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नाही.

अपिलार्थीची त्यांच्याकडील विद्युत बिलासंदर्भात व विद्युत मिटरसंदर्भात काही तक्रार असल्यास त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे वेगळ्याने अर्ज करुन आपल्या तक्रारीचा निपटारा करुन घेणे या प्रकरणी संयुक्तिक होईल. अपिलार्थीच्या मिटर तपासणीचे व आवश्यक वाटल्यास अपिलार्थीस सुधारीत बिल देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अर्थात हा विषय राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आश्वासनाने अपिलार्थीची तक्रार लवकर सुटण्यास मदत होईल एवढेच येथे सांगता येईल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही “माहिती” या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने ती माहितीचा विषय ठरु शकत नाही त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १२-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, रा. मंगरुळ नं. १, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, माजलगाव तालुका माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबाजोगाई जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५८

निर्णय दिनांक १२-०५-२००८

श्री. गंगाधर शिवाजी झिंझाडे, : अपिलार्थी
रा. ४३, दिपज्योती निवास, उल्हासनगर,
मालेगाव रोड तरोडा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हिमायतनगर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गंगाधर शिवाजी झिंझाडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर श्री. तुपे राधाकिसन बंडूजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर श्री. संतुकराव गणपतराव भुसेवाड (यापुढे त्यांना

जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), त्रयस्थ पक्ष श्री. संतोष शेषराव शिंदे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिमायतनगर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांना वितरीत केलेल्या रॉकेल साठ्याविषयी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ हिमायतनगर तालुक्यातील अ. घा. रॉकेल विक्रेता श्री. संतोष शेषेराव शिंदे ला. नं. ४१/९८, श्री. शंकरराव पळशीकर केरोसीन पंपधारक यांना सलग्नीत आसलेले किरकोळ रॉकेल विक्रेते यांना वाटप केलेल्या बील पुस्तीकेच्या छायांकीत पावत्या, वितरण रजिस्टरच्या, स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती मिळणे व त्यावेळी मिळालेल्या द मा नियतनाच्या सत्यप्रती मिळणेबाबत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन वरील प्रमाणे. ”

अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नसल्याने त्यांनी संबंधीत अर्धघाऊक रॉकेल विक्रेते यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितली. सदर अर्जाची प्रत त्यांनी अपिलार्थीस देऊन अपिलाथीस संबधीत अर्ध घाऊक विक्रेत्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस ती देण्याचे आश्वासीत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास काही मार्ग नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे, अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०२-०५-२००८ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना, त्यांना आवश्यक असलेली माहिती परस्पर संबधीत अर्धघाऊक विक्रेत्यांकडून प्राप्त झाली असल्याने त्यांचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्याची विनंती केली आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांना अद्यापही त्यांचा निर्णय द्यावयाचा आहे.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिकूल प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले होते. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दिनांक ०७-०६-२००७ रोजी केलेले प्रथम अपील देखील चालवावयाचे नाही कारण त्यांना आवश्यक ती माहिती परस्पर त्रयस्थ पक्षाकडून प्राप्त झाली आहे. मुळात अपिलार्थीस प्रथम अपील चालवावयाची इच्छा नसल्याने त्यांनी आयोगाकडे सादर केलेले त्यांचे दिनांक १९-०७-२००७ रोजीचे व्दितीय अपील आता सुनावणीयोग्य नाही असे अनुमान काढून अपिलार्थीचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १२-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गंगाधर शिवाजी झिंझाडे, रा. ४३, दिपज्योती निवास, उल्हास नगर, मालेगाव रोड तरोडा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०२

निर्णय दिनांक १२-०५-२००८

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड :

२ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड : प्रतिवादी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ व त्रयस्थ पक्ष श्री. विश्वनाथ बन्सीलाल इनामी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. गंगाधर शिवलींग रामोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद श्री. दिगंबर तुकाराम

सोनटक्के (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल २००५ ते ऑक्टोंबर २००६ पर्यतच्या कालावधीतील तालुक्यातील रॉकेल वाटपासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " धर्माबाद तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. विश्वनाथ बन्सीलाल इनामी, परवाना क्रमांक ६०/९८ यांना शासनाकडून वितरण केलेल्या रॉकेलची महिनेवारी रॉकेल वितरण व स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती तसेच त्याना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना वितरण केलेल्या रॉकेलची वितरणाची तपशील व स्टॉक रजिस्टराच्या सत्यप्रती तसेच त्यांच्याकडून किरकोळ रॉकेल हॉकर्सना रॉकेलच्या दिलेल्या पावतीची (रकमेची पावतीच्या) सत्यप्रती मिळणेबाबत."

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी जाणुन-बुजून टाळाटाळ व विलंब करत असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास जाणुन-बुजून विलंब लावत असून टाळाटाळ करत आहेत असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी या अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ०९-०९-२००७ रोजी रुजू झाले आहेत. त्यांना या प्रकरणाची काही माहिती नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ३१-०३-२००८ रोजी रुजू झाले आहेत. अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्याकडील दिनांक ०३-१०-२००७ रोजीचे एक पत्र दिले असून या पत्रा-मध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधीत अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्या-कडून परस्पर प्राप्त करुन घेतल्याने त्यांना आता माहितीची आवश्यकता नाही असे अर्जदाराने म्हटले आहे या पत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००७ रोजी त्यांच्याकडील सुनावणीसाठी बोलाविले होते. अपिलार्थीने माहितीसाठी केलेला मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी बोलाविलेला दिनांक यामधील दीर्घ कालावधीमध्ये अपिलार्थीने स्वतःहून ४ अर्धघाऊक विक्रेते यांची आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेतल्याचे त्यांचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांना दिले. या पत्राची प्रत जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केली असून त्यामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती एप्रिल २००७ मध्ये पस्पर संबंधीत अर्धघाउक विक्रेत्याकडून त्यांना मिळाली असल्याने याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिली नाही. या अर्जामधे् त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यासाठी विनंती केली आहे. अपिलार्थीच्या अर्जावर दिनांक ०३-१०-२००७ रोजी यांनी त्यांचे कार्यालयात सुनावणी घेऊन त्यांच्या कार्यालयातील नस्तीवर अपिलार्थीचा

अपील अर्ज निकाली काढला आहे आहे. येथे दिसून येते की, अपिलार्थीच्या विनंतीनुसार जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-१०-२००७ रोजी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढलेला आहे तथापि अपिलार्थीने या सुनावणीपूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले होते. अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्यासंदर्भात राज्य माहिती आयोगास कोठल्याही प्रकारे अवगत केले नव्हते. हे अपील आज सुनावणीस आले आहे. अपिलार्थीस आता माहिती मिळाली आहे व त्यांनीच खुद्द जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची विनंती केली आहे. त्यामुळे आता या टप्प्यावर आयोगास त्यांच्या व्दितीय अपीलासंदर्भात सुनावणी घेण्याचे कोणतेही प्रयोजन उरलेले नाही. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १२-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील

कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३४

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

१ श्री. अशोक सर्जेराव देशमुख, : अपीलार्थी
१५, स्वानंदनगर,न्यू श्रेयनगर, औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा उपअभियंता, नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सहायक संचालक,
नगररचना, महानगरपालिका,
औरंगाबाद.

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अशोक सर्जेराव देशमुख (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद श्री. प्रकाश गोपीनाथ पवार ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगररचना,महानगर पालिका,औरंगाबाद ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०६ या कालावधीतील, त्यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" अ) श्री. ए.पी.घुगे, प्लॉट क्र.१६,स्वानंद गृह निर्माण सहकारी संस्था, न्यु श्रेयनगर औरंगाबाद हयांना दिनांक ३/१०/०५ रोजी लॉजिंग बोर्डींगसाठी निवासी भूखंडावर बांधकाम करण्यासाठी परवाना दिला. सद्यस्थितीत सदरील भूखंड निवासी आहे किंवा कमर्शिअल आहे याबाबत लेखी माहिती मिळावी.

ब) सदरील भूखंड निवासी असतांना कमर्शिअल करण्याचे आपणास अधिकार आहेत काय याबाबत लेखी माहिती मिळावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात खालीलप्रमाणे उत्तर दिले.

"वरील विषयी संदर्भीय पत्र या विभागास प्राप्त झाले असून सदर पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपणास नेमक्या कोणत्या संचिकेतील कागदपत्रांची झेरॉक्स पाहिजे आहे त्याबाबत मौजाचे नाव,गट नंबर/सि.स.नं.,संचिका क्रमांक व दिनांक,विकास परवाना क्रमांक व दिनांक, ईत्यादी संपूर्ण तपशिलासह अर्ज केल्यास त्यानुसार संचिकेचा शोध घेऊन आपणास आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे झेरॉक्स प्रती आवश्यक ते शुल्क आकारुन (दारिद्रय रेषे व्यतिरीक्त असल्यास) पुरविणेसाठी नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल."

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिल अर्जात त्यांनी मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीच्या अपिल अर्जास त्यांचेकडील दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

"अ. श्री. ए.पी.घुगे, प्लॉट नंबर १६, स्वानंदनगर हा भूखंड मंजूर रेखांकनातील भूखंड असून विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सदरील भूखंडावर अनुज्ञेय असलेल्या वापरानुसार बांधकाम परवानगी दिली आहे.

ब. सदरील भूखंडावर शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्याचे या कार्यालयास अधिकार आहेत. "

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले व या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तीवाद लेखी स्वरुपात सादर केला, त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मोघम स्वरुपात व दिशाभूल करणारे उत्तर दिले असल्याचे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती लेखी स्वरुपात आज रोजी मिळावी तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल त्यांचेवर दंडनीय कार्यवाही व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि.२०.४.२००७ रोजी त्यांनी त्यांचेकडील दि. १९.५.२००७ च्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन

त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना नेमक्या कोणत्या संचिकेतील कागदपत्रांची झेरॉक्स हवी आहे, त्या मालकाचे नाव,गट.नं.,संचिका क्रमांक,दिनांक/विकास परवाना क्रमांक व दिनांक इत्यादी संपूर्ण तपशील त्यांचेकडे मागितला. तद्‌नंतर परत अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस श्री. ए.पी.घुगे, प्लॉट नं.१६ स्वानंदनगर हा भूखंड मंजूर रेखांकनातील भाग असून, सदर भूखंडावर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेल्या वापरानुसार त्यांनी बांधकाम परवानगी दिल्याचे कळविले. तसेच सदर भूखंडावर शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार त्यांचे कार्यालयास असल्याचे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप साधे व सरळ होते, तथापि अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचेकडील दि.१९.५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविण्याऐवजी अपिलार्थीकडूनच गट क्रमांक, सिटीसर्व्हे क्रमांक, विकास परवाना क्रमांक, दिनांक इत्यादी तपशीलाची, जी जन माहिती अधिकारी यांचेकडेच उपलब्ध होती, त्या विषयीची मागणी केली. कोणत्याही सामान्य नागरिकाकडे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहिती संदर्भात माहिती अधिकाऱ्याच्या कार्यालयात असलेल्या माहितीशी संबंधित संचिका क्रमांक व दिनांक इ.माहिती असणे कोणत्याही परिस्थितीत अपेक्षित नाही, तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे सरळ उत्तर देण्याऐवजी, उलट अपिलार्थीस त्यांचे कार्यालयातील नस्तीचा क्रमांक व दिनांक विचारणे याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी शोधलेली ही पळवाट आहे, असे आयोग मानत आहे. त्यानंतर देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता, अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनीच त्यांचेकडील दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविली. या पत्रामधील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या सरळ प्रश्नाचे सरळ उत्तर देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळलेले आहे. त्यांनी अपिलार्थीस सदर भूखंडावर शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेल्या वापरानुसार बांधकाम परवानगी दिल्याचे कळविले आहे. ही तरतुद निश्चितपणे कोणती आहे व तसे अधिकार नगर रचना खात्याचा आहे किंवा कसे याची माहिती अपिलार्थीस हवी होती, तथापि अशाप्रकारची कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीवर त्यांनी, फक्त अधिनियमातील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी दिली आहे व ते अधिकार त्यांचे कार्यालयास आहेत, एवढेच मोघम उत्तर दिले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांची तपासणी घेत असतांना पहिल्या प्रश्नाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी असे दिले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. अ शी संबंधित भूखंड निवासी क्षेत्रातील आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या इमारत बांधकाम व विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.Appendix-M (Bylaw No.14.2) चे कलम M.2.3(VII) मधील तरतुदीनुसार त्यांनी श्री.घुगे यांना भूखंडावर लॉजिंग व बोर्डींगचे बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे.

वास्तविक पहाता, अपिलार्थीने केलेल्या दि. २०.०४.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे उत्तर त्यांचे दि. १९.५.२००७ च्या पत्राद्वारे दिले असते तर कदाचित अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी किंवा आयोगाकडे अपिल करण्याची गरज पडली नसती. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दिलेले वरील उत्तर व अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांना लिखित स्वरुपात एक दिवसाचे आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर कबूल केले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच एक दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे वरीलप्रमाणे स्पष्ट होत आहे. अपिलार्थी यांनी विचारलेल्या माहितीचे सरळपणे उत्तर न देता, त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी मोघम स्वरुपात उत्तर दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेण्याचे साधे सौजन्यही दाखविले नाही. एवढेच नव्हे तर त्यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जाच्या संबंधाने अपिलार्थीस कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून आले नाही. त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) च्या तरतुदींचा निःसंशयपणे भंग केल्याचे सिध्द होत असून, त्यांच्या या बेपर्वा कार्यपध्दतीची आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी यथायोग्यरितीने नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यास हेतूपुरस्सर विलंब लावला व अपिलार्थीस केवळ मोघम स्वरुपात बेजबाबदार मजकुर असलेले पत्र लिहून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणातील अशाप्रकारच्या वर्तनाबाबत त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित झाल्यानंतर दोन महिन्याचे आत करुन तद्‌नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच एक दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांचेवर हे आदेश निर्गमित होताच प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक सर्जेराव देशमुख,१५, स्वानंदनगर,न्यू श्रेयनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना,महानगरपालिका, औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३७

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

१ श्री. जॉन शामवेल आव्हाड, : अपीलार्थी
लक्ष्मी कॉलनी, प्रज्ञानगर, घ.नं.४/२०/४४,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद

**विवेचन**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जॉन शामवेल आव्हाड (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद श्री. कमलाकर भिवाजीराव

गायकवाड, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद श्री. बनसोडे अर्जुन रोहीदास ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १४.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात दि. २२.५.२००३ अखेरच्या साप्ताहिक अहवालानुसार खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मा. उपविभागीय अभियंता,सा.बां.उपविभाग वैजापूर कार्यक्षेत्रात रो.ह.यो.योजनेतून गारज पाकीट मध्ये

१) जातेगाव ते गायकवाड वस्ती मजूर उपस्थिती १७९.

२) वक्ती ते घोगरगाव रस्ता मजुर उपस्थिती २०६.

३) वक्ती ते वरखेड रस्ता मजुर उपस्थिती १००.

हया तीनही रस्त्यावर दि. २२.५.२००३ अखेरच्या साप्ताहिक अहवालामध्ये मातीकाम केलेले आहे. हया कामाचे हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती देण्यात यावे हि विनंती."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.४.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.५.२००७ रोजी

सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.६.२००७ पर्यंत माहिती देण्याचे आदेशित केले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ५.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे निर्गमित केले आहेत. जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून या माहितीशी संबंधित उपअभियंता श्री. ए.टी.नवटक्के यांना २५०००/- शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २३.७.२००७ रोजी व्यक्तीशः व विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले असून अपिलार्थी यांनी त्याप्रमाणे स्थळप्रतीवर दि. २३.७.२००७ रोजी लेखी पोचसही केली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी तयार होती, तथापि अपिलार्थी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात दि. २३.७.२००७ रोजी व्यक्तीशः उपस्थित झाल्याने सदर माहिती त्यांना दि. २३.७.२००७ रोजी देण्यात आली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांचेकडे झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थीने दि. ५.६.२००७ पर्यंत जरी माहिती मिळाली तरी चालेल असे कबूल केल्याने, माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी अपिलार्थीने मूळ अर्ज केल्याची तारीख व त्यांचेकडील सुनावणीची तारीख यामधील कालावधी विलंब म्हणून समजू

नये, अशी विनंती करुन अपिलार्थीच्या दि. २३.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दि. ५.६.२००७ रोजी आदेश पारित केले असल्याचे आयोगास अवगत केल आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २३.७.२००७ रोजी व्यक्तीशः माहिती उपलब्ध झालेली आहे. सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पोच देतांना म्हटले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २६.६.२००७ रोजी उपलब्ध होती, तथापि अपिलार्थी यांनी व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना त्याच दिवशी सदर माहिती देता आली नाही. त्यानंतर अपिलार्थी हे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना दि. २३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली. अपिलार्थीस आता जरी माहिती उपलब्ध झाली असली तरी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीचे पालन केले नाही, हे वरील घटनाक्रमातून स्पष्ट होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न कळवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. उपरोक्त प्रकरणी कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडेच उपलब्ध होती, तथापि त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत दिल्याचे आढळून येत नाही. अशाप्रकारे त्यांनी या प्रकरणी दर्शविलेला त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच

३ महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येते.

वरील विवेचनाचे पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल मान्य.

२. सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी उपरोक्त प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेश निर्गमित होताच ३ महिन्याचे आत, करुन तद्नंतर एक महिन्याचे आत, आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जॉन शामवेल आव्हाड,लक्ष्मी कॉलनी, प्रज्ञानगर, घ.नं.४/२०/४४,औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३८

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

१ श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे पाटील, : अपीलार्थी
बालक मंदिर शाळेजवळ,
संतकृपा निवास, जिंतूर,
जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा सहायक आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन विभाग,
परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सहआयुक्त, (औरंगाबाद विभाग)
अन्न व औषध प्रशासन
महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे पाटील (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा

सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, परभणी श्री. चंद्रकांत पांडुरंग भस्मे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त (औरंगाबाद विभाग), अन्न व औषध प्रशासन विभाग, म.रा.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी सहायक आयुक्त श्री. चनबसप्पा गुरुलिंगप्पा कुरुनकर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०५.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " लाखाची दाळ विकणे कायदयाने गुन्हा आहे काय ? कोणत्या कलमान्वये संबंधितांवर कार्यवाही होवू शकते ? लाखाची दाळ सेवण केल्याने शरीरास कोणती बाधा होवू शकते ? प्रशासनाने आजपर्यंत लाखाची दाळ विक्री/व्यवहार करण्यास प्रतीबंध/बंदी आहे का ? लेखी मिळणेबाबत. "

सदर माहिती अपिलार्थीने साध्या टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. ०७.०६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. अपिलार्थीने संबंधित अपील जन माहिती अधिकारी यांचेकडेच केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज प्रत्यक्षतः जे जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, त्यांचेकडे पाठविला, सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. १२.६.२००७ रोजी प्राप्त झाला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात प्रत्यक्षतः सुनावणी घेतल्याचे आयोगास

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर त्यांनी आपले आदेश दि. २७.६.२००७ रोजी पारित केले असून अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना ५ दिवसांचा जादा कालावधी लागला, ही बाब सत्य आहे, असा निर्णय दिला, या निर्णयावर अपिलार्थीच्या अपील अर्जामध्ये कोणतेही भाष्य केल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूरी माहिती दिल्याचे नमुद केले आहे. त्यांनी मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मधील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून आजपर्यंत मिळाली नसल्याचे त्यांनी नमुद केले असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ५ दिवस इतक्या उशीराने माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ३.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. सदर पत्र दि. ३.५.२००७ रोजी तयार होते. तथापि ते अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावयाचे ठरविल्यामुळे संबंधित लिपीकाकडून पाच दिवस इतक्या विलंबाने सदर पत्र रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले गेले आहे. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अशा कामासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास पाच दिवसांचा विलंब लागला आहे. सदर विलंब त्यांनी हेतुपूर्वक अथवा माहिती देण्याचे टाळण्याच्या दृष्टीने लावलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती विहित मुदतीत तयार करुन ठेवली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती त्यांचेकडे पोस्टर्सच्या स्वरुपात उपलब्ध असून ही माहिती अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यामध्ये नाही.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहितीचे उत्तर 'होय' असे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या मूळ अर्जामध्ये प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती देण्याचे ठरविले. अपिलार्थीने जरी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असली तरी या प्रश्नांची उत्तरे ज्या माहितीमध्ये उपलब्ध आहेत, अशा प्रकारची माहिती त्यांनी अपिलार्थीस देण्यास काहीही प्रत्यव्याय नाही. येथे सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यास पाच दिवस विलंब लागल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासाठी, कर्मचाऱ्यांचा तुटवडा हे कारण आयोगास सांगितले, तथापि, हे कारण आयोग मान्य करीत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत देणे अनिवार्य आहे, याची जाणीव त्यांना, या ठिकाणी करुन देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती पाहता, त्यातील मुद्दा क्र. ३ व ४ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सरळपणे व स्पष्ट स्वरुपात दिली नसल्याचे दिसून येते. लाखाची डाळ सेवन केल्यास शरीरास कोणती बाधा होऊ शकेल, याबाबत प्रश्नार्थक स्वरुपात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली

आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या प्राधिकरणातर्फे छापल्या गेलेल्या पोस्टर्सवर उपलब्ध आहे. त्यामुळे या प्रकरणी सदर पोस्टरची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे उचित ठरले असते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ४ च्यासंदर्भात 'होय' किंवा 'नाही' ही दोनच उत्तरे असू शकतात. तथापि या मुद्यांवर देखिल अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सरळ उत्तर दिले नाही. या मुद्यावर लाख डाळीची विक्री करण्यास बंदी असल्याचे अपिलार्थीस कळविण्यास, जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती अपिलार्थीस माहिती देतांना मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भात केली असल्याचे दिसून येत नाही. अर्थात, अपिलार्थीस अशा प्रकारचे उत्तर देण्यामागे कोणताही असद्हेतू असावा, असे आयोगास वाटत नाही. तथापि येथून पुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर सकारात्मक दृष्टीने व विहित मुदतीत कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी, आता अपिलार्थी यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत विनामूल्य द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जितेंद्र बाबाराव रोकडे पाटील,बालक मंदिर शाळेजवळ,संतकृपा निवास, जिंतूर,जि.परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,अन्न व औषध प्रशासन विभाग,परभणी. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३९

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. रमाकांत अच्युतराव चौधरी,<br>सेवानिवृत्त मंडळ निरीक्षक (महसूल)<br>रा. नानलपेठ, परभणी<br>जि. परभणी | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अपर जिल्हाधिकारी,<br>परभणी. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रमाकांत अच्युतराव चौधरी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विश्वंभर मारोतीराव गावंडे, ( त्यांना यापुढे जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,परभणी यांचे प्रतिनिधी तहसीलदार,परभणी श्री. जयराम सिताराम पवार ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १३.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९६३-१९७७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "१९६३ ते १९७७ या कालावधीत तयार झालेल्या अव्वल कारकुन पदासाठी पदोन्नतीच्या निवडसूची."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १.१२.००६ च्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन मागितलेली कागदपत्रे जुनी असल्यामुळे व शोधण्यास वेळ लागत असल्यामुळे सदर माहितीचा शोध घेत असल्याचे व माहिती उपलब्ध होताच अपिलार्थीस देण्यात येईल, असे कळविले व त्यानंतर उपलब्ध झालेली कागदपत्रे अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली आहे. तद्नंतर त्यांचेकडील अभिलेख कक्षामध्ये परत शोध घेतला व ही कागदपत्रे शोधण्याचे काम झाल्यानंतर अपिलार्थी यांना दि. १२.१.२००७, ९.४.२००७ व ३.४.२००७ रोजी माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०७.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २२.५.२००७ व २९.५.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १२.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपिल फेटाळून लावले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या

अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जातील अपिलार्थीचे म्हणणे ऐकून न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिल अर्जावर निर्णय दिला आहे, असे नमुद करुन त्यांची पदोन्नती टाळण्याची कारणे समोर येऊ नयेत, म्हणून दि. १७.७.१९९२ च्या प्रस्ताव पाठविल्याचा आपल्या निकालपत्रामध्ये मुद्दाम उल्लेख केला आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २.१०.१९७० च्या निवडसूची अद्यापपावेतो दिल्या नसल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शिक्षेस पात्र असतांना देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी ही बाब विचारात घेतली नाही, असे या अर्जामध्ये म्हटले आहे व शेवटी जन माहिती अधिकारी यांनी विशिष्ट कालावधीत दि. २.१०.१९७० च्या निवडसूची उपलब्ध करुन देण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही १९६३ ते १९७७ या कालावधीची आहे. या कालावधीतील अव्वल कारकुनाच्या निवडयाद्या शोधण्याचा त्यांनी भरपूर प्रयत्न करुनही त्यांना अपिलार्थीस हवी असलेली दि. २.१०.७० ची निवडसूची सापडत नाही. अपिलार्थीस सदर माहिती त्यांना अव्वल कारकुन संवर्गात मानीव दिनांक १७.७.१९९२ मिळण्यासाठी हवी आहे. अपिलार्थीस मानीव दिनांक देण्याचे प्रकरण आज रोजी शासनस्तरावर प्रलंबित आहे. त्यांच्या अभिलेख कक्षात अपिलार्थीने मागितलेली माहिती जसजशी उपलब्ध झाली तसतशी त्यांनी अपिलार्थीस दि. ११.१२.२००७, १२.१.२००७ व ९.४.२००७ अशी तीन वेळा पुरविली आहे. अपिलार्थीने

संदर्भित केलेल्या दि. २.१०.१९७० च्या यादीबाबत त्यावेळच्या कार्यालयीन टिपणीची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्टयर्थ त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दि. २.१०.१९७० च्या टिपणीची प्रत आयोगास सादर केली. सदर प्रत त्यानी अपिलार्थीस दि. ११.१२.२००६ च्या पत्रान्वये दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. ७.५.२००७ च्या अपिल अर्जावर दि. २२.५.२००७ व २९.५.२००७ रोजी सुनावणी घेतली व अंतीमतः अपिलार्थीचे अपिल फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून १९६३ ते १९७७ या कालावधीतील अव्वल कारकून संवर्गाच्या निवडसूचीच्या प्रती मागितल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडे या विषयासंदर्भात उपलब्ध असलेली सर्व माहिती वेळोवेळी पुरविली आहे. तथापि माहिती मध्ये दि. २.१०.७० आणि १९७६ ची निवडसूची त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही व अपिलार्थीने नेमकी हीच माहिती त्यांना मागितलेली आहे. अपिलार्थीस अव्वल कारकुन संवर्गात १७.७.१९९२ रोजीचा मानीव दिनांक मान्य करुन हवा आहे आणि त्यांच्या या मागणीपृष्टयर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून ही माहिती हवी असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सदर प्रस्ताव आजमितीस शासनस्तरावर निर्णयासाठी प्रलंबित आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपिल फेटाळतांना, जन माहिती अधिकारी यांचेकडून दोन वर्षाच्या कालावधीची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, म्हणून अपिलार्थीच्या मानीव तारखेच्या हक्कावर गदा येत आहे, असे मानता येणार नाही, या कारणास्तव अपिलार्थीचे अपिल फेटाळून लावले आहे. यावर असे मानता येईल की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चा आधार घेऊन जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती ही एका विविक्षीत कालावधीशी

संबंधित हवी होती. जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी कोणत्याही टप्प्यावर टाळाटाळ केल्याचे अथवा माहिती अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने दडवल्याचे आयोगास आढळून येत नाही, त्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. मात्र अपिलाथीने मागणी केलेल्या माहितीचा जन माहिती अधिकारी यांनी परत एकदा, अपिलार्थीसह, त्यांचे अभिलेख कक्षात शोध घेऊन अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत उर्वरित माहिती देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडनीय कार्यवाही करण्याचे अपेक्षिले होते, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेवर कोणतीही कार्यवाही केली नाही, असे म्हटले आहे, याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांना, जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची अथवा कोणतीही प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्याची अधिकारिता अधिनियमात नाही. त्यामुळे अपिलार्थीचा सदर मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचा शोध, आवश्यक असल्यास अपिलार्थीसह त्यांचे अभिलेख कक्षामध्ये परत एकदा घेऊन तीस दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमाकांत अच्युतराव चौधरी,सेवानिवृत्त मंडळ निरीक्षक (महसूल)रा. नानलपेठ, परभणी जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४०

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

१ श्री. धोंडीराम विश्वनाथ काडवदे, : अपीलार्थी
रा. जानवळ, ता.चाकुर, जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, जानवळ, ता.चाकूर
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, चाकूर,
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. धोंडीराम विश्वनाथ काडवदे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री. तुकाराम काशीनाथ नवले ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे

संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, जानवळ, ता.चाकूर, जि. लातूर ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ११.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.८.२००५ ते २००७ या कालावधीतील जानवळ येथील अतिक्रमण हटविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "१) अतिक्रमण हटवण्याच्या एकूण नोटीसा कोणा-कोणास दिल्या होत्या त्याच्या नावासहीत माहिती उपलब्ध करुन देणे २) वरील विषयानुसार नोटीसा दिलया प्रमाणे ग्रामपंचायतीने किती जनाचे अतिक्रमण हटवले व किती जनांना त्याच जागेवर ठेवले व त्यांना ठेवण्याचे आपल्याकडे शासनमान्य कागदपत्र उपलब्ध करुन त्याची माहिती द्यावी. ३) ग्रामपंचायतने दिलेल्या नोटीसानुसार सदरील रिकामी जागा ग्रामपंचायतच्या मालकीची आहे तर त्या जागेचे शासनमान्य कागदपत्र उपलब्ध करुन देणे व अशाच प्रकारची जागा जानवळ परिसरात कोठे व किती आहे याबाबत शासनमान्य कागदपत्रानुसार माहीती मिळावी. ४) दिलेल्या नोटीसाप्रमाणे अतिक्रमण हटवणे आहे तर सदरील दुकानांचा किंवा शेडचा कोणत्या प्रकारचा अडथळा निर्माण झाला. व कोणता धोका निर्माण झाला त्याची माहीती मिळावी. ५) वरील नोटीसा ग्रामपंचायतीने कोणत्या वरिष्ट अधिकाऱ्यांच्या परवाणगीने दिल्या त्या अधिकाऱ्याची संपूर्ण माहिती द्यावी. ६) अतिक्रमण हटवण्याबाबतच्या नोटीसा ग्रामपंचायतीने कोणत्या ठरावा आधारे दिल्या त्या ठरावाच्या सत्य प्रतीमध्ये माहिती द्यावी. ७) अतिक्रमण हटवण्याचे यंत्र शासकीय होते का खाजगी होते. त्या यंत्राला आपण दिलेल्या परवाण्याची प्रत व त्या यंत्राचा नंबर त्याची माहिती द्यावी. ८) या

मोहिमेसाठी वरिष्ठ अधिकारी कोणकोण उपस्थित होते त्यांची संपूर्ण माहिती द्यावी.९) अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबविली त्यामध्ये कांही शेड मोडले बाजूला केले व कांही शेड त्यांना कांही न करता जागेवर ठेवले ते कसे काय ठेवले ते कोणाच्या आदेशानुसार ठेवण्यात आले त्याची संपूर्ण माहीती द्यावी.."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०१.२००७ च्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रु.५२५/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले आहे.सदर पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणारी माहिती निश्चित किती पृष्ठांची आहे व माहिती देण्यास प्रतिपृष्ठ दर काय, हे कळविलेले नाही. तथापि त्यावेळी अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात न भरता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.०२.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी कसूर करीत असल्याचे नमुद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.३.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २३.४.२००७ रोजी पारित केले आहेत. त्यामध्ये त्यांनी असा निर्णय दिला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती दिली आहे व मुद्दा क्र. ३,५,६,७ ची माहिती दिली नाही.जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती अपिलार्थीस दिली ती दि. ७.२.२००७ रोजी देऊन, माहिती देण्यासाठी ३५ दिवसांचा विलंब लावलेला आहे आणि उर्वरित माहिती दि. २०.३.२००७ रोजी देऊन आणखी ३७ दिवसांच्या विलंबाने माहिती दिली आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीसाठी जादा फीची आकारणी केली असल्याचे त्यांनी या

निर्णयामध्ये नमुद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.७.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याची, त्यांना अपेक्षित माहिती विनामूल्य देण्याची, त्यांच्याकडून भरुन घेतलेले रु.५२५/- त्यांना परत देण्याचे आदेशित करण्याची व १००० रु. नुकसान भरपाईचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना एकूण ४७ पृष्ठांची माहिती मिळाली असून सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.५२५/- इतक्या रकमेचा भरणा केलेला आहे.जन माहिती अधिकारी यांनी आकारलेली ही फी अवास्तव आहे. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीतील ४७ पृष्ठांच्या माहितीपैकी २ पृष्ठांची माहिती त्यांना दि. ७.३.२००७ रोजी म्हणजे विहित मुदतीत प्राप्त झाली व उर्वरित ४५ पृष्ठांची माहिती त्यांना दि. २०.३.२००७ रोजी प्राप्त झाली. सदर शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अवास्तव शुल्क आकारलेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून मूलतः एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. ४, ७ व ९ चे संदर्भातील माहिती त्यांनी प्रश्नार्थक/अंशतः प्रश्नार्थक स्वरुपात विचारली

होती. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक नाही, मात्र उर्वरित माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.अपिलार्थीस त्यांनी मुद्देनिहाय माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी केवळ ४७ पृष्ठांकरिता रु.५२५/- इतकी फी आकारली आहे. माहितीच्या पृष्ठांची संख्या पाहता हे शुल्क अवाजवी आहे, यात शंका नाही. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी केला होता. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. १५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये रु.५२५/- शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांचे कार्यालयात दि. १२.२.२००७ रोजी केला आहे.त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.३.२००७ रोजी अगर तत्पूर्वी संपूर्ण माहिती अपिलार्थीस द्यावयास हवी होती, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.३.२००७ रोजी म्हणजेच एकूण १० दिवसांच्या विलंबाने एकूण ४५ पृष्ठांची माहिती तर २ पृष्ठांची माहिती विहित मुदतीत म्हणजे दि. ७.३.२००७ रोजी दिली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) नुसार विहित मुदत संपल्यानंतर विलंबाने माहिती द्यावयाची असल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अशी माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावयाची असते, तथापि अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊनही त्यांनी अपिलार्थीकडून रु.५२५/- इतके शुल्क आकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी अपिलार्थीकडून सदर माहितीसाठी विहित मुदतीत दिल्या गेलेल्या माहितीचे रु. ४ (२ पृष्ठे) वजा जाता रु. ५२१/- इतके जास्तीचे शुल्क कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेतले, जे अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीशी विसंगत आहे. त्यामुळे सदरचे जादा भरुन घेतलेले शुल्क जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस परत द्यावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांचेकडे माहितीपोटी

दि. १२.२.२००७ रोजी भरलेले अतिरिक्त शुल्क रु.५२१/- त्यांनी हे आदेश निर्गमित होताच २४ तासांच्या आत अपिलार्थीस परत करावे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये त्यांना या प्रकरणी १०००/- रु. इतक्या नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तथापि या शुल्काचा तपशिल व आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर न केल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगातर्फे नाकारण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी घेतलेले जास्तीचे शुल्क रु. ५२१/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच २४ तासांच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. धोंडीराम विश्वनाथ काडवदे,रा. जानवळ, ता.चाकुर जि.लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, जानवळ, ता.चाकूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चाकूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१२०३

निर्णय दिनांक : १३.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भगवान सिताराम मोहिते,<br>रा.जुना जालना. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा नायब तहसीलदार (म)<br>तहसील कार्यालय, जालना. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा तहसीलदार, जालना. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. भगवान सिताराम मोहिते (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), श्रीमती सरस्वतीबाई फकीरा जाधव (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, जालना श्रीमती संगिता नारायण वराडे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,

जालना श्री. गणेश केशव निऱ्हाळी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २३.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीमती सरस्वतीबाई फकीरा खरात यांना दिलेल्या सानुग्रह अनुदानासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

> "सरस्वतीबाई फकीरा खरात यांचा पंचनामामधील नंबर काय. पंचनामा झाला असेल तर मला खोटी माहिती का दिली. व पंचनामा झाला नसेल तर सदर महिलेस अतिवृष्टी सानुग्रह अनुदान कशा आधारे दिले करिता खरा खुलासा हवा."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.०५.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०६.२००७ रोजी सुनावणी घेतली व अपिलार्थीचा मूळ अर्ज प्रश्नोत्तर स्वरुपात असल्याचे कारणावरुन अपिल फेटाळले व आपले या संदर्भातील आदेश दि. २६.६.२००७ रोजी पारित केले. सदर आदेशामध्ये अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती 'माहिती' या संज्ञेत येत नसल्याने त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले. या आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरी करण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी स्वाक्षरी केली असल्याचे दिसून येत आहे. सदर आदेश दि. २६.६.२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ स्थळप्रतीवर अपिलार्थीने स्वाक्षरी केलेली

आहे. वास्तविकतः अपिलार्थीचे अपिल निर्णयावर जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः सही करुन आपले निर्णय पारित करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून आले नाही. सदर अपिल निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला सदर निर्णय अवैध ठरविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी तहसीलदार यांचेकडून बोगस लाभार्थ्यांची यादी व पंचनामा इत्यादी संदर्भात, त्यांना माहिती दिल्याचे नमुद केले असून या प्रकरणी संबंधित ४८ लाभार्थ्यांकडून अनुदान वसूल झाले नाही, असे आयोगाचे निदर्शनास आणून दिले आहे. अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जावरुन समजून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आपल्या द्वितीय अपिल अर्जाद्वारे सादर केलेले लेखी निवेदन, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांचे दि. २३.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात त्यांनी त्यांचे कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागातील लिपीक व संबंधित मंडळ अधिकारी (शहर) यांना दि. २४.१.२००७ रोजी पत्र देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे त्यांना सूचित केले होते, तथापि या संदर्भात संबंधित नैसर्गिक आपत्ती विभागातील लिपीक व मंडळ अधिकारी यांचेकडून अद्यापपावेतो कोणतेही स्पष्टीकरण त्यांना प्राप्त झालेले नाही, त्यामुळे त्या अपिलार्थीस माहिती देऊ शकल्या नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांनी अपिलार्थीस संबंधित प्रकरणात नायब तहसीलदार (निवडणूक) यांचेकडून

चौकशी सुरु असल्याचे अपिलार्थीस तोंडी सांगितले होते. श्रीमती सरस्वतीबाई फकिरा खरात यांचे पंचनाम्यामध्ये नाव नसूनही त्यांना सानुग्रह अनुदान मंजूर झाले आहे, ही बाब त्यांना मान्य आहे. या प्रकरणी सदर सानुग्रह अनुदानाच्या वसूलीबाबत मंडळ अधिकारी (शहर) यांना दि. १.९.२००७ रोजी आदेशित केलेले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर त्यांचेकडे ज्यावेळी सुनावणी झाली त्यावेळी अपिलार्थीस त्यांनी सदर प्रकरणात चौकशी सुरु असल्याचे अवगत केले होते. आता सदर चौकशी पूर्ण झाली असून नऊ व्यक्तींना चुकीने सानुग्रह अनुदान मंजूर झाल्याचे लक्षात आले आहे. सदर लाभार्थींकडून त्यांना दिलेल्या या अनुदानाची रकमेची वसूली करण्याची कार्यवाही चालू आहे

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, सरस्वतीबाई फकिरा खरात या लाभार्थीस कोणत्याही पंचनाम्याशिवाय, तहसीलदार, जालना यांचेकडून सानुग्रह अनुदान दिले गेले आहे. अपिलार्थीने सदर सानुग्रह अनुदान कशाच्या आधारे दिले, याची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली होती. सदर लाभार्थीचा पंचनामाच झाला नसल्यामुळे, सदर माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असणे शक्य असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जरी जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे कळविले असते तरी अपिलार्थीचे काम भागू शकले असते. अपिलार्थीस देण्यासाठी माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी प्रामुख्याने नैसर्गिक आपत्ती विभागातील लिपीक व मंडळ अधिकारी (शहर) यांचेवर होती, तथापि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना, दोन्हीही कर्मचाऱ्यांनी कोणतेही सहाय्य केलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे संबंधित कर्मचारी व अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. सदर तरतुद पाहता, या प्रकरणी

अपिलार्थीस त्यांचे वरील अर्जावर माहिती न देण्यासाठी संबंधित नैसर्गिक आपत्ती विभागातील लिपीक व मंडळ अधिकारी (शहर) हे प्रामुख्याने जबाबदार असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत. सबब जिल्हाधिकारी, जालना यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी नैसर्गिक आपत्ती विभागातील संबंधित लिपीक व मंडळ अधिकारी (शहर) यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती यामध्ये फरक आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी या प्रकरणी झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी करुन हवी असल्याचे नमुद केल्याचे दिसून येते. या प्रकरणी आता तहसीलदार, जालना यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे आवश्यक तो अहवालही सादर केला आहे. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणात योग्य तो निर्णय, हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत घ्यावा व अपिलार्थीस या निर्णयाची माहिती द्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

५. जिल्हाधिकारी, जालना यांनी जालना तहसील कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागातील लिपीक व मंडळ अधिकारी (शहर) यांचेवर या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १३.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भगवान सिताराम मोहिते,रमाबाई नगर, जिल्हा परिषद क्वार्टर्सच्या मागे जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म) तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११३५

निर्णय दिनांक १४-०५-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मो. अखिल मो. बु-हानोद्दीन,<br>शहानूरवाडी, शाहनवाज शहीद मस्जीद<br>जवळ, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अध्यक्ष, अलफरान एज्युकेशन<br>ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, आसेफिया<br>कॉलनी, घाटी, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मो. अखिल मो. बु-हानोद्दीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अलफरान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी श्री. शफियोद्दीन अमीरोद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय

अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. जयंत गोपाळराव डोरले (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अलफरान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या संदर्भात संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून ते १५-०१-२००७ पर्यंतच्या कालावधीतील खालील प्रमाणे एकूण २० मुद्दयावर माहिती मागितली होती.

" १. संस्थेचे नांव अलफरान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, घाटी औरंगाबाद (आसेफिया कॉलनी), २. संस्था रजिस्टर आहे काय ? ३. कोणत्या नियमाखाली, ४. सभासदांची (फाऊंडर) मेबर्सची यादी, ५. संस्थेची घटना, ६. मेमोरंडम ऑफ असोसिएशन, ७. संस्था रजिस्टर झाल्यापासूनचे कामाची स्वरुप, विविध कार्यक्रम, अन्य गतीविद्या, ८. लेखा परीक्षण सुरुवातीपासूनचे (१) ताळेबंद, इनकम एक्सपेंडीचर, बॅलेन्स शिट व ऑडीट रिपोर्ट, ९. प्रत्येक वर्षाचे ऑडीट केलेले तक्ते आपल्या कार्यालयास सादर केलेले आहे काय ? १०. संस्थेतील विश्वस्थांची किती संख्या आहे, ११. संस्थेतील कोरम पूर्ण आहे काय ? १२. जर नसल्यास रिक्त जागा भरली आहे काय ? १३. संस्थेच्या घटनेनुसार त्रैमासिक व वार्षिक कार्यकारीणीची व सर्वसाधारण सभासदाचे आयोजन केले जातात काय ? १४. संस्थेची स्थावर मालमत्ता आहे काय ? १५. शाळेची इमारत संस्थेची आहे काय ? १६. भाडे किती मिळते व कोठे जमा होते ? १७. संस्थेच्या किर्द, खाते व पावत्या सुरुवातीपासूनच्या सत्यप्रती

द्यावेत. १८. संस्थेच्या बैठकीचे नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते काय ? १९. सभासदांना वेळेपूर्वी नोटीस दिली जाते काय ? २०. संस्थेचे मिनिट बुक तयार आहे काय ? नियमाप्रमाणे कार्यवाही होते काय ? ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीने केलेला मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या अर्ज संबंधीत शिक्षण संस्थेचे चेअरमन यांच्याकडे केला होता. शिक्षण खात्याचे परिपत्रकानुसार संबंधीत शाळा / महाविद्यालयाचे प्राचार्य हे जन माहिती अधिकारी आहेत व संस्थेचे सचिव / अध्यक्ष हे जन अपिलीय अधिकारी असतात. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज न करता प्रथम अर्जच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जानुसार संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, हेतुपुरस्सर व जाणीवपूर्वक माहिती न देता दडवून ठेवणे, देण्यास टाळाटाळ करणे असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांचेवर नियमानुसार दंड व शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांच्या कडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष, अलफरान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी यांना अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी मुळात अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडून झालेली नाही. अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळी संबधीत संस्थेचे अध्यक्ष हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेलेले होते. अपिलार्थीने सहाय्यक धर्मादाय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी या अपिल अर्जावर सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीचा अर्ज संबंधीत संस्थेच्या

अध्यक्षाकडे पाठविला. आता शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना या प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने या प्रकरणी प्रथमतः शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी सुनावणी घेणे गरजेचे राहील असे आयोगास वाटते.

अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांचे प्रथम अपील आता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्याकडे करावे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रथम अपील करण्यासाठी झालेला विलंब क्षमापीत करावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर त्यांनी एका महिन्याच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय द्यावा. जन अपिलीय अधिकारी यांना हा निर्णय मान्य न झाल्यास अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार व्दितीय अपील करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे या प्रकरणी प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा व अपिलार्थीस त्यांच्याकडे अपील दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करावा.

औरंगाबाद
दिनांक १४-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मो. अखिल मो. बु-हानोद्दीन, शहानूरवाडी, शाहनवाज शहीद मस्जीद जवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, अलफरान एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४५

निर्णय दिनांक १४-०५-२००८

श्री. संजय शंकरराव वाघमारे, : अपिलार्थी
बावनवाडी, पो. उमरदरी, तालुका
मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा
परिषद बांधकाम उपविभाग मुखेड,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा
परिषद, बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय शंकरराव वाघमारे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग मुखेड श्री. बाबु गोविंदराव पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग श्री. प्रेमदास मारोतराव लाहोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८७ ते २००६ या कालावधीतील कामाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. मुखेड-शिकारा रोडचे काम केव्हा झाले.

२. त्याची लांबी व आपल्या ताब्यातील जागेची रुंदी किती

३. सदर रोड लगत बावनवाडी पाणीपुरवठा योजनेची विहिर आहे ती आपल्या जागेत येते काय ?

४. येत असल्यास सदर जमीन आपल्या ताब्यात घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रती (दानपत्राआधारे वा विकत).

५. सदर जागा अधिगृहीत कतांना त्याचा मावेजा संबंधीत जमीनमालकास दिल्या गेल्याचा तपशील.

६. रोडला लागूनच विहिर असणे नियमान्वये योग्य आहे काय कृपया सविस्तर माहितीपत्रक द्यावे. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

“ वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, मुखेड शिकारा रोडच आस्तित्वात नाही - शिवाय संदर्भीय पत्रकाचे वाचन केले असता आपणास नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा काहीही बोध होत नाही. करीता आपण स्वतः या कार्यालयातील क. अ. श्री. एस. स. कावळे यांच्याशी चर्चा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावे. ”

सदर पत्रास अपिलार्थीने कोणताही प्रतिसाद न दिल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीचे खालील प्रमाणे पत्र लिहिले.

“ वरिल विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मुखेड शिकारा रस्त्याची रुंदी ६० फूट आहे. रोडच्या बाजूला पाणीपुरवठा योजनेची विहिरीचा काही भाग रस्त्याच्या हद्दीमध्ये येतो. सदर जागेमध्ये विहिर खोदण्यासाठी या कार्यालयाची परवानगी घेतलेली नाही किंवा मागितलेली नाही त्यामुळे सदर जमिनीचे कोणतेही कागदपत्र या कार्यालयामध्ये उपलब्ध नाहीत. या कार्यालयाकडून जमीन अधिगृहीत केल्याबाबत कुठलाही मावेजा दिलेला नाही. रोडला लागून असलेली विहीर नियमान्वये अयोग्य आहे. करिता माहितीस्तव देण्यात येते.”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१२-२००६ रोजी प्रथम

अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी, दिशाभूल करणारी माहिती दिली त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक करवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संयुक्तीक माहिती देण्याची व्यवस्था करण्याचे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याची अशा प्रकारची सूचना देऊन त्याचवेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७, ०२-०४-२००७, १५-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या तीनही वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची सुनावणी घेतली नाही. अंतीमतः अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ३१-०५-२००७ रोजी निर्णय घेऊन, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर अपील निकाली काढतांना अपिलार्थीच्या सततच्या गैरहजेरीचे कारण जन अपिलीय अधिकारी यांनी महत्वाचे मानून सदर निर्णय दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी त्यांना अपूर्ण, खोटी  दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची संधी देण्याचे जाणीवपूर्वक टाळल्याचे म्हटले आहे व जन माहिती अधिकारी याच्याकडून त्यांना खरी माहिती देण्याचे आदेशीत करण्यात यावे आणि जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास शेवटी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ व ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये   अपिलार्थीस माहिती दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस २४ दिवस इतक्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली आहे.  अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक २०-०३-२००७, ०२-०४-२००७, १५-०५-२००७ रोजी सुनावण्या

ठेवल्या होत्या. तथापि अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ३१-०५-२००७ रोजी अंतीम निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सुनावणीच्या पत्राची तामीली करण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील प्रतिनिधीस त्यांनी पाठविले होते तथापि सदर पत्र स्विकृत करण्यास अपिलार्थीच्या घरातल्या व्यक्तींनी देखील नकार दिला. अपिलार्थीच्या सततच्या गैरहजेरीमुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी फारसे स्वारस्य आहे असे न वाटल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी दिनांक ०४-१०-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असला तरी त्यामध्ये अपिलार्थीस त्यांनी कोणतीही माहिती दिली नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंत्याशी चर्चा करुन माहीती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अशा प्रकारच्या निरर्थक मजकूरामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४-१०-२००६ रोजीचे अपिलार्थीस पाठविलेले पत्र या ठिकाणी तथ्यहीन ठरत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचे अवलोकन करता मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ६ शी संबंधीत माहिती ही माहितीचा अधिकार या अधिनियमातील तरतुदीतील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या अधिनियमामध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ व ६ ची माहिती देणे अभिप्रेत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-११-२००६ रोजी काही माहिती व दिनांक ०५-०१-२००७ रोजी पूर्ण माहिती दिल्याचे दिसून येत आहे. सदर माहितीचे

अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे आढळून येत आहे.

आता अपिलार्थी यांचा दावा आहे की, ही माहिती खोटी अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-११-२००६ व ०५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती खोटी अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे हे सिध्द करण्यास व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचे पत्र उशिरा पाठविले हा त्यांचा मुद्दा सिध्द करण्यास अपिलार्थी येथे उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दिनांक ०५-०१-२००७ रोजी अन्वये दिलेली दिसून येत आहे. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-११-२००६ रोजी दिली असे जरी गृहीत धरले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी २३ दिवस इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई सिध्द केली आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक व इतर कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. त्यांच्या या कृतीव्दारे जन

माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांनी या प्रकरणी स्वततःस, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण (२३ दिवसासाठी) रुपये ५७५० /- (अक्षरी- रुपये पाच हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जून २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा.  उपरोक्त प्रमाणे विवेचन केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांनी पूर्ण माहिती दिली असल्याने माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची संधी देण्यास जाणुन-बुजून टाळल्याचे म्हटले आहे. तथापि मुळात सुनावणीचे पत्र देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी अपिलार्थीचे निवासस्थानी पाठविले असता सदर पत्र घेण्यास अपिलार्थी व त्यांच्या प्रतिनिधीने नाकारले असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी आयोगाकडे काही कागदपत्रे सादर केली आहेत यावरुन त्यांनी आपल्या प्रतिनिधीस अपिलार्थी यांच्याकडे सदर पत्र घेऊन पाठविल्याचे दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या दाव्याचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीने आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांच्या विरुध्द उपस्थित केलेले मुद्दे आयोग फेटाळून लावीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विलंबाने पुरविल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये ५७५० /- (अक्षरी- रुपये पाच हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

३.	कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), नांदेड यांनी वरील आदेश क्रमांक २ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक	१४-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. संजय शंकरराव वाघमारे, बावनवाडी, पो. उमरदरी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२	जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४८

निर्णय दिनांक १४-०५-२००८

श्री. रंजीत लक्ष्मणराव मकरंद, : अपिलार्थी
गौतमनगर,
परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अनुरेखक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, परभणी

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रंजीत लक्ष्मणराव मकरंद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अनुरेखक

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी श्री. हिरालाल दशरथ बंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परभणी श्री. शंकर आप्पाराव चंद्रवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००५ ते ३१ जानेवारी २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. तालुका कृषि अधिकारी कार्यालय परभणी या कार्यालयामार्फत परभणी तालुक्यातील कोणकोणत्या गावांमध्ये अर्दन, स्ट्रॅक्चर, ढाळीचे बांध मातीनाला बांध, सिमेंट नाला बांध, लूज बोल्डर सलग समतलचर, इत्यादी कामे कोणत्या ठिकाणी पूर्ण करण्यात आली. त्याबाबत गावनिहाय माहिती देणे.

२. रो. ह. यो. अंर्तगत कृषि कार्यालयाकडून कोणत्या गावात कामे करण्यात आली त्या कामाचे स्वरुप दर्शवून सदर कामांवर किती मजूर कार्यरत होते व त्या मजुरांचा नांव, व पत्ता तसेच किती दिवस काम केले याबाबत माहिती देऊन मजुरांच्या हजेरपटांच्या छायांकीत प्रती देणे.

३. तालुक्यात करण्यात आलेल्या संपूर्ण कामांची गाव व कामनिहाय माहिती देऊन सदर कामावर कार्यालयातील मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेशक, कृषि

सहाय्यक या श्रेणीच्या अधिका-यांनी त्यांच्या देखरेखी खाली कोणत्या कामावर मोजमापे घेतली त्या कर्मचा-यांच्या नावासह माहिती देणे व गावाचा उल्लेख करणे.

४. तालुक्यात कोणकोणत्या शेतक-यांना फळबागा लागवडीकरिता अनुदान देण्यात आले. त्या शेतक-यांच्या शेत सर्वे नंबर गट नंबर, होल्डींग, ७/१२ इत्यादीच्या छायांकीत प्रती देऊन रोपांच्या परमिटच्या छायांकीत प्रती देणे.

५. कार्यालयात फळबाग लागवडीकरिता किती शेतक-यांचे अर्ज प्राप्त झाले. त्याची एकूण संख्या किती ? तसेच त्याचे नांव, गाव, व पत्त्यासह माहिती देऊन ज्यांना फळबाग लागवडीकरिता कार्यालयीन मंजुरी दिली त्यांच्या दिनांकासह खर्चीकेच्या छायांकीत प्रती देणे.

६. रो. ह. यो. अंर्तगत ज्या मजुरांना धान्य वाटप करण्यात आले त्या संपूर्ण कुपन्सधारके मजुरांची नांवे देऊन त्यांचा संपूर्ण पत्ता व गावनिहाय इत्यादी माहिती देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने ह्या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून या अर्जासोबत त्यांनी त्यांच्या रेशनकार्डाची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना झेरॉक्स कॉपीच्या स्वरुपात देण्यासाठी बरीच रक्कम खर्च होणार असल्याने व सदर रक्कमेची तरतूद त्यांच्या कार्यालयात नसल्याने सदर रक्कम वरिष्ठ कार्यालयाकडून त्यांना उपलब्ध झाल्यावर अपिलार्थीस त्यांच्या विनंतीप्रमाणे माहिती पुरविता येईल असे आश्वासीत करण्यात आले. या पत्राची प्रत जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी यांना पाठविण्यात आली असून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना रुपये १६०००/- ते रुपये २००००/- इतक्या अनुदानाची त्यांच्याकडे मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने सदर अपील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी परभणी यांच्याकडे केले होते. सदर अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती न देण्यासंदर्भातील खुलासा मागितला आहे. व अपिलार्थीने मागितलेली माहिती तात्काळ त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याचे तालुका कृषि अधिका-यास सूचित केले आहे. मात्र या अपिलासंदर्भात स्वतः कोणताही निर्णय

दिला नाही व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांनाही या अपिलावर निर्णय देण्याचे सूचित केले नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा निधी नाही एवढीच बाब कळविली आहे त्याचवेळी जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली असती किंवा तसे करण्याची तयारी त्यांनी एखाद्या पत्राव्दारे दर्शविली असती तर त्यांची याबाबत काहीही हरकत नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेत माहिती न पूरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी असे त्यांनी आपल्या युक्तिवादात स्पष्ट केले आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास ते

सदर माहितीची तपासणी करुन त्यांना आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयातील नस्तीमधून प्राप्त करुन घेऊ शकतील.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून सदर माहितीच्या पृष्ठांची संख्या २१४८३ इतकी आहे. सदर माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता लागणारे आवश्यक ते अनुदान आजही उपलब्ध नाही त्यामुळे ते सदर माहिती, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अनुदानाअभावी अपीलार्थीस पूरवू शकणार नाहीत. अपिलार्थीने विशिष्ट तारीख त्यांना आगाऊ कळविल्यास सदर माहिती ते पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत. सदर प्रकरण घडत असतांना ते जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नव्हते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील न पाठविल्यामुळे ते अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊ शकले नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी येणा-या खर्चाच्या रक्कमेची त्यांच्याकडे आजमितीस तजवीज नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठ्या प्रमाणात असून

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जवळ जवळ सर्व कागदपत्राची मागणी केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या २१४८३ इतकी आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करतांना ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे गट विकास अधिकारी यांचे किंवा संबंधीत नगरपालिकेचे कोणतेही प्रमाणपत्र सादर केले नव्हते ही बाब हे अपील ठरवितांना प्रामुख्याने लक्षात घेतली आहे. आजमितीस अपिलार्थीचे ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत हा मुद्दा वादाच्या प्रयोजनार्थ खरा धरला तरी, अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरु शकत नाही तर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणा-या खर्चाइतका निधी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे फक्त झेरॉक्सचे काम निधीअभावी बाकी आहे ही परिस्थिती पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात एखाद्या विशिष्ट दिवशी जाऊन या कागदपत्रांची पाहणी करुन त्यामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती स्वतः काढून घेणे उचित ठरेल असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पाहण्यासाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

आज रोजी झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याचा आग्रह धरला आहे. याबाबत आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, अपिलार्थीने विस्तृत प्रमाणात माहिती मागविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुदान उपलब्ध नाही व त्याची कल्पना त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी किमान माहिती तपासणीसाठी त्यांना उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शवावयास हवी होती, या म्हणण्यात थोडासा तथ्यांश दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अशा प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद दिला असता तर कदाचीत अपिलार्थीला आयोगाकडे व जन अपिलीय अधिकारी याच्याकडे अपील करावे लागले नसते. त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या ०७-०३-२००७ च्या पत्रामध्ये अपिलार्थीस दुस-या कोणत्या प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल याचा विचार केला असल्याचे

आयोगास आढळून येत नाही. तसेच या पत्रातील सकारात्मक प्रतिसादाच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, येथून पुढे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कारवाई करावी व सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा असे सूचित करण्यात येत आहे. या संपूर्ण घटनेमध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी परभणी यांच्या भुमिकेची पाहणी केली असता त्यांनी त्यांचेकडे प्राप्त अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई याचे भरपूर दर्शन घडविले आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविण्याचे साधे सौजन्य दाखविले नाही. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे येथे स्पष्ट होत आहे. सचिव (कृषि) यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती त्यांना तपासणीसाठी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक १४-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रंजीत लक्ष्मणराव मकरंद, गौतमनगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा अनुरेखक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (कृषि विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५९

निर्णय दिनांक १४-०५-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे,<br>व्दारा- घाटे निवास, नारायण कॉलनी,<br>काकडे प्लॉट, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्था. स्तर), उपविभाग,<br>उस्मानाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे<br>(स्था. स्तर), विभाग, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर), उपविभाग श्री. सय्यद फखरुल्ला हाशमी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी

अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर), विभाग श्री. ज्ञानेश्वर नामदेव पदमाळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१ जानेवारी २००४ ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीतील मौ. चिंचपूर ढगे तालुका भूम येथील पाझर तलावाच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. कार्यरंभ आदेशाची प्रत.

२. अंदाजपत्रकात अकुशल कामास मंजूर झालेली रक्कम.

३. कुशल कामास मंजूर झालेली रक्कम.

४. आतापर्यंत कामावर झालेला एकूण खर्च.

५. उर्वरीत कामाची रक्कम.

६. कामावरील नोंदणीकृत मजूरांची यादी.

७. आतापर्यंत कामावर काम केलेल्या मजुरांचे हजेरीपट. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांना रुपये २५००० इतका दंड लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजी सुनावणी घेतली. अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा विशेष असा निर्णय घेतल्याचे त्यांच्या सुनावणीसंदर्भातील दिनांक २४-०४-२००७ रोजीच्या आदेशामध्ये आढळत नाही. मात्र या आदेशावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००७ रोजी माहिती देण्याचे कबूल केले होते व दिनांक २७-०४-२००७ रोजी माहिती न दिल्यास कलम २० नुसार कारवाई होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणल्याचे या आदेशाव्दारे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व

जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण ७ मुद्यापैकी मुद्दा क्रमांक ६ शी संबधीत माहिती वगळता उर्वरीत माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर लागलीच त्यांनी सदर माहिती ज्या कनिष्ठ अभियंत्याकडे उपलब्ध होती त्या कनिष्ठ अभियंत्यास ही माहिती त्यांच्याकडे सादर करण्याची सूचना दिली होती. सदर सूचना निश्चितपणे कोणत्या तारखेस दिली हे जन माहिती अधिकारी संबंधीत कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास सांगू शकले नाहीत. संबंधीत कनिष्ठ अभियंता हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले व आज देखील आयोगाकडील सुनावणीस ते पुरेशी कल्पना देऊनही गैरहजर राहिले आहेत, त्यामुळे त्यांना आयोगासमोर माहिती देणे शक्य झाले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या दाखल केलेल्या अपील अर्जावर, त्यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक २४-०४-२००७ रोजी पारीत केले. अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००७ पर्यत माहिती देण्याचे आदेशीत केले होते. तथापि त्यांनी आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल त्यांनी जन माहिती अधिकारी यांना एकदा दिनांक ०४-०६-२००७ रोजी स्मरणपत्र दिले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील प्रथम अर्जाव्दारे एकूण ७ मुद्दयावर माहिती मागितली होती. माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. किंबहुना जलसंपदा विभागाकडे कोणतेही कामे चालू असतांना अशा प्रकारची माहिती निश्चितपणे उपलब्ध असते. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही विशेष परिश्रम घ्यावे लागले असते अशातली कोणतीही बाब येथे संभवत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे शक्य नाही कारण रोजगार हमी योजना कायद्यान्वये कामावरील मजुराची नोंदणी ही संबंधीत

तहसीलदार यांच्याकडे होत असते. अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या सदर अर्जाची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) (i) च्या तरतुदीप्रमाणे संबंधीत तहसीलदार यांच्याकडे पाठवावयास हवी होती व त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणती कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. वास्तविक पाहता अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना न देणे, माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणे यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव व माहिती अधिकार अधिनियमाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर हेच कारण त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यामागे असावे अशी आयोगाची खात्री होते. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणातील त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील बेशिस्त, बेपर्वाई व कार्यप्रवृत्तीचा अभावा स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या हाताखालील कनिष्ठ अभियंत्याकडे उपलब्ध होती. कनिष्ठ अभियंता यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करुनही त्यांनी ही माहिती जन माहिती अधिका-यास उपलब्ध करुन दिली नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांची प्रशासकीय क्षमता देखील किती मर्यादित होती व ते सध्या जे पद धारण करत आहे त्या पदाचे कर्तव्य देखील कशा प्रकारे पार पाडत आहेत हे देखील स्पष्ट होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास सहाय्य करण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी अधिनियमात तरतूद आहे हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक हे

अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास तितकेच जबाबदार ठरत आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल ते निश्चितपणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यास जबाबदार असलेले संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उस्मानाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जुलै २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या

मुद्दा क्रमांक ६ ची माहिती देण्या-संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ ची माहिती जरी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसला तरी त्यांनी या माहितीशी संबंधीत माहिती तहसीलदार भूम यांच्या कडून तात्काळ प्राप्त करुन घ्यावी. या प्रकरणी तहसीलदार भूम यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणासंबधात उपविभागीय अभियंता (स्थानिक स्तर) उपविभाग उस्मानाबाद यांना पूर्ण सहकार्य करुन अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ६ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. उपविभागीय अभियंत्यास तहसीलदार भूम यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ६ शी संबधीत माहिती देण्यास जर विलंब लावला तर सदर विलंबास तहसीलदार भूम हे जबाबदार राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तहसीलदार भूम यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

४. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

५. संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात जुलै २००८ पासून नियमीत भरतील असे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उस्मानाबाद यांनी पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १४-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयोग,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुकूंद विठ्ठलराव व्यवहारे, व्दारा- घाटे निवास, नारायण कॉलनी, काकडे प्लॉट, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर), उपविभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर), विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ तहसीलदार भूम जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८८९

निर्णय दिनांक : १५.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. महंमद वसीम महंमद एकबाल सौदागर<br>रा.नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>मदिनातुल उलुम ऊर्दू हायस्कूल,नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. महंमद वसीम महंमद एकबाल सौदागर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका मदिनातुल उलुम हायस्कुल, नांदेड सौ. मुहमदीबेगम सिद्यीकी, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांचे प्रतिनिधी कार्यालयीन अधीक्षक श्री. रोकडोबा बाबूराव शिंदे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व त्रयस्थ पक्ष श्री. हुसेन महंमद हुसेन रा. नांदेड (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये २००१ ते २००६ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या शाळेतील शिक्षक श्री. मझरहुसेन यांचेशीसंबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"आपल्या हायस्कुल येथे कार्यरत असलेले शिक्षक श्री.मझरहुसेन यांनी युगांडा या देशात जाऊन शासकिय कर्मचारी असतांना परदेशात जाण्यासाठी त्यांनी सदरील शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची मंजुरी घेतली होती काय तसेच त्यांना किती दिवसाची रजा मंजुर करण्यात आली होती. त्यांच्या रजेची मंजूरी जि.प. शिक्षण विभागाकडून त्या दिर्घ कालीन रजेची मान्यता घेण्यात आली होती काय ? तसेच ते पुन्हा शिक्षक म्हणुन वर्ष २००६ मध्ये आपल्या संस्थेत रुजु झाले त्यांना रुजु करण्यासाठी शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची मान्यतेची सत्यप्रत तसेच या प्रकरणी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने त्यांना पुन्हा सेवेत रुजु करण्यासाठी मान्यता दिली काय,याच्या लेखी मान्यतेची सत्यप्रत मिळणेबाबत."

सदर माहिती अपिलार्थीने साधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.०१.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.२.२००७ व दि. २३.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती, तथापि प्रथम सुनावणीचे वेळी जन अपिलीय अधिकारी हे जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीसाठी उपस्थित राहिल्यामुळे तर दुसऱ्या सुनावणीचे वेळी ते त्यांचेवर दाखल झालेल्या गुन्हयासंदर्भात

कार्यालयात अनुपस्थित असल्यामुळे, या प्रकरणाची सुनावणी होऊ शकली नाही. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी परत कधीही सुनावणी घेण्याचे सौजन्य दाखविले नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.३.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी जाणूनबुजून टाळाटाळ केल्याचे नमुद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली होती, या संदर्भात संबंधित शिक्षक हे मदिनातुल उलुम ऊर्दू हायस्कुल, नांदेड येथे कार्यरत असतांना दीर्घ रजेवर गेले व त्या काळात त्यांनी परदेशात नोकरी केली. त्यांनी रजेच्या दोन वर्षाचे काळात नोकरी केल्यानंतरही ते स्वदेशी परत आल्यानंतर त्यांना संबंधित शिक्षण संस्थेने परत रुजू करुन घेतले. त्यांच्या या प्रदीर्घ गैरहजेरीमध्ये इतर लायक उमेदवारांना त्यांच्या पदावर सेवेची संधी प्राप्त होऊ शकली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे, ती त्यांना अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्या या पदावर दि. १.२.२००८ पासून कार्यरत आहेत व यापूर्वीचे मुख्याध्यापक नियत वयोमानानुसार दि. ३१.१.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांचेकडे तयार असून, सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. १२.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपिल अर्जावर दि. १२.२.२००७ व दि. २३.२.२००७ रोजीचा सुनावणी आयोजित केली

होती. तथापि तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित नसल्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांचे संबंधाने विचारलेली माहिती देण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ५.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपोटीचा बराचसा भाग प्रश्नार्थक स्वरुपाचा व जन माहिती अधिकारी यांचेकडून उत्तर अपेक्षित करणारा असा आहे. म्हणून तो भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मात्र या मागितलेल्या माहितीतील उर्वरित भागामध्ये त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या रजा मंजूर करण्यासाठी शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या मान्यतेच्या सत्यप्रती, तसेच या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने संबंधित शिक्षकास पुन्हा रुजू करण्यासाठी दिलेल्या मान्यतेच्या सत्यप्रती, एवढाच भाग 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादावरुन त्या या पदावर दि. १.२.२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने अर्ज करते वेळी या पदावर दुसरे मुख्याध्यापक कार्यरत होते व ते नियत वयोमानानुसार दि. ३१.१.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती तयार असून, त्यांचेकडील दि. १२.५.२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी ती माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या मुद्यांशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. सदर माहितीतील ऊर्दू भाषेतील माहिती अपिलार्थीस दाखविली असता, सदर माहिती त्यांना हवी असलेली माहितीच असल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले. या प्रकरणी असे दिसून येते की,

अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत, तथापि सुनावणीचे वेळी ते सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांचेवर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आता माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत, तथापि सध्याच्या जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहित मुदतीमध्ये कार्यवाही करण्याबाबत त्यांनी सतर्क राहावे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल रा.समिरबाग,खडकपूराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,मदिनातुल उलूम ऊर्दू हायस्कूल,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११२

निर्णय दिनांक : १५.०५.२००८

१ श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री, : अपीलार्थी
द्वारा प्रिंट-एन-कोट
बी-१०, एम.आय.डी.सी.
चिकलठाणा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभागीय प्रभारी,
महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ,
औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमहाव्यवस्थापक व मुख्य प्रशासकीय अधिकारी,
मुख्य कार्यालय, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ
मुंबई-४०० ००१.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा विभागीय प्रभारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ,औरंगाबाद श्री. मनोहर विष्णू वालझाडे ( त्यांना यापुढे

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपमहाव्यवस्थापक व मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई श्री. मुगुटराव व्यंकटराव पवार ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०९.०१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील १९८९ ते २००१ या कालावधीतील त्यांचे व्यवसायाशी संबंधित अभिलेख व नस्त्या पहाणी करणेची खालीलप्रमाणे मागणी केली होती.

"To examine file details regarding all correspondence & documents of Mantri Dye Chem.

Details regarding action u/s 29 & details regarding compromise proposal correspondence & related documents."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही, त्यावेळी औरंगाबाद कार्यालयात जन माहिती अधिकारी म्हणून कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत न केल्याने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या औरंगाबाद येथील कार्यालयाने अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांचे मुख्य कार्यालयास पाठवून दिल्यावर त्या अर्जाबाबत मुख्य कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही.

अपिलार्थीस मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ,मुंबई यांचेकडे दि. १.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना १७५ दिवस इतक्या उशिराने माहिती प्राप्त झाल्याने ते शास्तीस पात्र आहेत, त्यामुळे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांचेवर शास्ती लावावी व जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल या अपिल अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय न दिल्याने त्यांचेवरही शास्ती लावण्यात यावी. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सर्व नस्त्या त्यांना, जन माहिती अधिकारी यांचेमार्फत पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व त्यांची त्यांनी पहाणी देखिल केलेली आहे. त्यांना आवश्यक असलेल्या नस्त्यांची पहाणी त्यांनी केल्याबाबत, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. १०.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या सर्व नस्त्या त्यांना पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. अपिलार्थीने ज्या वेळी सदर नस्त्यांच्या पहाणीसाठी दि. ९.१.२००७ रोजी अर्ज केला, त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती झाली नव्हती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थी यांचा अर्ज त्यांचे मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडे पाठवून दिला होता. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर मुंबई येथील मुख्य कार्यालयाने अपिलार्थीस औरंगाबाद कार्यालयाशी संपर्क साधण्याचे त्यांचेकडील दि. १७.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले. तथापि या पत्राचे अनुषंगाने अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे त्यांचेकडील दि. २.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस परत सदर नस्त्यांची तपासणी करण्यासाठी त्यांचे कार्यालयात बोलावले.

या पत्रातील सूचनांनुसार अपिलार्थी हे दि. १०.८.२००७ रोजी त्यांचे कार्यालयात हजर झाले व त्यांनी आवश्यक असलेल्या नस्त्यांची पहाणी केली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिल अर्ज करते वेळी ते जन अपिलीय अधिकारी या पदावर नियुक्त केले गेले नव्हते. त्यावेळी या पदावर श्री. व्ही.पी.बोडके हे कार्यरत होते व ते कौटुंबिक कारणास्तव दीर्घकालीन रजेवर गेल्यामुळे अपिलावर सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या, मूळ अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील आवश्यक त्या नस्त्या पहाणीसाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील नस्त्या व अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत, तरी त्यांनी माहितीसाठी केलेल्या अर्जाची व त्यांनी प्रत्यक्षात नस्त्या व अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन दिल्याची तारीख यामध्ये १७५ दिवसांचा कालावधी व्यपगत झाला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तीवादावरुन महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळामध्ये अपिलार्थीने अर्ज करण्याचे वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी म्हणून कोणत्याही अधिकाऱ्यास नियुक्त केले नव्हते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा शासनाच्या दि.११ ऑक्टोबर २००५ च्या परिपत्रकान्वये अंमलात आणला गेला आहे. अपिलार्थीने अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी या पदावर कोणाचीही नियुक्ती झाली नसल्याने, अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यास खुद्द महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ हेच जबाबदार ठरते, असे आयोगाचे मत आहे. सबब या प्रकरणी अपिलार्थीस पहाणीसाठी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब लागण्याची कारणे व्यवस्थापकीय संचालक यांनी शोधून संबंधितांवर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे

आत, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करुन त्यानंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई यांनी हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्यांचे आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**प्रतः**

१ श्री. रामप्रकाश राजाराम मंत्री,द्वारा प्रिंट-एन-कोट,बी-१०, एम.आय.डी.सी.चिकलठाणा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय प्रभारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमहाव्यवस्थापक व मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ मुख्य कार्यालय, युनायटेड इंडिया बिल्डींग, पहिला मजला, सर पी.एम.रोड (आर.बी.आय.जवळ) मुंबई-४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुख्य कार्यालय, युनायटेड इंडिया बिल्डींग, पहिला मजला, सर पी.एम.रोड (आर.बी.आय.जवळ) मुंबई-४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४७

निर्णय दिनांक : १५.०५.२००८

१ श्री. कल्याणराव दगाजीराव पाटील, : अपीलार्थी
शिवाजीनगर, कन्नड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता (सिंचन)
जिल्हा परिषद, उपविभाग,कन्नड
जिल्हा औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. कल्याणराव दगाजीराव पाटील (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (सिंचन), जिल्हा परिषद, उपविभाग, कन्नड जि.औरंगाबाद श्री. राजेंद्र पुरुषोत्तम फुलंब्रीकर, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी उपमुख्य

कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री.संतोष विठ्ठलराव कवडे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०१.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये दि. १.१.२००५ ते ३१.३.२००६ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

> "सन १ जाने.२००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीमध्ये जिल्हा परिषद औरंगाबाद-(सिंचन विभाग) यांच्यामार्फत कन्नड तालुक्यात-विभागीय अभियंता श्री. फुलंब्रीकर तसेच ज्यूनि.इंजिनीअर श्री. जैन व श्री. गुंडरे यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या कामासाठी धान्य राष्ट्रीय रोजगार योजना कामाचे हजेरी पत्रकांच्या व अंदाजपत्रकांच्या छायांकित प्रती तसेच मजुरांना देण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या कुपन्स व पेमेंट यांचा तपशील मिळणेबाबत.
>
> उदा. १) चिंचखेडा भाग क्र. १,२, (२) शिवराई भाग क्र. ३,(३) सितानाईक भाग क्र. १,२, (४) भिलदरी भाग क्र. भाग क्र. १,२,३,४,५, (५) सायगव्हाण भाग क्र. १,२, (६) कोळंबी भाग क्र. १,२,(७)भांबरवाडी भाग क्र. १,२,(८) चिपळी गट क्र. ३,४,५,(९)जेहुरवाडी गट क्र. ४, (१०) जामडीघाट गट क्र. २,(११) निपाणी गट क्र. २ तसेच झालेल्या इत्यादी कामांचा तपशील."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल न करता तो मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून केला होता. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

६(३)(एक)च्या तरतुदीप्रमाणे अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून वरीलप्रमाणे कोणतीही कार्यवाही न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २६.०३.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिल अर्जावर त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लवकरात लवकर माहिती देण्याचे त्यांचेकडील दि. २४.४.२००७ रोजीच्या आदेशान्वये सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचे वरील आदेशानुसार अपिलार्थीने दि. १७.४.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे परत त्याच माहितीसाठी अर्ज केला. या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३९००/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस शुल्क कळवितांना अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या व दर कळविला नाही. या पत्रामध्ये त्यांनी प्रति काम रु.३००/- याप्रमाणे १३ कामांसाठी एकूण रु.३९००/- शुल्क भरण्याचे या पत्रामध्ये सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०५.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची

अंमलबजावणी न झाल्यामुळे त्यांनी हे अपिल आयोगाकडे सादर केल्याचे कारण दर्शवून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक शुल्काचा भरणा, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात करण्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांचे पत्र त्यांना दि. १६.५.२००७ रोजी प्राप्त झाले आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी कन्नड येथील पोस्टामध्ये दि. १४.५.२००७ रोजी टाकलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस २० दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले होते, तथापि सदर कालावधी व्यपगत झाल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र त्यांना प्राप्त झाले, त्यामुळे सदर माहिती त्यांना विनामूल्य मिळावी. त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः माहिती मागितल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अनेक वेळा हजर झाले, तथापि जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जबाबदार कर्मचारी अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नसल्यामुळे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचेकडील दि. २७.४.२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीचे घरी प्रत्यक्षतः त्यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यामार्फत देण्याचा प्रयत्न केला, तथापि अपिलार्थी यांचे घरी त्यांचे कार्यालयातील एक शिपाई तीन वेळा जाऊनही त्यांचे पत्र अपिलार्थीस तामिल होऊ न शकल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस हे पत्र रजिस्टर्ड पोस्टाने दि. १४.५.२००७ रोजी पाठविले व ते अपिलार्थीस दि. १६.५.२००७ रोजी प्राप्त झाले. मध्यंतरीच्या काळात, त्यांनी अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती व्यक्तीशः दाखविली असून त्यावर अपिलार्थी याचे समाधान झाले आहे.अपिलार्थीस निश्चित कोणत्या तारखेस माहिती दाखविली हे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांना आयोगास निश्चित तारीख सांगता आली नाही व त्याचबरोबर जन

माहिती अधिकारी यांच्या या विधानाचा अपिलार्थी यांनी इन्कार केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दाखविल्याचा जन माहिती अधिकारी यांचा दावा आयोग येथेच फेटाळून लावत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अनेकवेळा भेट दिल्याचे व त्यांचे कार्यालयात कोणीही जबाबादार अधिकारी/कर्मचारी उपस्थित नसल्याचे म्हटले आहे, यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात एकूण दहा कर्मचारी कार्यरत असून त्यातील काही कर्मचाऱ्यांना दौऱ्याचे काम असते तर काही कर्मचाऱ्यांना कार्यालयीन काम असते व ज्या कर्मचाऱ्यांना दौऱ्याचे काम नसते असे सर्व जबाबदार कर्मचारी हे कार्यालयात उपस्थित असतात, असे आयोगास सांगितले आहे.तसेच अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांचेकडे तयार आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दि. १.२.२००७ रोजीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नाही. तथापि अपिलार्थी यांच्या दि. २६.३.२००७ रोजीच्या अर्जावर दि.१६.४.२००७ रोजी त्यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि.२४.४.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दि. १.२.२००७ रोजीचा मूळ अर्ज जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाला नव्हता. एक महिन्याचा कालावधी लोटल्यानंतर आपल्या अर्जाचे काय झाले, याची चौकशी करण्यासाठी अपिलार्थी जिल्हा परिषद,औरंगाबाद येथे हजर झाले असता सदर अर्ज जिल्हा परिषद कार्यालयात आढळून आला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी त्यांचा दि. १.२.२००७ रोजीच्या अर्जाची झेरॉक्स प्रत दि. २६.३.२००७ रोजी जिल्हा परिषद कार्यालयात पुन्हा सादर केली व तद्नंतर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील प्रक्रिया सुरु झाली. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. २६.३.२००७ रोजी मूळ माहितीचा अर्ज व प्रथम अपिल अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे सादर केला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची तारीख

२६.३.२००७ आहे, हे गृहित धरले तर अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.४.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे अभिप्रेत होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला आहे. सदर प्रतिसाद अधिनियमातील तरतुदीपेक्षा उशीरा दिला असल्याने, अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीसाठी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) प्रमाणे शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्या दि. २७.४.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अपिलार्थीस त्यांना देण्यात येणाऱ्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्याचा प्रतिपृष्ठ दर याचा देखिल उल्लेख केलेला नाही. म्हणूनच या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(६) ची तरतुद लागू होत आहे. या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती द्यावी लागेल. हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती तीन दिवसांचे आत देण्यात यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कल्याणराव दगाजीराव पाटील, रा. शितलामाता गल्ली, पवारवाडा शिवाजीनगर, कन्नड जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (सिंचन) जिल्हा परिषद, उपविभाग,कन्नड जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६१

निर्णय दिनांक : १५.०५.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>रा.परभणी | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक,<br>हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक,<br>परभणी वन विभाग,परभणी. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. वामन रंगनाथराव मोरे, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली श्री. अनंत मोरेश्वर अवचट ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, परभणी वन विभाग,परभणी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०३.०४.२००७ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून सन २००१ ते २००५ या कालावधीची त्यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित माहितीची खालीलप्रमाणे मागणी केली होती.

> "अर्ज क्र. १) सन २००३ मध्ये अुपवन संरक्षक यांच्या निवासस्थानाला- जोडून अधीकची खोली, एक संडास स्नानगृह, पोर्च, सेन्ट्री कक्ष व दोन वाहानाचे तळ, (गॅरेज) इ. बांधकामास कोणत्या आर्थिक तरतुदीतून खर्च केला? आर्थीक विवरण व शीर्ष द्यावे माहीती द्यावी.
>
> अर्ज क्र. २) २००१ ते २००५ हया दरम्यान, परभणी जिल्हयातील किती अवैध आरा गिरण्या बंद करण्यात आलेल्या आहेत? त्यांची बंद आरा गिरण्याची यादी देण्यात यावी, माहिती द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याने व ती उपवनसंरक्षक, परभणी यांचेकडे उपलब्ध असल्याने त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या आरा गिरण्यासंबंधातील माहिती त्यांच्याकडील दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये उपवनसंरक्षक, परभणी यांचेकडून मागितली, उपवनसंरक्षक यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासंदर्भातील माहिती त्यांनी त्यांचेकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये उपवनसंरक्षक यांचेकडे मागितली असल्याचे दिसून येत आहे. उपवनसंरक्षक, परभणी यांनी आरागिरण्या संदर्भात दि. ११.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना माहिती दिली व बांधकामासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना दि. ११.९.२००७ रोजी दिली. उपवनसंरक्षक यांचेकडून प्राप्त झालेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम आरा गिरण्यासंबंधातील दि. १६.५.२००७ रोजी व बांधकामासंबंधातील माहिती दि. १४.९.२००७ रोजी पाठविली. सदर दोन्ही माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये कबूल केले.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ८.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची कोणतीही दखल घेतली नसल्याचे व जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याचे नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना साध्या पोष्टाने अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती पाठविली आहे.सदर माहिती त्यांना दि. ३.१०.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने पुरविलेली माहिती असत्य असल्याचे संदर्भात त्यांचेकडे पुरावा आहे. अनधिकृत आरागिरण्यासंदर्भात किती प्रकरणात गुन्हे दाखल केले, अशी माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांनी एकूण ३ गुन्हे दाखल केल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. मात्र त्यांना दि. ३.१०.२००७ रोजी प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात कोणतीही अनधिकृत आरागिरणी चालू नसल्याचे म्हटले आहे. ही माहिती त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि. ९.७.२००७ रोजीच्या वेगळया अर्जाद्वारे मागितली असता, प्राप्त झालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी

त्यांना माहिती देण्यासाठी विलंब लावल्याबद्दल त्यांचेवर शास्ती लावण्याची कार्यवाही करावी, अशी त्यांनी शेवटी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांचे मुख्यालय हिंगोली येथे असून ते सध्या सहायक उपवनसंरक्षक, हिंगोली या पदावर कार्यरत असून त्यांची परभणी व हिंगोली या दोन्ही जिल्हयांसाठी जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे परभणी जिल्हयाशी संबंधित असलेली माहिती त्यांना प्रथमतः उपवनसंरक्षक, परभणी यांचे कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी लागली. या प्रकरणात अपिलार्थीच्या दि. ३.४.२००७ रोजीच्या अर्जावर त्यांनी त्याच दिवशी दि.३.४.२००७ रोजी उपवनसंरक्षक परभणी यांचेकडे माहिती मागितली होती तर अपिलार्थीच्या दुसऱ्या अर्जातील माहिती उपवनसंरक्षक परभणी यांचेकडे दि. २३.४.२००७ रोजी मागितली. उपवनसंरक्षक, परभणी यांचेकडून त्यांना एका अर्जासंदर्भात दि. ११.५.२००७ रोजी प्राप्त झाली ती त्यांनी अपिलार्थीस दि. १६.५.२००७ रोजी पाठविली तर दुसऱ्या अर्जासंदर्भातील माहिती उपवनसंरक्षक,परभणी यांचेकडून त्यांना दि. ११.९.२००७ रोजी प्राप्त झाली व ती त्यांनी अपिलार्थीस दि. १४.९.२००७ रोजी दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. ३.४.२००७ रोजी केलेल्या दोन अर्जा संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार तीस दिवसांचे आत प्रतिसाद देणे अपेक्षित आहे, तथापि अपिलार्थीच्या एका अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.५.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे तर दुसऱ्या अर्जासंदर्भात दि. १४.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती सोपी,सरळ व साधी असल्याचे दिसून येते. त्यामुळे ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असल्याचे संभवत

नाही. वन विभागाने माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्जदारास माहिती देण्यासंदर्भात केलेली व्यवस्था क्लिष्ट आहे, असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ५ मध्ये जास्तीत जास्त जन माहिती अधिकारी नेमण्याचे सूचित केले गेले आहे. वास्तविकतः हिंगोली व परभणी जिल्हयाकरिता दोन वेगवेगळे जन माहिती अधिकारी आवश्यक असतांना देखिल वन विभागाने फक्त एकच जन माहिती अधिकारी, तोही हिंगोली येथील मुख्यालयातील नेमलेला आहे. त्यामुळे जनसामान्यांना वन विभागाविषयी विहित मुदतीत माहिती प्राप्त करुन घेणे कसे क्लिष्ट झाले आहे, याचे वरील प्रकरण म्हणजे एक उत्तम नमुना ठरेल, यात शंका नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे ताब्यात नव्हती, ती माहिती त्यांना उपवनसंरक्षक, परभणी यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावयाची होती. एका प्रकरणात त्यांनी ती उपवनसंरक्षक परभणी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस थोडया विलंबाने पुरविली आहे. मात्र अपिलार्थीने उपवनसंरक्षक यांचे निवासस्थानाच्या बांधकामासंदर्भात विहित केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. १४.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये पुरविली गेली आहे. या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे निवासस्थानाच्या बांधकामाचे खर्च कोणत्या आर्थिक तरतुदीमधून केला, त्या आर्थिक तरतुदीचे नाव व शीर्ष एवढयाच स्वरुपात माहिती मागितली होती. तथापि ही माहिती देखिल उपवनसंरक्षक,परभणी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ११.९.२००७ रोजी पाठविली आहे. अपिलार्थीस केवळ 'लेखाशीर्ष' ही माहिती इतक्या विलंबाने कळविण्याच्या उपवनसंरक्षक परभणी यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी ते स्वतः जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेलेले आहेत. अपिलार्थीस दि. ८.५.२००७ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर देखिल त्यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा निःसंशयपणे भंग केला आहे, असे आयोगाचे मत आहे.त्यांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा

कार्यशैलीची मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद यांनी यथायोग्य रित्या नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व इतर अधिकारी व कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, उपरोक्त प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली उपवनसंरक्षक यांच्या निवासस्थानाच्या संबंधित बांधकामासंबंधीची माहिती दीर्घ कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंबाने दिलेली आहे.सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे इतर सर्व त्यांचे सहाय्यक व कर्मचारी यांचेवर त्यांना अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रदीर्घ कालावधीकरता वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे मे,२००८ पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा.

"००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

उपरोक्त शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) वनवृत्त,औरंगाबाद यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसांचे आत करावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल त्यांनी आयोगास जून, २००८ पासून नियमितपणे शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा सादर करावा.

अपिलार्थी यांना त्यांच्या दोन्ही अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून आले आहे की, वन विभागाने त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त जन माहिती अधिकारी यांच्या नेमणूका करुन त्यांचेकडील माहिती जन सामान्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अधिक सकारात्मक कार्यवाही करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१.अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना, एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत भरावी.

३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) वनवृत्त, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर अधिकारी/कर्मचारी हे शास्तीचा भरणा नियमितपणे जुन,२००८ पासून करतील असे पहावे व या संदर्भातील आपला अहवाल आयोगास नियमितपणे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरली जाईपर्यंत, पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**प्रत:**

१ श्री. वामन रंगनाथराव मोरे,बी/१५४, विवेकनगर, वसमतरोड,ता.जि.परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली,नांदेड रोड, खटकाळी,हिंगोली.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,परभणी वन विभाग,कारेगाव रोड, परभणी.यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) वनवृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६२

निर्णय दिनांक : १५.०५.२००८

१ श्री. बाबूराव तुकाराम बेडदे, : अपीलार्थी

मु.पो.जानवळ, ता.चाकूर जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, जानवळ
ता.चाकूर जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,
चाकूर जि.लातूर

त्रयस्थ पक्ष :
१) श्री. ज्ञानोबा कोते, रा. जानवळ
२) श्री. राजाराम आडाव, रा. जानवळ
३) श्री. संभाजी कोते, रा. जानवळ

**विवेचन**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. बाबूराव तुकाराम बेडदे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, जानवळ, ता.चाकूर जि. लातूर श्री. काशिनाथ पिराजी कांबळे, ( त्यांना यापुढे जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, चाकूर जि.लातूर श्री. तुकाराम काशिनाथ नवले ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व त्रयस्थ पक्ष श्री.ज्ञानोबा व्यंकोबा कोते (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १२.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडील अद्ययावत अभिलेख्यावरुन त्रयस्थ पक्षाविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " खरेदी केलेल्या जागेची लांबी रुंदी मिळणे बाबत - रामराव नागोराव आडाव यांची जागा १) ज्ञानोबा व्यंकोबा कोते २) संभाजी व्यंकोबा कोते यांनी घेतली आहे. या घेतलेल्या जागेची लांबीरुंदी ग्रामपंचायत नुसार किती आहे ते देणे."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.२.२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती पोटी त्यांनी रु.११५/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने रु.११५/- इतक्या रकमेचा भरणा दि. २३.२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात केला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २८.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचेकडील उपलब्ध असलेल्या त्रयस्थ पक्षाच्या मिळकतीचा नमुना नं.८ ची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पाठवून दिली. सदर प्रत अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस फक्त एका पृष्ठाची माहिती मिळूनही सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी रु.११५/- इतके शुल्क लावल्याबद्दल अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.०३.२००७ रोजी प्रथम

अपील सादर केले आहे.  सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.४.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.४.२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिल्याचे नमुद करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आकारलेली फी नियमबाहय व जादा असल्याचे नमुद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०७.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी अवास्तव व कायदेबाहय शुल्क आकारल्याने जन माहिती अधिकारी यांनी उर्वरित रक्कम त्यांना परत करण्यासाठी आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती खरी आहे किंवा खोटे आहे याची शहानिशा करण्यास आयोगास विनंती  केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देतांना त्रास दिला व एका पृष्ठाच्या माहितीसाठी रु.११५/- इतके अवाजवी शुल्क त्यांनी आकारल्याबद्दल त्यांचेवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्तीची कार्यवाही करावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहिती अपिलार्थीस दि. २८.२.२००७ रोजी दिली असून त्यांनी या माहितीपोटी आकारलेले शुल्क रु.११५/- हे देखील अपिलार्थीस दि. २८.११.२००७ रोजी परत केले आहे.अपिलार्थीस द्यावयाची माहिती केवळ एका पृष्ठाची असतांना त्यांनी रु.११५/- इतके शुल्क का आकारले, हे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता अपिलार्थी यांनी यापूर्वी त्यांच्याकडे एकूण सहा वेळा माहितीसाठी अर्ज केले असून, त्या सर्व

अर्जातील माहिती देण्याकरता त्यांनी सदर शुल्काची आकारणी अपिलार्थी यांचेकडून केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस आकारले गेलेली जादा फी त्यांना परत केली गेलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या दि. १२.२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.२.२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे त्यांच्याकडील करपात्र इमारती व जमिनी यांच्या अभिलेखामधून अपिलार्थीस दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती दिली आहे, तिचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील लांबी व रुंदी संदर्भातील माहिती या पत्रामध्ये आहे. त्यानुसार अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, या प्रकरणात प्राप्त झाल्याचे दिसून येते. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अवाजवी शुल्क आकारल्याचा केवळ एकच मुद्दा आयोग आता विचारात घेत आहे. अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती केवळ एका पृष्ठाची असतांना अपिलार्थीस एकूण ११५/- इतके शुल्क भरण्यास कळविण्याची जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची व बेकायदेशीर आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या कृतीचे समर्थन त्यांनी वरील युक्तीवादामध्ये केलेला आहे. तथापि सदर समर्थन आयोग मानत नाही, कारण अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितल्यास केवळ त्याच अर्जासंदर्भात माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क त्यांनी अर्जदारास कळवावयाचे आहे. अपिलार्थीने जरी जन माहिती अधिकारी यांचेकडे वेगळे अर्ज केले असले तरी त्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस द्याव्या लागणाऱ्या माहितीच्या पृष्ठांची संख्या विचारात घेऊन माहितीच्या आकारमानाप्रमाणे जन माहिती

अधिकारी यांनी प्रत्येक अर्जनिहाय वेगवेगळे शुल्क आकारणी त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे करणे भाग आहे. या प्रकरणात अपिलार्थीकडून घेतलेले जादाचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांना परत केलेले आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.२.२००७ रोजी रु.११५/-भरणा केला मात्र हेच शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.११.२००७ म्हणजेच एकूण नऊ महिने इतक्या विलंबाने परत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीसाठी आकारलेले शुल्क खरोखरीच जादा असल्याचा जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.४.२००७ रोजी निर्णय दिला आहे, मात्र सदर शुल्क परत करण्यास जो विलंब लावला आहे, त्यामागे केवळ अपिलार्थीस त्रास देणे, एवढाच त्यांचा हेतू असू शकतो, असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीस दिलेल्या त्रासाची नुकसान भरपाई म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रक्कम रु.१००/- हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर आदेश माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९(८)(ब) अन्वये देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना या प्रकरणात माहिती मिळविण्यासाठी झालेल्या त्रासाबद्दल नुकसान भरपाई म्हणून रु.१००/- एवढी रक्कम हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १५.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाबूराव तुकाराम बेदडे,मु.पो.जानवळ, ता.चाकूर जि.लातूर

२ जन माहिती अधिकारी,तथा ग्राम विकास अधिकारी,ग्राम पंचायत, जानवळ ता.चाकूर जि.लातूर जिल्हा औरंगाबाद.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी,तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, चाकूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११४९

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. सय्यद आसीफअली नूरअली, : अपिलार्थी
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मांजरी,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सय्यद आसीफअली नूरअली व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

औरंगाबाद हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) जिल्हा परिषद औरंगाबाद श्री. संतोष विठ्ठलराव कवडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या पदोन्नतीसंबंधी दिनांक २०-१२-२००६ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाबाबत ऑक्टोंबर २००६ ते मार्च २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" परिचर वर्ग-४ संवर्गातून कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नतीस पात्र असणेबाबत व मूळ प्रमाणपत्रे सादर करण्यास परवानगी मिळणेबाबत वैयक्तीक प्रस्तावावर प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल आणि सदरील प्रस्तावाची साक्षांकित प्रत. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे विना कारवाई तसाच ठेऊन दिला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई न करता सदर अपील अर्ज त्यांच्याकडे विना कारवाई तसाच ठेऊन दिला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जावर व अपील अर्जावर कोणतीही कारवाई केली नसल्याचे नमूद करुन त्यांनी आपल्या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने अपिलार्थीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज त्यांच्याकडे अथवा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थी हे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील वर्ग-४ चे कर्मचारी असून त्यांनी दिनांक २०-१२-२००६ रोजी त्यांना वर्ग-४ संवर्गातून वर्ग-३ संवर्गात पदोन्नती

मिळण्यासाठी अर्ज केला होता व या अर्जासंदर्भात काय कारवाई झाले हे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये जिल्हा परिषद प्रशासनाला विचारले होते. तथापि संबंधीत लिपिकाने अपिलार्थीचा दिनांक २०-१२-२००६ रोजीचा मूळ अर्ज विना कारवाई तसाच ठेऊन दिला त्यामुळे अपिलार्थीने दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या केलेल्या अर्जावर कोणतीही कारवाई त्यांच्याकडून झाली नाही. मात्र आता दिनांक १२-०५-२००८ रोजी पदोन्नती निवड समितीची बैठक घेऊन अपिलार्थीस वर्ग-३ पदावर पदोन्नती देण्यासाठी कारवाई पूर्ण झाली असून, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी हे वर्ग-४ चे कर्मचारी असून ते परिचर या पदावर जिल्हा परिषद औरंगाबाद येथे कार्यरत आहेत. त्यांना वर्ग-३ मध्ये पदोन्नती मिळण्यासंदर्भात त्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे दिनांक २०-१२-२००६ रोजी अर्ज केला होता. या अर्जावर जिल्हा परिषदने नेमकी कोणती कारवाई केली हे जाणून घेण्याकरिता त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी प्रथम अर्ज केला होता व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दिनांक २८-०५-२००७ रोजी केले

होते. तथापि त्याच लिपिकाने प्रथम अर्ज व प्रथम अपील विना कारवाई तसेच ठेऊन दिल्याने जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती पुरवू शकले नाही. अपिलार्थीस त्यांनी आता त्यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये पूर्ण माहिती दिल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर पोस्टींग ऑफ सर्टिफिकेटने पाठविले आहे.

अपिलार्थीस जरी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मिळाली असली व त्यांना वर्ग-३ संवर्गामध्ये पदोन्नती दिली असली, तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअन्वये त्यांनी मागितलेली माहिती त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीकरिता मिळू शकली नाही हे सत्य शेवटी उरत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक / कर्मचारी हे प्रामुख्याने जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमा-तील तरतुदीनुसार दाखल झालेला अर्ज व अपील संबंधीत अधिका-याकडे न पाठवून ते माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ चा भंग होण्यास प्रामुख्याने जबाबदार ठरत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदी नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी आवश्यक ती माहिती प्राप्त हेण्यापासून वंचित ठेवल्याने त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी.

सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा, त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जुलै २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी / कर्मचारी यांना अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ

कालावधीसाठी आवश्यक ती माहिती प्राप्त हेण्यापासून वंचित ठेवल्याने त्यांच्यावर रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी वरील आदेश क्रमांक २ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल ऑगस्ट २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सय्यद आसीफअली नूरअली, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मांजरी, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५०

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. शेख अब्दुल गणी शेख नादर, : अपिलार्थी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बगडी,
केंद्र जामगाव, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख अब्दुल गणी शेख नादर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. जिवाजी बाजीराव बागूल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.), जिल्हा परिषद श्री. संतोष विठ्ठलराव कवडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे चट्टोपाध्याय वेतनश्रेणी संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. सन २००५ ते २००६ मध्ये देण्यात आलेल्या चट्‌टोपाध्याय वेतनश्रेणी बाबतची सविस्तर माहिती तथा निकष व प्रदान करण्यात आलेल्या शिक्षकांची यादी.

२. सन १९९१ मध्ये नेमणूक मिळालेल्या शिक्षकांना चट्‌टोपाध्याय वेतनश्रेणी देण्याबाबतचे निकष व वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या आदेशांच्या प्रती.

३. सन १९९१ मध्ये नेमणूक मिळालेल्या परंतु चट्‌टोपाध्याय वेतनश्रेणी न दिलेल्या शिक्षकांची यादी व त्यांची कारणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ संदर्भातील काही माहिती त्यांनी

अपिलार्थीस गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून घेण्याचे सूचित केले आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत केले व अपिलार्थीची पोचसही त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ च्या पत्राच्या मूळ प्रतीवर घेतली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर दिनांक १८-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन या अपील अर्जासंदर्भातील आपले आदेश दिनांक २२-०६-२००७ रोजी पारीत केले. सदर अपिलावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे नमूद करुन उर्वरीत माहिती गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून घेण्याची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली सूचना योग्य असल्याचे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे

दिनांक १८-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील करण्याचे कारण म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांचे अपील निकाली काढले असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या सर्व गा-हाण्याचा निपटारा जन माहिती अधिकारी यांनी त्वरीत करण्याचे आश्वासन दिल्याने त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही व ते आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेऊ इच्छितात.

सुनावणीच्या या टप्प्यावर खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेण्याची इच्छा व्यक्त केल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन असलेले व्दितीय अपील क्रमांक ११५० हे खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अब्दुल गणी शेख नादर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बगडी, केंद्र जामगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६३

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. साठे मुंजाभाऊ बाबुराव, : अपिलार्थी
नैकोटा, तालुका सोनपेठ,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
प्राथमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद बीड
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक),
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपशिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. साठे मुंजाभाऊ बाबुराव व जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद

श्री. पांडुरंग काशिनाथ जाधव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४ ते २६-०३-२००७ पर्यतच्या कालावधीतील खाजगी शाळासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“१. खाजगी प्राथमिक शाळेतील मागासप्रवर्गातील मु. अ. / शिक्षक यांना जात पडताळणी करणे आवश्यक आहे का ? असल्यास शासन नियमाची सत्यप्रत.

२. मागासप्रवर्गातील शिक्षकांना मु. अ. पदी पदोन्नती जात पडताळणी न करता देता येते का? येत असल्यास त्या शासन नियमाची सत्यप्रत.

३. मागासप्रवर्गातील मु. अ. पदी पदोन्नती जात पडताळणी न करता देता येत असल्यास शासन नियमाची सत्यप्रत.

४. जात पडताळणी न करता मु. अ. पदी पदोन्नती दिली असल्यास त्या शाळेची व मु. अ. च्या नावासहीत सर्व माहिती द्यावी.

५. मा. उपसंचालक यांचे पत्र क्र. ८३३१/४३, दि. १३-२-२००४ च्या पत्राची सत्यप्रत

६. शासन नियमाची पायमल्ली करुन जात पडताळणी न करता मु. अ. पदी पदोन्नती दिली असल्यास याबाबत आपले कार्यालय काय कार्यवाही करते व किती दिवसात याबाबत माहिती द्यावी.

७. संस्थेने एखाद्या शिक्षकाचा मु. अ. पदाचा कायम मान्यतेसाठी प्रस्ताव आपल्या कार्यालयास पाठवला व त्या प्रस्तावानुसार शै. वर्षासाठी मान्यता दिली असताना व परिविक्षाधिन कालावधी झालेला नसतांनाही त्याच प्रस्तावावर कायमामान्यता देता येते का ? असल्यास शासन नियमाची सत्यप्रत

८. खाजगी शाळेतील शिक्षकांना वेतनासह नौकरी करीत असतांना खाजगी महाविद्यालयात नियमीत (Regular) शिक्षण (इबीसीसह) घेता येते का ? असल्यास शासन नियमाची सत्यप्रत

९. अशा नियमात शिक्षणास संस्था/ मु. अ. व आपले कार्यालय परवनागी देऊ शकते काय असल्यास त्या नियमांची सत्यप्रत.

१०. नियमीत शिक्षण व वेतनासह नोकरी करुन दुहेरी लाभ घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणा-या शिक्षकाबाबत आपले कार्यालय कोणती कारवाई करु शकते त्याबाबतची माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दंड आकारुन शिस्तभंगाची कारवाई करण्याची व माहिती मिळण्याची विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन आदेश पारीत केल्याचे किंवा अपिलार्थी यांच्याशी यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००७ रोजी

व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून हेतूपूरःस्सर वंचित ठेवले आहे व आपल्या कर्तव्यात कसूर केला आहे, त्यामुळे त्यांच्यावर जास्तीत जास्त दंडात्मक शिक्षा व शिस्तभंगाची कारवाई करावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास संबंधीत लिपिकाने न आणून दिल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना कोणतीही माहिती पुरविता आली नाही. याच लिपिकाने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज देखील स्वतःकडे तसाच विनाकारवाई ठेऊन दिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांना कोणताही निर्णय घेता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ माहितीसाठीचा केलेला अर्ज व त्यावरील अपील अर्ज हे दोन्ही अर्ज जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधीत लिपिकाच्या चुकीमुळे विनाकारवाई तसेच पडून राहिले व परिणामी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपासून त्यांना प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहावे लागले व ही माहिती अपिलार्थीस आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. या प्रकरणी अपिलार्थी-च्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून उपेक्षा झाल्याचे दिसून येते. त्यांचे कार्यालय या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात पूर्णतः निष्क्रीय राहिल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम ऑक्टोबर २००५ मध्ये अंमलात आला आहे. तथापि या प्रदीर्घ कालावधीमध्ये बीड जिल्हा परिषदेस माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीची पुसटशी देखील जाणीव नसावी यावर आयोग विश्वास ठेवत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादात -- “संबंधीत लिपिकाने अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज त्यांनी सादर केले नाही आणि त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही” -- हे विधान त्यांच्या ढिसाळ प्रशासनाचे द्योतक आहे असे आयोग मानतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे व त्यांच्या अंमलबजावणीचे महत्व वेळीच लक्षात घेऊन आपल्या कार्यालयाकडे दर आठवड्या-मध्ये अथवा पंधरवाड्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमाखाली किती अर्ज आले व त्यांचा निपटारा कसा केला गेला याची

माहिती जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या जवळ ठेवणे हे अत्यावश्यक झाले आहे असे आयोगाचे मत आहे. याकरिता त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज व अपिले यांचा विहित मुदतीत निपटारा करण्याकरिता त्यांच्यातील प्रशासकीय व्यवस्थेमध्ये बदल करावा लागेल, अशा प्रकारचे बदल त्यांनी आपल्या व्यवस्थेमध्ये केले नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे.

अधिनियमाव्दारे माहिती देण्याचा विहित कालावधी संपला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या तरतुदीनुसार स्पष्ट केलेल्या ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही खुलासा अथवा कोणत्याही निर्णयाबाबतची कारणे कळविणे अपेक्षित नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये ब-याच मुद्दयावर त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना कारणे विचारलेली आहेत असे मुद्दे वगळता उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य देणे भाग आहे असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधी-करिता वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक हे जबाबदार ठरत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (५) मधील तरतुदी नुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे संबंधीत सहाय्यक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी जबाबदार ठरत आहेत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय ब-याच कालावधीसाठी वंचित ठेवले आहे व त्यांच्या या कृतीने ते माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरले आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जी अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे अशी सर्व माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रत्येक

दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात खालील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा,

लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)

सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा माहे जून २००८ पासून शासकीय कोषागारात नियमीतपणे करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल जुलै २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यंत आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जी अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत अहे अशी सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

४. शिक्षणधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद, बीड यांनी वरील आदेश क्रमांक ३ च्या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल माहे जुलै २००८ पासून नियमीतपणे दरमहा आयोगास पाठवावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साठे मुंजाभाऊ बाबुराव, नैकोटा, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमीक), शिक्षण विभाग जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमीक), जिल्हा परिषद,

बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६४

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. सुरेश वासुदेवराव कुलकर्णी, : अपिलार्थी
यशवंतनगर, दंडनाईक प्लॉट,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी स्थापत्य :
बांधकाम व दुरुस्ती विभाग, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
बांधकाम व दुरुस्ती विभाग, महाराष्ट्र
राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, बांधकाम व दुरुस्ती विभाग,
उस्मानाबाद

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश वासुदेवराव कुलकर्णी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांधकाम व दुरुस्ती विभाग उस्मानाबाद श्री. संजय मनोहर महात्मे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांधकाम व दुरुस्ती विभाग उस्मानाबाद हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ३०-०९-२००५ ते २४-०२-२००६ या कालावधीतील त्यांच्या स्वतःच्या संदर्भातील अंतीम उपदान मिळण्यास झालेल्या विलंबासंबंधी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. अंतिम उपदान मंजुरीसाठी पाठवलेले पत्र.

२. सर्कल ऑफिसने मंजुरी दिलेले पत्र.

३. W M शेक्शन मु. का. मुंबई कडे फंड मागणी केलेले पत्र.

४. W M शेक्शन कडून फंड मंजूर होऊन आलेले पत्र.

५. संबंधितास देण्यात आलेला चेक त्याचा दिनांक.

६.	कर्मचारी अंतिम उपदानाबद्दल वारंवार चौकशी करत होता, विलंब होत आहे म्हणून आपण संबंधीत वरीष्ठाकडे केलेला पत्रव्यवहार स्मरणपत्र इ. त्याबाबतचे पत्र. अंतिम उपदान मिळेपर्यतची सर्व जिम्मेदारी आपलीच आहे. कारण कर्मचारी आपल्या कार्यालयात काम करत होता. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या एकूण ६ मुद्दयापैकी २ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस कळविली. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा कोणताही पत्रव्यवहार

अपिलार्थीशी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही अप्राप्त आहे. त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे शास्ती व्हावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य मिळावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली असून त्याची नोंद त्यांच्या कार्यालयातील जावक रजिस्टर मध्ये केली आहे. आज रोजी त्यांनी जावक रजिस्टरची सत्यप्रत आयोगास दाखविण्यासाठी

आणली नाही. अपिलार्थी हे मुळात विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी असून ते नियत वयोमानानुसार ३० सप्टेंबर २००५ रोजी सेवानिवृत्त झाले असून सेवानिवृत्तीनंतरचे सर्व फायदे त्यांना मिळाले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे, परंतु सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झालेले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ते अत्यंत सरळ व सोपे असे होते तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण ६ मुद्दयावर माहिती मागितली असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फक्त २ मुद्दयावर माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देण्यात आलेल्या चेक क्रमांक, दिनांकासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे म्हणजे माहिती अधिकार अधिनियमाची थट्टा करणे असे म्हटल्यास फारसे वावगे वाटणार नाही. मात्र अपिलार्थी यांनी विचारलेल्या अर्जातील उर्वरीत २ मुद्दयावरील माहिती देणे जन माहिती अधिकारी

यांना फारसे अवघड व क्लिष्ट असे काम नव्हते.  परंतु त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली हा त्यांचा मुद्दा वादाच्या प्रयोजनार्थ जरी खरा आहे असे मानले तरी त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.  अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन संबंधीत माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २७-०४-२००७ रोजीचे पत्र प्राप्त न झाल्याने आता जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीस सेवानिवृत्तीनंतर देय असलेली रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून पाच महिने विलंबाने प्राप्त झाल्याने सदर रक्कमेवरील त्यांचे व्याज भेटले नाही व त्यांना आर्थिक झळ बसली व म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.  अपिलार्थीस असे सूचविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या वैयक्तीक तक्रारीचा मुद्दा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वरिष्ठ प्राधिकरणा-कडे मांडून आपल्या तक्रारीचे निवारण करुन घ्यावे असे त्यांना सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती मुद्दा क्रमांक ५ वगळून हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्‌नंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश वासुदेवराव कुलकर्णी, यशवंतनगर, दंडनाईक प्लॉट, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांधकाम व दुरुस्ती विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बांधकाम व दुरुस्ती विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६५

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले, : अपिलार्थी
मु. पो. कासराळी, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग,
बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम) दक्षिण
विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उपविभाग श्री. सुरेशराव श्रीधरराव जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) दक्षिण विभाग श्री. प्रेमसिंग मारोतराव लाहोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयातर्फे बिलोली अंतर्गत बिलोली, नायगाव, धर्माबाद तालुक्यात आकस्मित खर्चापोटी झालेला खर्च, प्रत्येक रस्त्यावर किती कि. मी. अंतरावर काम केले, त्या कामाचा खर्च, रस्त्याच्या अंतरासह व गावाच्या नावासह सर्कलवाईज या कामासंदर्भात ०१-०१-२००५ ते ३१-०३-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ परमनेन्ट ॲडव्हांस (आकस्मीत खर्चापोटी) १ जानेवारी २००५ ते ३१ मार्च २००७ पर्यत कामावर किती रक्कम उचलण्यात आला व कोणत्या कामात व कोणत्या रस्त्यात किती खर्च करण्यात आला. खर्चाचे पावती (व्हाऊचर) सत्यप्रती तसेच साहित्य, मुरुम, दगड इत्यादी व मजुराकडून कामापोटी घेतलेल्या पोचपावती (व्हाऊचर) चे सत्यप्रती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०६-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांचे सुनावणीसाठीचे पत्र त्यांना कधीही प्राप्त झाले नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आजपावेतो कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीची नोटीस देखील त्यांना कधीही प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दंडाची व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत शाखा अभियंता, वरिष्ठ सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडे उपलब्ध असते त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त होताच त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व शाखा अभियंता व इतर संबधितांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात अवगत केले होते व त्यांना सदर माहिती त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले होते. तथापि आजपावेतो एकाही संबंधितांनी त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सादर केलेली नाही. संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितली होती. तथापि त्यांनाही सदर माहिती आज पावेतो

अप्राप्त आहे. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ०८-०६-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी सदर सुनावणीस गैरहजर असल्याने ही सुनावणी होऊ शकली नाही. अपिलार्थीस सुनावणीसाठीचे पत्र पाठविल्यासंदर्भात त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत मागितली असता सदर प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र खरोखरच पाठविले होते किंवा कसे याबाबत आयोगास शंका आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती जरी मोठ्या प्रमाणात असली तरी ती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड नव्हते. तथापि त्यांनी आज सुनावणी मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सदर माहिती संबंधीत शाखा अभियंता व त्यांचे सहाय्यक यांच्या ताब्यात असते. अपिलार्थीने मागितलेल्या व्हाऊचरच्या मूळ प्रती जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे पाठविल्या जातात. जर अपिलार्थीने मागितलेली माहिती जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे उपलब्ध असेल तर जन माहिती अधिका-याने अपिलार्थीचा विचाराधीन अर्ज जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे पाठवावयास हवा होता व त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी

अशी कृती या प्रकरणी केल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती उपलब्ध न होण्यास जरी संबंधीत उप अभियंता हे १०० टक्के जबाबदार नसले तरी या कामी माहिती देण्यासाठी ज्यांचे सहकार्य घ्यावे लागते असे त्यांचे सर्व शाखा अभियंता व इतर सहाय्यक हे मात्र त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध असल्याने निश्चितपणे जबाबदार ठरतात असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या मध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक निश्चितपणे जबाबदार ठरतात असे आयोगाचे मत आहे. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीस आजतागायत म्हणजे अपिलार्थीने अर्ज केल्यापासून एक वर्षाहून जास्त कालावधी व्यपगत झाल्यानंतरही त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधीत प्राधिकरणाकडून प्राप्त होऊ शकली नाही ही बाब नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासना च्या दृष्टीने निश्चित शोचनीय आहे असे आयोगाचे मत आहे. अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता टळून गेला असल्याने

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेचे संबंधीत शाखा अभियंता व त्यांचे सहाय्यक हे किती निर्ढावलेले आहेत हे वरील उदाहरणावरुन सिध्द होत आहे. शाखा अभिंयता हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी व उप अभियंता हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी असल्यामुळे संबंधीत शाखा अभियंत्यावर उप अभियंत्याचे आवश्यक तेवढे नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी संबंधीत शाखा अभियंत्यानी अपिलार्थीस एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही कोणतीही माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सर्व सहाय्यक / शाखा अभियंता यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे, त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागीय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाचे आत करावी. सदर शास्तीचा भरणा जन माहिती

अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधित अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जुलै २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल माहे ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा. अपिलार्थी यांना माहिती मिळण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपीलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगतः नमूद करण्यात येते की, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती मागितलेल्या कालावधीमध्ये संबंधीत शाखा अभियंता यांनी एकूण १७,०२,९९३ /- इतकी रक्कम खर्च केली आहे. तथापि या रक्कमेचे व्हाऊचर्सच्या प्रति ते अपिलार्थीस देऊ शकले नाहीत. रक्कमेची व्याप्ती व प्रकरणातील गांभीर्य पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीतावर वेळीच कारवाई करणे त्यांच्या दृष्टीने श्रेयस्कर ठरेल असे आयोगास

वाटते त्यामुळे त्यांनीही या प्रकरणी वैयक्तीक लक्ष देणे आयोगास अभिप्रेत आहे. सबब त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, या प्रकरणी सर्व संबंधीत शाखा अभियंत्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांचे विरुध्द प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्यात करुन, तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

आदेश

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्यास जबाबदार असलेले संबंधीत जन माहिती अधिकारी, त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व शाखा अभियंता व त्यांचे सहाय्यक यांना व त्यांचे सर्व सहाय्यक / कर्मचारी यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची भरणा त्यांनी वर निकालपत्रात विवेचन केल्याप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीची अधिकारी / कर्मचारीनिहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी हे सदर शास्तीचा भरणा नियमीतपणे जुलै २००८ पासून शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल माहे ऑगस्ट २००८ पासून पुढे दरमहा सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत आयोगास पाठवावा.

५. उपरोक्त प्रकरणी संबधीत शाखा अभियंता यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी प्रचलीत सेवानियमा-नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

५. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत पुरवावा.

औरंगाबाद
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संग्राम विठ्ठलराव हायगले, मु. पो. कासराळी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम), जिल्हा परिषद उपविभाग, बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) दक्षिण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६६

निर्णय दिनांक १६-०५-२००८

श्री. निवृत्ती सुभानराव गऊळकर, : अपिलार्थी
१५९ सी वात्सल्यनगर, सिडको,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
आयुक्त तथा अध्यक्ष, अंब्रेला
सोसायटी, महानगरपालिका,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
आयुक्त तथा अध्यक्ष, अंब्रेला
सोसायटी, अहमदनगर
महानगरपालिका, अहमदनगर

३ त्रयस्थ पक्ष : डॉ. सुरेखा गरुळकर, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अहमदनगर
महानगरपालिका, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त (सामान्य), अहमदनगर
महानगरपालिका, अहमदनगर

# <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०५-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. निवृत्ती सुभानराव गऊळकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका श्री. नारायणराव गोपाळ कुलकर्णी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य), अहमदनगर महानगरपालिका व त्रयस्थ पक्ष डॉ. सुरेखा गऊळकर हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आर. सी. एच. कार्यक्रमांतर्गत भरण्यात येणा-या मेडीकल ऑफिसर / लेडी मेडीकल ऑफिसर पदाच्या निवड प्रक्रियेसंदर्भात १५-११-२००६ ते २६-०२-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. आर. सी. एच. कार्यक्रमांतर्गत मेडिकल ऑफिसर / लेडी मेडिकल ऑफिसर पदांच्या भरतीसाठी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातील रिकाम्या जागांचा संवर्गनिहाय तपशील व त्यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता यासंबंधी माहिती.

२. प्राप्त झालेल्या अर्जाची संवर्गनिहाय माहिती.

३. मुलाखतीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांची संवर्गनिहाय माहिती.

४. मुलाखतीसाठी हजर असलेल्या सर्व उमेदवारांची तसेच निवड झालेल्या उमेदवारांची संवर्गनिहाय माहिती.

५. डॉ. सुरेखा गऊळकर यांनी वरील पदासाठी अर्ज केला होता काय ? यांना मुलाखतीसााठी बोलाविण्यात आले होते काय ? त्या मुलाखतीसाठी हजर होत्या काय ? त्यांची मुलाखत घेण्यात आली होती काय ? नसेल तर त्याचे कारण काय ? मुलाखत घेण्यात आली असेल तर त्यांची निवड झाली किंवा नाही ? नसल्यास त्याचे कारण काय ? यासंदर्भात त्यांनी मुलाखतीच्या दिवशी आपणास निवेदन दिले होते काय ? दिले असल्यास त्याची दखल घेण्यात आली किंवा नाही ? नसल्यास त्याचे कारण काय ? डॉ. सुरेखा गऊळकर यांनी ज्या पदासाठी अर्ज केला होता त्या पदासाठी किती उमेदवार हजर होते ? त्यापैकी निवड झालेल्या उमेदवारांची माहिती.

६. आर. सी. एच. कार्यक्रमांतर्गत मेडिकल ऑफिसर / लेडी मेडिकल ऑफिसरची रिकामी पदे भरण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना उपलब्ध आहेत काय ? तसेच लेडी मेडिकल ऑफिसरच्या निवड प्रक्रियेच्या संदर्भात अंब्रेला सोसायटीच्या कार्यकारणीत काही निर्णय घेण्यात आले आहेत काय ? तसे

असल्यास अशा नियमावलींच्या व निर्णयाच्या प्रती पुरविण्यात याव्यात. त्यासाठी लागणारी फीस भरायला मी तयार आहे.

७. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (८) (iii) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलीय अधिका-याचा तपशील देण्यात यावा. जेणेकरुन समाधान कारक माहिती न मिळाल्यास अपिलीय अधिका-याकडे अपील करणे सोईचे होईल. "

अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००७ रोजी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दिनांक २०-५-२००७ रोजी पारीत केले. या

आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २६-०२-२००७ रोजी केलेला मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २८-०२-२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठविला होता व सदर पत्र अहमदनगर महानगरपालिकेकडे दिनांक २८-०२-२००७ रोजी मिळाल्याचे संबंधीत अधिक्षक पोस्ट ऑफिसेस नांदेड यांचे दिनांक १४-५-२००७ रोजीचे पत्र त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांना माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा म्हणून सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी मूळ अर्जाच्या प्रतीसह प्रथम अपिलात दाखल केले होते त्यामुळे त्यांच्या मूळ अर्जाची प्रत संबंधीत जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे असावयास हवी. नंतरही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी तसेच उप आयुक्त तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याशी चर्चा केली. तथापि त्यांना अपेक्षित असलेली संबंधीत माहिती प्राप्त होऊ शकली नाही. सदर माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती सहाय्यक आयुक्त (आस्थापना) यांच्या ताब्यात असून या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी माहिती देणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने केलेला प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता त्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या अर्जावर कोणतीही कारवाई करता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी, त्यांनी आज आयोगासमोर त्यांचा मूळ अर्ज अहमदनगर महानगरपालिकेस दिनांक २८-०२-२००७ रोजी प्राप्त झाला असल्याचा पुरावा सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचा मूळ अर्ज अहमदनगर महानगरपालिकेस दिनांक २८-०२-२००७ रोजी मिळाला असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाबरोबर देखील त्यांच्या मूळ अर्जाची प्रत अहमदनगर महानगरपालिकेस सादर केली आहे. जन

माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीने ज्या विषयासंदर्भात माहिती मागविली ती माहिती अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाकडे आहे त्यामुळे त्या विभागाने ही माहिती अपिलार्थीस पुरविणे भाग आहे. माहिती अधिकार अधिनियमातील विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्दयावर माहिती मागविली असून त्यापैकी मुद्दा क्रमांक ५ व ६ या मुद्दावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचा खुलासा अपेक्षित करणा-या स्वरुपात माहिती मागविली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये " माहिती " या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केलेली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जात मुद्दा क्रमांक ५ मधील व ६ मधील बहुतांशी माहिती ही " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. मात्र मुद्दा क्रमांक ५ मधील निवड झालेल्या उमेदवारांची माहिती हा भाग व मुद्दा क्रमांक ६ मधील अंब्रेला सोसायटीच्या कार्यकारिणीत काही निर्णय घेण्यात आले आहेत काय ? तसे असल्यास अशा नियमावलीच्या व निर्णयाच्या प्रती पुरविण्यात याव्यात हा भाग " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे त्यामुळे

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व ६ या भागावर देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देणे अनिवार्य आहे.

उपरोक्त प्रकरणी कोणत्याही जनसामान्याच्या माहितीसाठीच्या साध्या अर्जाची कशा प्रकारे सार्वजनिक प्राधिकरणाकडून परवड केली जाते याचे हे प्रकरण म्हणजे एक उत्तम नमुना आहे असे येथे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघापैकी कोणीही या संपूर्ण घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्यासाठी कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही हे त्यांचे म्हणणे खरे धरले तरीही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अपील अर्जासोबत त्यांच्या दिनांक २६-०२-२००७ च्या मूळ अर्जाची झेरॉक्स प्रत सोबत जोडली होती. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना त्यांच्या कडे प्राप्त झालेल्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असते व त्यांचा अपिलार्थीस माहिती देण्याचा थोडा जरी दृष्टीकोन सकारात्मक असता तर अपिलार्थीस त्यांनी केलेल्या या अर्जातील माहिती वेळीच उपलब्ध झाली असती व त्यांना आयोगाकडे येण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निष्क्रीय व उदासीन भूमिकेमुळे त्यांना आयोगाकडे येणे भाग पडले. संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त

प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची नोंद आयुक्त महानगरपालिका यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाचे आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

सबब वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

<u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची नोंद आयुक्त महानगरपालिका अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०५-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निवृत्ती सुभानराव गऊळकर, १५९ सी वात्सल्यनगर, सिडको, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अहमदनगर

महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ त्रयस्त पक्ष श्रीमती सुरेखा गऊळकर मार्फत जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६७

निर्णय दिनांक : १७.०५.२००८

१ श्री. रंगराव उखर्डू पाटील, : अपीलार्थी
लोणीग्रुप, पो.बाहुटे,
ता.पारोळा, जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, किसान माध्यमिक विद्यालय,
लोणीग्रुप, ता.पारोळा जि. जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रंगराव उखर्डू पाटील (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, किसान माध्यमिक विद्यालय, लोणीग्रुप, ता.पारोळा जि.जळगाव ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक) जि.प.जळगाव ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २३.०१.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९९८ ते २००४ या कालावधीतील त्यांच्या वरिष्ठ वेतनश्रेणी, दुय्यम सेवापुस्तिका व उपसंचालकांच्या अपील निर्णयासंबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १९९८ मध्ये वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी अर्ज दिला. अद्याप वेतनश्रेणी (वरिष्ठ) कां दिली नाही? वरिष्ठ वेतनश्रेणीकरिता पैशांच्या मागणीच्या संभाषणाची टेप केलेली कॅसेट आहे. १९९८ मध्ये शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी माझ्या अपिलावर दिलेल्या निर्णयातील क्र. १ ते ३ बाबत केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती द्यावी. २००४ मध्ये मागणी करुनही अद्याप सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत मला का दिली नाही."

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १४.०३.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.०६.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील कोणतीही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून आजपावेतो प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २३.१.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे दिसत नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.३.२००६ रोजीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीच्या अपिल अर्जावर आपले कोणतेही आदेश पारित केले नाहीत. अपिलार्थीच्या यांनी त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जामध्ये एकूण तीन मुद्दे उपस्थित केले, त्यापैकी दोन मुद्दे हे प्रश्नार्थक स्वरुपात असून अपिलार्थी यांनी या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षिला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

> " **'माहिती'** याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने(मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही

कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती."

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जातील, 'अद्यापी वेतनवाढ का दिली नाही व अद्यापपर्यंत सेवापुस्तिकेची दुसरी प्रत का दिली नाही, हे दोन्ही मुद्दे वरील व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते.अधिनियमातील माहिती या शब्दाच्या वरील व्याख्येमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास देणे अपेक्षित आहे. अशा प्रकारच्या माहितीमध्ये कोठेही खुलासा व कारणे अशा प्रकारच्या माहितीचा समावेश नाही. किंबहुना, या व्याख्येचे अवलोकन करता असे दिसून येते की, माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांची भूमिका एका विश्वस्ताची, ज्याच्यावर उपलब्ध माहितीचे जनत करण्याची जबाबदारी आहे, अशाप्रकारची आहे. त्यांनी अर्जदारास विहीत मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत द्यावयाची आहे. त्यांच्याकडील उपलब्ध माहितीमधील निर्णयाचे कारण, एखाद्या कृतीचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देणे हे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. या स्पष्टीकरणाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना विचारलेल्या प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती, उत्तराच्या स्वरुपात त्यांना अपिलार्थीस देता येणार नाही, हे उघड होते. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, १९९८ मध्ये शिक्षण उपसंचालक, नाशिक यांचेकडे केलेल्या त्यांच्या अपीलावर त्यांनी दिलेल्या निर्णयातील मुद्दा क्र. १ ते ३ बाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे व ती विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थी हे किसान माध्यमिक विद्यालय, लोणीग्रुप ता.पारोळा येथे शिक्षक या पदावर कार्यरत होते. ते या पदावर कार्यरत असतांना त्यांचेवर केल्या गेलेल्या प्रशासकीय कार्यवाहीसंदर्भात त्यांनी शिक्षण उपसंचालकांकडे अपील केले होते. या अपिलावर

शिक्षण उपसंचालक यांनी दि. १६.२.१९९८ रोजी निर्णय दिला होता. त्यातील निर्णय क्र.१ मध्ये अपिलार्थीचे थकित वेतनाबाबत संबंधित संस्थेने घेतलेला निर्णय कायम ठेवला होता, तर मुद्दा क्र. २ शी अपिलार्थीचा सरळ संबंध पोहचत नाही. मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या रजेविना अनुपस्थितीच्या कालावधीची त्यांची रजा मान्य करावी अथवा वेतन कपात करावे, असे आदेश दिले होते. या तीनही आदेशासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली याची अपिलार्थीस माहिती हवी होती. वास्तविकतः अपिलार्थीस सदर निर्णय झाल्यानंतर प्राप्त झालेले त्यांचे वेतन पाहता, आपले वेतनातून कपात झाली आहे किंवा कसे हे याची माहिती असावयास हवी, तथापि अपिलार्थी यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे मागितली आहे. वास्तविक पाहता ही माहिती अपिलार्थीकडे आहे. तरीही त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितल्याचे दिसून येते. एवढे जरी असले तरी अपिलार्थीच्या प्रथम मूळ अर्जावर व जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर  जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेले दुर्लक्ष आयोगास नजरेआड करता येणार नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारचा माहिती संदर्भात प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केला आहे व याद्वारे स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, अध्यक्ष, लोणीग्रुप शिक्षण प्रसारक मंडळ, लोणीग्रुप ता.पारोळा यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन त्यानंतर या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याचे आत सादर करावा. अपिलार्थीस माहिती

मिळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये उल्लेखिलेल्या शिक्षण उपसंचालक यांनी दिलेल्या आदेशासंदर्भात कोणती कार्यवाही केली याची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता वा अपिलार्थीच्या अपीलावर कोणताही निर्णय न देण्याच्या कृतीद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग करुन त्याद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, याची यथायोग्य दखल शिक्षण संचालक,पुणे यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये उल्लेखिलेल्या शिक्षण उपसंचालक यांनी दिलेल्या आदेशासंदर्भात कोणती कार्यवाही केली याची माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, लोणीग्रुप शिक्षण प्रसारक मंडळ, लोणीग्रुप ता.पारोळा यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तद्नंतर या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याचे आत सादर करावा.

४. शिक्षण संचालक, म.रा.पुणे यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता वा अपिलार्थीच्या अपीलावर कोणताही निर्णय न देण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग करुन, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाची व बेपर्वाईची यथायोग्य दखल घ्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १७.०५.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रंगराव उखर्डू पाटील,लोणीग्रुप, पो.बाहुटे,ता.पारोळा, जि.जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, किसान माध्यमिक विद्यालय,लोणीग्रुप, ता.पारोळा जि. जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (रजिस्टर्ड पोस्टाने)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (रजिस्टर्ड पोस्टाने)

४ शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अध्यक्ष, लोणीग्रुप शिक्षण प्रसारक मंडळ, (किसान माध्यमिक विद्यालय,लोणीग्रुप) ता.पारोळा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (रजिस्टर्ड पोस्टाने)

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११६८

निर्णय दिनांक : १७.०५.२००८

१ श्री. अब्दुल हमीद दुलारे, : अपीलार्थी

राहुलनगर,मालेगाव,

ता.मालेगाव, जि.नाशिक

**विरुध्द**

१(१) जन माहिती अधिकारी तथा
सहायक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक
विभागीय मंडळ,
नाशिक

१(२) जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक

२(१) जन माहिती अधिकारी तथा :
उपकुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
पुणे

प्रतिवादी

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अब्दुल हमीद दुलारे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक श्री. नितीन मुरलीधर उपासनी ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक श्री. प्रल्हाद

सिताराम मुसळे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ), तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,नाशिक श्री. दशरथ भाऊराव पवार तसेच त्रयस्थ पक्ष श्री. शांताराम हरी दुसाने (त्यांना यापुढे त्रयस्थ पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १७.०६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ऑक्टोबर १९८३ व मार्च,१९८० या कालावधीतील त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) सन १९८२-८३ या शैक्षणिक वर्षात ऑक्टो-१९८३ मध्ये घेण्यात आलेल्या बी.कॉम शाखेच्या परिक्षा क्रं.१४१०९, कॉलेज क्रं. ०१९,सेंटर क्रं.०७ परमनंट रजि.नं.०२११०२२१ एल "दुसाने शांताराम हरी" या विद्यार्थ्यांचे पात्रता गुणपत्रिका व प्रमाणपत्राची मुळप्रतीची सटिफाईड कॉपी/प्रत मिळणेबाबत.

२) सन १९७९-८० या शैक्षणिक वर्षात सेंटर नं.०६१,परिक्षा क्रं.ई-०७८६४२ जिल्हा व कॉलेज क्रं.१४.००२ "दुसाने शांताराम हरी" यांचा सिरीअर नं. गुणपत्रिका क्रं. ०२५४९९ ची खरी प्रतीची सर्टिफाईड नक्कल पात्रताधारक विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेची व एच.एस.सी.परिक्षेचे प्रमाणपत्राची सर्टिफाईड नक्कल मिळणेबाबत.

सदर माहिती अपिलार्थीने शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने या अर्जावर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमुद केले. तसेच अपिलार्थी यांनी या अर्जाद्वारे दोन वेगवेगळया प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन भिन्न स्वरुपाची माहिती त्यांच्याकडे मागितली होती.

अपिलार्थीने या प्रकरणात एकाच त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितल्याने या अर्जात एकच अर्ज दोन जन माहिती अधिकारी यांना उद्देशून केला असावा, असे वाटते.

अपिलार्थीच्या या अर्जास महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. तर पुणे विद्यापिठातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणाऱ्या माहितीपृष्ठयर्थ शुल्क रु.२७/- त्यांचे कार्यालयात भरण्याचे त्यांचेकडील दि. २९.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी तथा सहायक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नाशिक यांचा निर्णय मान्य न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.०७.२००६ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.७.२००६ रोजी सुनावणी घेतली. आपले आदेश दि. २४.०७.०६ रोजी पारित करुन जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा निर्णय कायम ठेवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. पुणे विद्यापिठाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. २९.६.२००६ च्या पत्रावर अपिलार्थी यांनी काय कार्यवाही केली, याची त्यांना विचारणा केली असता, त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल केल्याचे आयोगास सांगितले. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.८.२००६ रोजी द्वितीय अपिल सादर केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली व पुणे विद्यापिठाच्या जन माहिती

अधिकारी यांनी, त्यांना त्यांचे मूळ दारिद्रय रेषेखालील रेशन कार्ड ते संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे घेऊन गेले असतांना देखिल त्यांनी माहिती देण्याचे नाकारले आहे, असे नमुद करुन त्रयस्थ पक्ष श्री. दुसाने यांच्या शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील गुणपत्रिका व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींची मागणी कायम ठेवली आहे.

आज सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सन २००६ मध्ये मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही दोन्ही जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली नाही. त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचेकडे मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित होती. अपिलार्थीने माहितीची मागणी करते वेळी त्यांनी शासनाकडे विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रके व गुणवत्ता प्रमाणपत्रांच्या तपशीलाबाबतची माहिती संबंधित विद्यार्थ्याव्यतिरिक्त इतर व्यक्तींना देता येणार नाही, असा प्रस्ताव सादर केला होता तसेच विद्यार्थ्यांना एकदा मूळ गुणपत्रिका शाळेमार्फत दिल्यानंतर, जर त्यांना त्यांच्या मूळ गुणपत्रिकेची द्वितीय प्रत आवश्यक असल्यास शाळेमार्फत मूळ गुणपत्रिकेची छायांकित प्रत त्यांनी सादर केल्यानंतर द्वितीय गुणपत्रिका दिली जाते, अशाप्रकारच्या प्रकरणामध्ये ही पध्दती त्यांनी अवलंबिलेली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीने त्रयस्थपक्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रतीची मागणी केली होती, त्यामुळे सदर प्रत अपिलार्थी त्यांना त्रयस्थ पक्षाच्या होकाराशिवाय देऊ शकले नाहीत, या कारणासाठी व शासनाकडे त्यांनी सादर केलेल्या व वर उल्लेखिलेल्या प्रस्तावामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहिती देण्याचे नाकारले.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, माध्यमिक शिक्षण मंडळाकडील तत्कालीन प्रचलीत संकेतास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला आहे. तसेच त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती देण्यासंदर्भात त्यांचेकडील अपिल सुनावणीचे वेळी त्रयस्थ पक्षाने हरकत घेतल्याने त्यांनी ती माहिती अपिलार्थीस न पुरविण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य मानून अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात आपले आदेश दि. २४.७.२००६ रोजी पारित केले.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांची वैयक्तिक असून या माहितीवर त्यांचा हक्क आहे. त्यांनी स्वतः एस.एस.सी., एच.एस.सी., बी.कॉम,बी.एड या सर्व परीक्षा दिल्या असून, त्याबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका त्यांच्याकडे उपलब्ध आहेत, ही माहिती फक्त त्यांची स्वतःची व अत्यंत खाजगी असल्यामुळे ती अपिलार्थीस देण्यात येऊ नये. त्यांचा अपिलार्थीस माहिती देण्यास विरोध नाही, तथापि मालेगाव महानगर पालिकेमध्ये काही विशिष्ट व्यक्ती माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन, या अधिकाराचा वापर स्वतःचे नियमित उत्पन्न प्राप्त करण्याचे साधन म्हणून करीत आहेत, या प्रवृत्तीस त्यांचा विरोध आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देऊ नये, या त्यांच्या म्हणण्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा दोन्ही जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केला नव्हता. त्यांना दोन्ही जन माहिती अधिकाऱ्यापैकी माध्यमिक शिक्षण मंडळाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील प्रचलीत संकेतानुसार माहिती देण्याचे नाकारले तर विद्यापीठाच्या जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस रु.२७/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र पाहिलेले नाही. अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असले तर व त्यांनी त्याबाबत पुरावा जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केल्यास, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य देण्याबाबत अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीनुसार कार्यवाही करावी लागेल.अपिलार्थीने दोन्ही जन माहिती अधिकारी यांचेकडे त्रयस्थपक्षाचे एच.एस.सी. व पदवी परिक्षेच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतींची मागणी केली आहे. त्रयस्थ पक्षाने आज सुनावणीमध्ये असे मत व्यक्त केले की, ही त्यांची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस ती देऊ नये. तथापि येथे असे स्पष्ट करण्यात येते की, दोन्ही जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती ही त्यांना सार्वजनिक प्राधिकरणाकडून उघड स्वरुपात दिली गेली असल्याने व ही 'माहिती' म्हणजे त्यांनी संबंधित परिक्षांमध्ये केलेल्या कामगिरीचे त्रयस्थ पक्षाने केलेले गुणांच्या स्वरुपातील मूल्यमापन होय. हे मूल्यमापन त्यांनी स्वतःचे स्वतः निर्माण केले नसल्याने, या माहितीवर त्यांचा स्वामित्वाचा हक्क रहात नाही, या सर्व कारणांमुळे सदर माहिती ती सार्वजनिक स्वरुपाची ठरते. या माहितीमध्ये गोपनीय म्हणावे असे काहीही नाही, माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डातर्फे एस.एस.सी. अथवा एच.एस.सी.परीक्षांचा निकाल वृत्तपत्रातून, वेबसाईटवरुन जाहीर होत असतो. सदर निकाल प्रत्येक शाळा कॉलेजच्या बोर्डाच्या व विद्यापीठाच्या सूचना फलकावरही जाहीर स्वरुपात लावले जातात. या माध्यमाद्वारे निकालपत्रकास मोठया प्रमाणात योग्य ती प्रसिध्दी दिली जाते. तसेच त्रयस्थ पक्षाने वेळोवेळी उच्च शिक्षणाकरता किंवा इतर परीक्षेकरिता किंवा नोकरी करता अर्ज करतेवेळी त्या अर्जाद्वारे संबंधित प्राधिकरणाकडे जी माहिती सादर केली असेल, ती अनेक प्राधिकरणाकडे वेगवेगळया स्वरुपात उपलब्ध असते, ती माहिती त्रयस्थ पक्षाची गोपनीय माहिती आहे किंवा ही माहिती उघड करण्यामुळे त्यांच्या खाजगी

बाबीमध्ये इतर कोणाचाही आगंतुक हस्तक्षेप होईल, असे आयोगास वाटत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक आहे, असे त्यांना आयोगातर्फे आदेशित करण्यात येत आहे. मात्र सदर माहिती अपिलार्थीस देतांना व ती देतांना त्यांचे शुल्क ठरवितांना अपीलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत, याबाबत त्यांच्या प्रमाणपत्राची शहानिशा करुन घेण्याची जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी यांची राहील, याचाही येथे खास उल्लेख करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् येथे असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने पुणे विद्यापिठाकडून माहिती मागवितांना विद्यापिठातील जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले नाही.जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न होताच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल केले आहे. त्यांची ही कृती बरोबर नाही. भविष्यात त्यांनी अशा प्रकारची कृती टाळावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. केवळ त्यांच्या प्रथम अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी एक अपवादात्मक बाब म्हणून या प्रकरणी विद्यापीठास माहिती देण्याचे आदेशित केले, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ नाशिक व विद्यापिठाचे जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी अपिलार्थीच्या दारिद्रयरेषेच्या प्रमाणपत्राच्या सत्यासत्यतेची पडताळणी करुन,

त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत द्यावी.

३ अपिलार्थीने वरील निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेची नोंद घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १७.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल हमीद दुलारे,स.नं.५४, घ.नं.६०, राहुलनगर,मालेगाव,ता.मालेगाव, जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सचिव,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, पुणे विद्यापीठ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव पुणे विद्यापीठ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११७०

निर्णय दिनांक : १७.०५.२००८

१ श्री. शिवाजी वसंत भांबरकर, : अपीलार्थी
मु.पो.भाळवणी ता.पारनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, पारनेर,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, नगर भाग,
जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०५.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शिवाजी वसंत भांबरकर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार पारनेर श्री. सुनील भिमाशंकर शेटे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार पारनेर सौ. मिनाक्षी अर्जुन राठोड (त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पारनेर जि.अहमदनगर श्री. पोपट भिवाजी कटारे, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पारनेर श्री. अरुण प्रभाकर उजागरे ( त्यांना यापुढे जन

अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), उपविभागीय अधिकारी, नगर भाग, जि.अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री. विजय प्रभाकर उमाप व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (पंचायत) श्री. बी.पी.गोसावी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०३.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात दि. ३.१०.२००६ ते १०.१०.२००६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

> " ग्राम पंचायत भाळवणी बाबद दि. ७/११/०५ चे निवेदन जिल्हाधिकारी यांचेकडील क्र.३.क/१२७८/०५ तहसिल पारनेर क्र. ५५०/०५ दि. ९/१/०६ नुसार बांधकामास परवानगी देणारे सदस्यांबाबद काय कारवाई केली २० % सेस फंडाबाबद काय चौकशी केली व कारवाई सि.स.नं. ४१७ व ४१८ सरकारी मधे अतिक्रमणाबाबद काय कारवाई केली त्याबाबद माहिती द्यावी व मागासवर्गीयांना अपंग यांना व्यवसायासाठी जागा मिळणेबाबद
>
> दि. ७/११/०५ चे निवेदनातील मागण्यानुसार काय कारवाई केली त्याचे माहिती साक्षांकित द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती त्यांचे कार्यालयाशी सरळ संबंधित नसल्याने, त्यांनी अपिलार्थी यांचा अर्ज त्यांचेकडील दि. १६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) च्या तरतुदीप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांचेकडे हस्तांतरित केला व त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.११.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर यांचेकडे प्रथम अपील सादर केले आहे. तथापि या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी हे तहसीलदार, पारनेर हे आहेत.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी यांनी दि. १२.१२.२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आठ दिवसांचे आत माहिती देण्यासाठी संबंधित गट विकास अधिकारी यांना सूचित केले व दि. २६.१२.२००६ रोजी उप विभागीय अधिकारी हे अपिलीय अधिकारी नसून तहसीलदार, पारनेर हे अपिलीय अधिकारी असल्याने हे प्रकरण अंतीमतः निकाली काढले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणाऱ्या अपीलावर निर्णय कसा घेऊ नये याचे संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय म्हणजे उत्तम उदाहरण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जर या प्रकरणात ते जन अपिलीय अधिकारी नव्हते तर त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पारनेर यांचेकडे पाठवून द्यावयास हवा होता, तथापि अशाप्रकारची कार्यवाही न करता त्यांनी स्वतः सुनावणी घेतली व प्रथमतः सुनावणीस उपस्थित विस्तार अधिकारी यांना आठ दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले. आठ दिवसांनंतरही संबंधितांकडून अहवाल प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २६.१२.२००६ रोजी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याचे नमुद करीत अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०१.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ. राठोड यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांचेकडे केलेल्या मूळ अर्जातील माहिती पूर्णपणे ग्राम पंचायत व पंचायत समिती, पारनेर यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असल्याने त्यांनी त्यांचेकडील दि. १६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांचेकडे हस्तांतरित केला व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले दि. ९.१.२००६ चे पत्र अस्तित्त्वात नाही. (सदर पत्राची प्रत अपिलार्थी देखिल आयोगास दाखवू शकले नाहीत.) सदर माहिती पंचायत समिती, पारनेर यांचेकडे उपलब्ध असल्याने अपिलार्थीच्या दि. ३.१०.२००६ रोजीच्या अर्जावर पंचायत समिती, पारनेर यांनी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पारनेर यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांचा अपिल अर्ज, त्यांचेकडे पाठविला नसल्यामुळे ते अपिलार्थीच्या अपिल अर्जावर सुनावणी घेऊ शकले नाही.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी उपविभागीय अधिकारी, नगर भाग यांचेकडे दि. १९.१२.२००६ व २३.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविली होती व त्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली होती. तथापि अपिलार्थी यांनी सदर माहितीचे टपाल घेण्याचे नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मूळात माहितीसाठीचा अर्ज करतांना तो चुकीच्या प्राधिकरणाकडे केला होता. सदर माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती. त्या प्राधिकरणाकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार कलम ६(३)(i) अन्वये पाठविला होता. सदर अर्ज पाठवितांना जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांचा विलंब लावल्याचे येथे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, गट विकास अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या दि. १२.१२.२००६ रोजीच्या सुनावणीनंतर दि. १९.१२.२००६ रोजी अपिलार्थीस पाठविली. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या कथित दि. २३.२.२००७ रोजीच्या पत्राच्या विलंबाबाबत असे आढळून आले की, अपिलार्थीस पाठविलेली माहिती अपिलार्थी स्वीकारत नसल्याचा अहवाल त्यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे या पत्राद्वारे दिला आहे. अपिलार्थीस त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडून आलेले टपाल स्वीकारण्यास का नकार दिला, असे विचारले असता, अपिलार्थीने सदर माहिती, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर प्राप्त झाल्याने, त्यांनी हे टपाल स्वीकारण्यास नकार दिला आहे, असे आयोगास सांगितले. अपिलार्थीची सदर कृती चुकीची असून अपिलार्थीस माहिती मिळण्यामध्ये खरोखरीच स्वारस्य असते तर, त्यांनी सदर टपाल स्वीकारण्यास नकार दिला नसता. गट विकास अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये विलंबाने देऊ केलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी पुरेशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस उद्देशून न लिहिता उप विभागीय अधिकारी यांना उद्देशीत करुन लिहिले असून, त्यांनी अपिलार्थीस त्याची प्रत दिली आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने केलेला दि. ३.१०.२००६ रोजीचा अर्ज देखिल उपलब्ध होता. परंतु अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी दि. १९.१२.२००६ पर्यंत वाट पहावी लागली. अपिलार्थीस जी माहिती सर्वसाधारणपणे दि. ७.११.२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होते ती त्यांना दि. १९.१२.२००६ रोजी प्राप्त झाली. ती त्यांना देण्याकरिता ४२ दिवस इतक्या विलंबाने तयार झाली असल्याचे दिसून येते. तथापि या मुदतीत माहिती प्राप्त न होण्यासाठी अपीलार्थी हे स्वतः जबाबदार आहेत, कारण त्यांनी गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाकडून पाठविण्यात आलेले टपाल स्वीकारले नाही. मात्र अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यास संबंधित गट विकास अधिकारी हेही तितकेच जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित गट विकास अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल यथायोग्य प्रशासकीय कारवाई दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तदनंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १७.०५.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी वसंत भांबरकर,मु.पो.भाळवणी ता.पारनेर, जि.अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पारनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग,जि.अहमदनगर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पारिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती